


**डॉ बापू गणपतराव घोलप**

जन्म: ०१ ०६ १९७८

मु. पोस्ट लिंबागणेश ता. जिल्हा बीड (महाराष्ट्र) 431126


शिक्षण: M.A. (मराठी/राज्यशास्त्र) बीएड, पीएचडी, यूजीसी नेट

2004 पासून नवगण महाविद्यालय परळी वैजनाथ (महाराष्ट्र) येथे अध्यापक

मराठवाड्याच्या ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेला गावगडा या विषयावर पीएच.डी

**प्रकाशित पुस्तके :** मर्मबंधातली ठेव ही, मातीचे आकाश, वस्तुनिष्ठ मराठी सेट नेट परीक्षा, ऋणानुबंध, सूत्रसंचालन कसे करावे, मराठवाड्यातील गावगाडा

- महाविद्यालयीन जीवनात अनेक भाषण आणि वादविवाद स्पर्धांचे विजेते
- आकाशवाणीच्या बीड, सातारा, परभणी केंद्रावरून कथा आणि कविता वाचन
- विविध वर्तमानपत्र, मासिक आणि दिवाळी अंकात लेखन
- शेकडो साहित्यिक सामाजिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन/आयोजन
- 2010 मध्ये www. shreebhalchandra.com वेबसाइटची निर्मिती
- 2012 पासून हर्षवर्धन पब्लिकेशन्स प्रा लि चे मुख्य संपादक
- 2013 पासून विद्यावार्ता पीयर रिव्हिव्ह आंतरराष्ट्रीय बहुभाषिक रिसर्च जर्नलचे संपादक
- 2015 पासून प्रिंटिंग एरिया पीअर रिव्ह्यूड रिसर्च जर्नलचे संपादक
- 20१६ मध्ये Vidyavarta.com वेबसाइट आणि ब्लॉग ची निर्मिती
- 2025 पर्यंत हर्षवर्धन प्रकाशनाद्वारे 850 ISBN पुस्तके प्रकाशित झाली आहेत.
- विद्यावार्ता यूट्यूब चॅनलवर 800 हून अधिक व्हिडिओ अपलोड केले आहेत.
- या शैक्षणिक चॅनेलचे पन्नास हजारांहून अधिक सबस्क्राइबर आहेत.
- विद्यावार्ता चे व्हिडिओ तीन लाखांहून अधिक वेळा पाहिले गेले आहेत.
- भारत सरकारच्या बौद्धिक संपदा विभागाकडून विद्यावार्ता ला ट्रेडमार्क आणि Copyright® ची प्राप्त झाले आहे.
- डॉ घोलप यांना ग्राफिक्स डिझाईन, मराठी कॅलिग्राफी, फोटोग्राफी आणि व्हिडीओग्राफीमध्ये विशेष रुची.
- 2020-21 मध्ये YouTube च्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना युवकभारती मराठी विषय शिकवला.


**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed
Pin-431 126 (Maharashtra)
Mob.09850203295

ISBN :978-93-48306-33-3


महिला सक्षमीकरण

# महिला सक्षमीकरण

डॉ. बापू गणपतराव घोलप



# महिला सक्षमीकरण

**संपादक**

**डॉ.बापू घोलप**

नवगण कला व वाणिज्य महाविद्यालय,

परळी, जि.बीड

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

# महिला सक्षमीकरण

© डॉ.बापू घोलप

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**

H. P. Office (Source by Google)

❖ **Edition:** October 2014(First Edition)

**ISBN** 978-93-48306-33-3

❖ **Price : 200/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

# Editorial

Scientific research is a systematic way of gathering data and harnessing curiosity. This research provides scientific information and theories for the explanation of the nature and the properties of the world.

Basic research has led to some of the most commercially successful and life-saving discoveries of the past century, including the laser, vaccines and drugs, and the development of radio and television.”

Research is a method of exploration that is done in a systematic way where it is either tested or investigated to add to a body of knowledge. Research is intended to support a purpose and occurs across many disciplines.

Research holds the key to knowledge expansion. It opens doors to new possibilities and reveals strategies to solve complex problems. Whether it's making informed decisions, tackling societal issues, or enhancing technology, research acts as a guiding compass that helps us navigate through the maze of uncertainties.

Research is a catalyst for solving the world’s most pressing issues, the complexity of which evolves over time. The entire wealth of research findings throughout history has led us to this very point in civilisation, which brings us to the next reason why research matters.

Thanks to scientific research, modern medicine can cure diseases like tuberculosis and malaria. We’ve been able to simplify vaccines, diagnosis, and treatment across the board.

The world is the way it is today because academics throughout history have relentlessly sought answers in their laboratories and faculties; our future depends on what we do with all this newfound information.

I would like to thank all my family members, co-editors, all authors, fellow friends, also Coordinator and all those

who directly or indirectly helped me for this Special Issue On " Innovative Research " Thank you very much for making this work possible. Also best wishes for your future life.

**Dr.Bapu G.Gholap**

# INDEX

1) महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्य बचत गटांचे योगदान
**प्रा. डॉ. संतोष एन. ताडे, आकोट, जि. अकोला** **ll 07**

2) बचत गट बनाम लघुऋण
**प्रा. डॉ. नीता तिवारी, खडकी (चा.) अकोला** **ll 11**

3) महिला सक्षमीकरणात स्वयं—सहाय्यता बचत....
**प्रा. डॉ. कांतेश्वर गजाननराव ढोबळे, अमरावती** **ll 22**

4) महिला सक्षमीकरण आणि बचत गट
**डॉ. अनंत मदन आवटी, देऊळगावराजा, जि. बुलडाणा** **ll 30**

5) स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून....
**प्रा. डॉ. जया सवाईथूल, अमरावती** **ll 37**

6) स्वयं सहायता गट व महिलांचे सक्षमीकरण
**डॉ. एम. आर. दातीर, अचलपूर शहर, जि. अमरावती** **ll 46**

7) महिला उद्योजक व स्वयंसहाय्यता बचत गट
**Dr. Sanjay B. Kadu, Amravati** **ll 52**

8) महिला बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण
**प्रा. नीता पांडे, बार्शिटाकळी जि. अकोला** **ll 56**

9) स्वयंसहायता बचत गट आणि महिला सक्षमीकरण
**Mrs. Harshada S. Wadhone, Akola** **ll 60**

10) भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता....
**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन, चिखली** **II 69**

---

11) महिला सबलीकरणात स्वयंसहायता बचतगटांची....
**डॉ. ढास डी. के., नेकनुर जि. बीड** **II 80**

---

12) हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची—स्पर्धात्मक....
**प्रा. हरिष तुकाराम साखरे, बुलडाणा** **II 88**

---

13) Eco-feminism: A Brief Survey of Anita ...
**Dr. Vinita Bhadauria, Behror** **II 96**

---

❑❑❑

**01**

# महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्य बचत गटांचे योगदान

**प्रा. डॉ. संतोष एन. ताडे**
श्री नरसिंग महाविद्यालय, आकोट
ता. आकोट, जि. अकोला

***********

मानवाने जागतिकस्तरावर अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. त्या पैकी गरीब व अंत्यल्प उत्पन्न असणाऱ्या समाजाकरीता संजिवनी ठरलेली बाब म्हणजे स्वयंसहाय्य बचत गट होय.साधारणत: १० पैक्षा जास्त म्हणजे २० लोकांनी एकत्र येऊन स्वत:च्या व एकमेकांच्या सहाय्याकरीता स्थापन केलेल्या समुहाला स्वयंसहाय्य बचत गट म्हणतात. या गटाचे प्राथमिक उद्दीष्ट म्हणजे बचत करून महिलांचे सक्षमीकरण घडवून आणने होय. तर दुसरे उद्दीष्ट राजकीय क्षेत्रात सुध्दा महिला सबलीकरण घडून आणने होय. भारतात १९९४ ला महिला सबलिकरण धोरण जाहिर झाले. त्यातील मुख्य टप्पा म्हणजे स्वयंसहाय्य बचत गटांचे माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनविणे हा होता. स्वयंसहाय्य बचत गटाचे जनक बांग्ला देशातील डॉ.महम्मद युनुस यांना ओळखले जाते. भारतात आज या चळवळीने ग्रामिण भागात व्यापक स्वरुप धारण केले आहे. या गटांचे माध्यमातून मोठे मोठे उदयोग व्यवसाय चालू असून या द्वारे उत्पादनात मोठी भर पडली आहे. ग्रामिण भागात महिला सबलीकरणाला या चळवळीने संजिवनी मिळाली आहे. समान आर्थिकता व समान विचार असलेल्या गरजू महिला एकत्र येऊन गट स्थापन करतात. आपल्या शक्ती नुसार गटाचे नावाने बँकेत खाते उघडून दर महिन्याला बचत जमा करतात. या गटाचे व्यवहार अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिवाद्वारे पार दर्शक पध्दतीने केले जातात. गरजू महिलांना अत्यल्प व्याज दराने गटाद्वारे कर्ज दिले जाते. त्यामुळे महिला स्वत:चा व्यवसाय सुरू करतात व आर्थिक दृष्टया संपन्नतेच्या मार्गावर येतात. स्वयंसहाय्य बचत गट महिलांना आर्थिक मदतीच्या भावनेतुनच स्थापन झालेला आहे.

महिलांच्या विकासाकरीता सातारा जिल्हा बँकेने केवळ ४% व्याज दराने

कर्ज देणे सुरू केले. विशेष बाब म्हणजे त्या करीता कुठलेही तारण घेतले जात नाही. हि बँक २००८ पासून कर्ज देत आहे. या बँके कडे महिला स्वयंसहाय्य बचत गटांची संख्या १५,७९० कार्यरत आहे. आहे. त्यांची बचत ३३,३२,५२,०००/- पर्यंत आहे. बँक नेहमी महिलां मेळाव्यातून अनेक विषयावर सक्षमिकरणाबाबत मार्गदर्शन करते.

आज भारतात राज्य निहाय बचत गटांची संख्या पुढील सारणी वरूण स्पष्ट होते.

**सारणी**

**भारत: राज्यनिहाय बचत गटांची संख्या ( ७ जून २०१९)**

| राज्य | बचत गटांची संख्या | राज्य | बचत गटांची संख्या |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ७,०३,२९८ | मिझोरम | ४,४३० |
| अरुणाचल प्रदेश | २,३४३ | नागालँड | ६,७५८ |
| आसाम | २,३८,७१८ | ओरिसा | ३,५९,८४७ |
| बिहार | ५,९५,०३६ | पंजाब | ९,५५९ |
| छतीसगढ़ | १,४८,०७८ | राजस्थान | ९२,१४५ |
| गोवा | १,३५६ | सिक्किम | १,८२१ |
| गुजराथ | २,४१,८६५ | तामिळनाडू | ३,०४,०२८ |
| हरियाणा | २८,५२२ | तेलंगाणा | ३,९१,९७१ |
| हिमाचल प्रदेश | १८,९८२ | त्रिपूरा | ८,२४५ |
| जम्मू कश्मीर | ३६,०३० | उत्तरप्रदेश | २,७४,४५६ |
| झारखंड | १,२०,३५३ | उत्तरांचल | २२,७२० |
| कर्नाटक | २,६५,२३१ | पश्चिम बंगाल | ७,४२,०९० |
| केरळ | २,३७,९४५ | अंदमान आणि | ३२६ |
| मध्यप्रदेश | २,६०,८६८ | निकोबार द्वीप समूह | |
| महाराष्ट्र | ३,७८,५४९ | दमन दीव | १७३ |
| मणिपूर | १,६२२ | दादरा एवं नगर हवेली | ५७ |
| मेघालय | ११,४८२ | लक्ष्द्वीप | १५४ |
| | | पाँडेचरी | २,५८८ |
| **एकुण** | **५५,०८,६४६** | | |

**संदर्भ :-** (डॉ. काकडे, डॉ. गव्हाळे, भारतीय अर्थव्यवस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर,२०१९)

वरील सारणी वरून राज्य निहाय बचत गटांची संख्या स्पष्ट होते. यामध्ये सर्वात जास्त बचत गट पश्चिम बंगाल राज्यात ७,४२,०९० आहेत. तर सर्वात कमी दादरा नगर हवेली मध्ये केवळ ५७ बचत गट आहेत.

"सारख्या समस्या असलेल्या अनेक व्यक्तींनी त्या सोडविण्याकरीता एकत्र येऊन जो गट स्थापन करतात त्याला स्वयंसहाय्य बचत गट म्हणतात."

कालांतराने हि संकल्पना व्यापक होऊन ती समूह गट, महिला बचत गट, स्वावलंबी गट, रोजगार गट, सुक्ष्म वित्त गट, स्वयंसहाय्य बचत गट व काटकसर गट

या नावाने आज ओळखले जाते. स्वयंसहाय्य बचत गटाचे उदिष्ट म्हणजे आवहाने, जबाबदाऱ्या स्विकारारून त्या सांभाडण्याची क्षमता विकसीत करणे आहे. गटाद्वारे जिवनमान व राहनिमानाचा दर्जा उंचावण्याकरीता, अनेक गर्जाच्या पुर्तीकरीता अर्थसाहाय्य दिले जाते. अनेक महिलांनी एकत्र येऊन विचाराची देवान घेवान करणे, सहकार्य करणे व आपला आर्थिक विकास घडवून आणने अशी उदिष्टे ठेवून बचत गटांची स्थापना झाली आहेत. बचत गटांची संकल्पना जगात नवीन नसून ती अनेक नावाने पुर्वीपासून सुरू आहेत. इंडोनेशियात जी.टी.२ या नावाने जर्मन फंडिंग एजेन्सीने स्वयंसहाय्य गटाचा प्रयोग सुरू केल्याचे आढळते. तर भारतात या गटांची सुरूवात म्हैसूर मध्ये मायरॉड या संस्थेने सूरू केली. १९९२ ला नाबार्ड ने विविध क्षेत्रात या गटांचा प्रारंभ केला. या चळवळीत महिलांचा सहभाग वाढत गेला. त्यामुळे महिलांचे आत्मसत्मानात वाढ होऊन त्यांना बचतीची सवय लागली. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यात. महिलांचे चूल आणि मुल हे विश्व संपून त्या गटाद्वारे जगाच्या संपर्गात आल्यात. महिलांनी स्वयंसहाय्य बचत गटाद्वारे अनेक उदयोग व्यवसाय चालू केले. या मालाला योग्य बाजारपेठे करीता शासनाचे प्रयत्न चालू आहेत. या गटांचे विकासाकरीता अनेक वेळा शासकीय स्तारावर तरतूद करण्यात आली. भारतात सहकार तत्वार बचत गटांची चळवळ सूरू आहे. एक प्रकारे बचत गट म्हणजे मिनी सहकारच होय. गटामूळे महिलांची उन्नती होऊन समग्र विकासात भर पडली. स्वयंसहाय्य बचत गटाचे अनेक उदिष्टे, वैशिष्टये आहेत.

१. स्वयंसहाय्य बचत गटाची स्थापना स्वयंफुर्तीने झालेली असून ते विश्वासावर आधारीत असतात. या गटाचे मुख्य तत्व सदय्यांचा व ग्रामाचा विकास करणे आहे.

२. या गटांतील सर्व व्यवहार रोखिने व पारदर्शक पध्दतीने केले जात असून सर्वांनुमते निर्णय घेतले जातात. एखादा सदस्य निवृत्त झाल्यास त्या ठिकाणी त्याचे कंुटुबांतील सदस्यांची निवड करतात त्यामुळे हि प्रक्रिया अखंड राहते.

३. स्वयंसहाय्य बचत गटाचे सदस्य आपल्या कुवती नूसार बचत करतात. सदस्यांना झेपेल एवढाच व्याज दर असतो. या गटांचा मुख्य आधार सहकार असल्यामुळे सदस्यामध्ये प्रेम, आपुलकी, बंधुता वाढीस लागते. त्यामुळे कौटंुबीक घरगुती समस्या सोडविण्यास मदत होते.

४. गटांमध्ये सर्वांना मत मांडण्याचा अधिकार असल्यामुळे नेतृत्व गुण वाढीस लागतो. महिला व युवकांचे वैचारिक परिवर्तन घडवून आनले जाते. लोकांची सावकाराचे पाशातून मुक्ती केली जाते.

५. महिलांचे वैयक्तीक, सामाजिक व आरोग्य विषयक प्रश्न गटाद्वारे सोडविले जातात. महिलांना बँकेच्या व्यवहाराची जाणिव जागृती निर्माण होत असल्यामूळे सक्षमीकरनात स्वयंसहाय्य बचत गटाचे फार मोठे योगदान आहे. त्यामुळे महिलांचा सर्वांगीन विकास घडवून येत आहे.

बचत गटाचे मिश्र, महिला, पुरूष, स्वयं रोजगार स्वयं सहाय्य गट असे अनेक प्रकार असून विशेषत: महिला सबलिकरणात या गटांचे व्यापक योगदान आहे. कारण गरीब वर्गातील गरजू महिलांच्या लाहान मोठया समस्यांची सोडवणूक होऊन ग्रामिण विकास साधल्या जात आहे. त्यामुळे महिलांना बचतीची सवय लागून त्यांचा समाजिक दर्जात वाढ होऊन निर्णय क्षमता व आत्मविश्वास सुध्दा वाढला आहे. आर्थीक व्यवहाराबाबत महिलांमध्ये जागृती होऊन त्यांचे व्यक्तीमत्व विकसीत झाले आहे. परिणामी महिला सक्षमिकरणात स्वयंसहाय्य बचत गटांचे भारतात भारतात फार मोठे योगदान आहे.

**संदर्भ**


१. डॉ. झामरे, भारतीय अर्थव्यवस्था, पिपळापुरे ॲड कं., नागपूर
२. डॉ.देशमुख, भारतीय अर्थव्यवस्था, पिपळापुरे ॲड कं., नागपूर
३. डॉ.सोळंके, महाराष्ट्रांची अर्थव्यवस्था, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद
४. डॉ.देसाई, भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, नागपूर
५. डॉ. काकडे, डॉ. गव्हाळे, भारतीय अर्थव्यवस्था, साईनाथ प्रकाशन, नागपूर


❑❑❑

02

# बचत गट बनाम लघुऋण

**प्रा. डॉ. नीता तिवारी**
श्री धाबेकर कला महाविद्यालय,
खडकी (चा.) अकोला.

***********

**सारांश**

सद्य परिस्थितीत जर बचतगट आणि लघुऋण ही अशी वास्तविकता आहे त्या बद्दल डोळा मिटून चालणार नाही, तर त्यांच्यात सामील होणाऱ्या महिलांची सामाजिक—आर्थिक स्थिती पण एक मोठी वास्तविकता आहे. या गटांच्या मध्यभागी महिलांना ठेवून दारिद्र्य निर्मूलनासाठी यंत्राप्रमाणे बऱ्याच काळासाठी वापरले जाऊ शकत नाही. म्हणून, जर महिला—सबलीकरणाचे वास्तविक माध्यम बचत—गट बनवायचे असेल आणि याचाशी महिलांना दीर्घ काळापर्यंत गुंतुन ठेवायचे असेल तर या गटांमध्ये शिक्षण, साक्षरता आणि क्षमता वाढवण्याच्या प्रक्रियेवर सर्वाधिक जोर द्यावा लागेल. तरच हे गट त्यामध्ये सामील होणाऱ्या सर्व महिलांच्या सक्षमीकरणाचे आणि दारिद्र्य निर्मूलनाचे साधन बनू शकतात.

**परिचय**

कर्जाच्या माध्यमातून विकास हा सध्याच्या विकासाचा एक प्रकार बनला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर जागतिक बँक असो वा राष्ट्रीय पातळीवर देशातील सरकारे, सर्व जण आता कर्जाच्या माध्यमातून विकासासाठी वकिली करत आहेत. या दुव्यामध्ये स्थानिक पातळीवर देण्यात येणाऱ्या छोट्या कर्जांना लघुऋण असे नाव देण्यात आले आहे.

**विशेषत:** जेव्हापासून ग्रामीण बँकेच्या बांगलादेशाचे संस्थापक नोबेल पुरस्कार विजेते महंमद युनूस यांनी हे सिद्ध केले आहे की

लघुवित्त ऋण हे सावकार आणि कर्जदार या दोघांसाठी फायदेशीर आहे, तेव्हापासून केवळ लहान वित्त संस्थाच नाही तर मोठ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बँका आणि सरकारेदेखील लघुवित्त ऋण वितरणात कार्यरत आहे.

भारतातील बहुतेक लघु ऋण कार्यक्रम सामूहिक रचनेद्वारे राबविले जातात. बचत गट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत बचत—गटाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.त्यात बांगलादेशचे प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ महंमद युनूस यांच्या प्रयत्नांचा उल्लेख करण्यात आला आहे. वर्ष १९७० पासून त्यांनी लघु वित्त चळवळ सुरू केली, त्याअंतर्गत गरिबांना कोणत्याही अटीशिवाय महिलांना कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली होती आणि आज जगातील ७ हजार संस्था लघु वित्त चळवळ चालवित आहेत, ज्याने जवळपास १ कोटी ६ लाख लोकांना रोजगार दिले आहेत.

बचतगट गट म्हणजे विशिष्ट उद्दीष्ट साध्य करण्यासाठी परस्पर मदतीने तयार केलेले हे छोटे आणि ऐच्छिक गट. ज्यांना सर्व सामान्य व्यक्ती त्यांच्या सामान्य गरजा पूर्ण करण्यासाठी तयार करतात, सामान्य समस्यांपासून मुक्त होतात आणि त्यात सामाजिक आणि वैयक्तिक बदल आणतात. सदस्यांना गरीबीपासून मुक्त करणे आणि आर्थिक स्वातंर्त्य मिळविणे हे बचत गट स्थापन करण्याचे उद्दीष्ट आहे.

गटाची कार्यप्रणाली,नियमावली तथा पदाधिकाऱ्याचे निर्णय यांचे बचत गट सामूहिकपणे निर्णय घेतात. प्राथमिक क्रिया म्हणून, गटाचे सदस्य लहान बचत करतात आणि त्यांना गटाच्या खात्यात जमा करतात आणि आवश्यक असल्यास, गट सदस्य त्या बचतीतून कर्ज देतात. अशा प्रकारे बचत गट बचत व पत गट म्हणून काम करण्यास सुरवात करतात. साधारणपणे एका वर्षासाठी यशस्वीरित्या बचत आणि क्रेडिट क्रियाकलापानंतर, आर्थिक क्रियाकलाप हाती घेतला जातो आणि ऋण प्रदाता बँक किंवा इतर संस्थेद्वारे गट संचालन, बचत, कर्ज आणि त्याची बैठक व कार्यवृत्त इत्यादींच्या आधारावर ग्रेडिग केले जाते. बचतगट लोकांचा अनेक प्रकारे फायदा करतात, उदाहरणार्थ ते गटातील सदस्यांमध्ये बचतीची भावना विकसित करतात. महिलांच्या सक्षमीकरणामुळे हे बचत गट त्यांच्या सदस्यांची राजकीय

जाणीव निर्माण करण्यास आणि लोकप्रतिनिधींशी संवाद साधून, समाजात एक सन्माननीय स्थान मिळविण्यास मदत करतात.

**महिला सक्षमीकरणात बचत गटांची भूमिका**

महिला सक्षमीकरण हे एक व्यापक अर्थपूर्ण शब्द आहे ज्यात महिलांच्या हक्कांचे संरक्षण, शोषणापासून संरक्षण, त्यांचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकास यासह महिलांच्या कल्याणाच्या एकूण पैलूंचा समावेश आहे. बचतगटांनी महिलांच्या सबलीकरणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.बचत गटांच्या माध्यमातून महिलांमध्ये आत्म— जागरूकता आणि आत्मविश्वास वाढला आहे.

**बचत गटांचे संचालन**

गटाच्या सुरळीत कामकाजासाठी, प्रत्येक गट आपल्या सदस्यांमधून अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि सचिव या तीन प्रतिनिधींची नेमणूक करतो जेणेकरून गटाची यंत्रणा सुलभपणे चालू शकेल. पदाधिकाऱ्यांची निवड करण्याचा आधार प्रामुख्याने शिक्षण आणि आत्मविश्वास असतो, जेणेकरून गटात ते त्यांच्या स्वतःच्या खात्यात लेखा ठेवण्याचे काम करू शकतात त्यांना प्रायः सुविधा देणाऱ्याकडून गट चालविण्याचे प्रशिक्षण दिले जाते. प्रत्येक महिन्यात. समूहाची नियमित बैठक असते. प्रत्येक सदस्याने गटाच्या बैठकीत हजेरी लावणे अनिवार्य असते.या बैठकीत महिला अनेकदा आपापसात वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करतात, जसे की कर्जेचे व्यवहार, बचत, नवीन सभासद सामील करण्याची प्रक्रिया, खेड्यातील समस्या व तोडगा पर्यावरणीय समस्येचे समाधान, मुलांचे शिक्षण, कर्जाचा वापर आणि बचतीच्या पद्धती इत्यादी असू शकते या गटामध्ये अधूनमधून अनौपचारिक सभा देखील होतात ज्यांचे मुख्य उद्दीष्ट म्हणजे महिलांना त्वरित कर्ज उपलब्ध करुन देणे, ज्यासाठी ते त्यांच्या बचतीच्या पैशाने स्वतः ची देवाणघेवाण करतात उर्वरित पैसे गटातील कार्यवाही रजिस्टरवर नोंदकरुन जवळपासच्या बँकेत जिथे समूहाचे सामूहिक खाते आहे अशा बँकेत पैसे जमा केले जातात आणि बँक त्यांना त्यांच्या बचतीवर ०२ टक्के व्याज देते.या व्यतिरिक्त गटातील महिलांना व्यवसाय करण्यास बँकेकडून अनुदान दिले जाते, ज्यावर कोणतेही व्याज आकारले जात नाही.

याप्रमाणे स्त्रिया आपापल्या गटात व्यवहार करून त्यांच्या गरजा भागवतात, ज्यामुळे ते आत्मनिर्भर बनतात.

**स्त्रीवादी विचारवंतांच्या मते** — महिला सबलीकरणाच्या केंद्रात शक्ती विभागली गेली आहे. शक्तीविरहीत वर्ग, समुदाय किंवा लिंगांचे सशक्तीकरण केवळ शक्ती नियंत्रणाच्या प्रक्रियेद्वारे आणि त्याच्या न्यायपूर्ण वाटणीद्वारे शक्य आहे. येथे केवळ राजकीय, धार्मिक आणि सामाजिक संदर्भातच नव्हे तर भौतिक (संसाधन) आणि वैयक्तिक संदर्भात देखील शक्ती समजून घेणे आवश्यक आहे. महिला सबलीकरणाच्या संदर्भात, सामाजिक समज, व्याख्या आणि लिंगाच्या भूमिकेचा निर्णय जवळजवळ सर्व पितृसत्तांनी घेतला आहे आणि सत्ताही त्यांच्या हातात आहे. म्हणून, सशक्तीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सामाजिक समज आणि लिंगाचा विचार बदलणे, संसाधनावरील स्त्रियांचे नियंत्रण आणि महिला आणि पुरुषांची सामाजिक भूमिका आणि प्रतिमा यांचा समावेश आहे. केवळ या प्रक्रिया समजून घेऊन आव्हान दिल्यास महिलांच्या जीवनात मूलभूत बदल करता येतो.

परंतु असे दिसून येते की बऱ्याच संस्था आणि कार्यक्रमांमध्ये, विशेषत सरकारी कार्यक्रम आणि प्रकल्पांमध्ये, गट आणि त्यांचे क्रियाकलाप अगदी मर्यादित व्याप्तीमध्ये दिसतात. उदाहरणार्थ, गटांचा पंचायतींशी संबंध. स्थानिक पातळीवर पंचायत हा प्रशासनाचा प्रकार असेल तर त्यामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग असावा. पंचायतीत सामील झाल्याने ते केवळ सत्तेचा भागच बनू शकत नाहीत तर समुदाय पातळीवर निर्णय घेण्यामध्येही सहभागी होऊ शकतात त्याशिवाय प्रशासन आणि राज्याकडूनही उत्तरदायित्वाची मागणी करू शकतात. परंतु 'निरंतर' ने केलेल्या अभ्यासानुसार हे स्पष्ट झाले आहे की ५० टक्क्यांहून कमी गटांनी ग्रामपंचायतीशी कोणतेही संबंध ठेवले आहेत व ज्या गटांनी संबंध जोडवण्याबद्दल चर्चा केली. त्यापैकी बहुतेक म्हणजे सुमारे ७० टक्के गट ग्रामसभेच्या बैठकीत बहुतेक फक्त गटनेत्यांनीच सहभाग घेतला आहे. म्हणजेच त्या गटातील बहुतेक सदस्यही पंचायतीच्या कार्यपद्धतीपासून दूरच राहिले.गटाच्या सक्षमीकरणाच्या दाव्यांमधील आणि वास्तविकतेमधील अंतर अध

ोरेखित करणारे हे एक उदाहरण होते. गटाच्या सक्षमीकरणाच्या दाव्यांमध्ील आणि वास्तविकतेमधील अंतर अधोरेखित करणारे हे उदाहरण होते. त्याचप्रमाणे, इतरही बऱ्याच प्रक्रिया आहेत ज्या सशक्तीकरण प्रक्रियेचा एक आवश्यक भाग मानली जातात, जसे की शिक्षण म्हणजे शिकवण्याची औपचारिक आणि अनौपचारिक संधी आणि बहुतेक गटांमध्ये अनुपस्थित असलेल्या क्षमता वाढवण्याच्या संधी. जेव्हा बहुतेक प्रौढ शैक्षणिक कार्यक्रम एकतर बंद केले गेले किंवा बचतगट कार्यक्रमात रूपांतरित केले जातात तेव्हा हा मुद्दा अधिक महत्त्वपूर्ण बनतो. बरेच कार्यक्रम गट—आधारित शैक्षणिक कार्यक्रम चालवण्याचा दावाही करीत आहेत, परंतु या गटांमध्ये बचत आणि कर्जेचीही केंद्रीयता आहे, तसेच शिक्षण आणि साक्षरतेतील अर्ध—मनाचे प्रयत्न बऱ्यापैकी मानले जातात. आपल्याला ही वृत्ती समजून घेण्याची आणि बदलण्याची देखील आवश्यकता आहे.

**बचतगटांचे पालनपोषण करण्यासाठी एनजीओची भूमिका**

संसाधन आधारित उपक्रम यशस्वी आणि प्रभावी करण्यात गैर—सरकारी संस्थांनी (एनजीओ) महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. स्थान आणि संसाधने ओळखणे, प्रोत्साहनपर उपक्रम, भविष्यातील उपक्रमांची निवड, उद्योजकांचे प्रशिक्षण, देखरेख आणि उत्तर—क्रियाकलाप यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले आहे. स्वयंसेवी गटांना स्थानिक संसाधनातून वस्तू तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात एनजीओची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या लेखात काही यशस्वी बचत गटांचा तपशील आहे जे सुप्रसिद्ध एनजीओच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक संसाधनांच्या सतत व्यवस्थापनाद्वारे यशस्वी झाले आहेत.

ग्रामीण समुदायांकडे जमीन, पाणी, झाडे आणि वन संसाधने आहेत परंतु बऱ्याचदा दक्षता नसते, ज्याची कमतरता या संस्था पूर्ण करतात. त्यांच्या मदतीने हे गट नैसर्गिक संसाधनांमधून प्रत्यक्ष व परिसंपत्ति तयार करतात. सामाजिक भांडवल देखील महत्त्वपूर्ण आहे कारण लोकांच्या विकासाच्या क्षमतेवर त्याचा परिणाम होतो. सामाजिक भांडवल या गटांची पुढील कार्ये प्रभावी आणि कार्यक्षम पद्धतीने पूर्ण करण्यात मदत करते:

- नियोजन आणि मूल्यमापन म्हणजे निर्णय घेणे.
- संसाधने जमा करणे आणि व्यवस्थापित करणे.
- एकमेकांशी संपर्कात राहणे आणि क्रियाकलापांचे समन्वय साधणे.
- विवाद निपटारा.

बचतगट ही सामाजिक आणि आर्थिक मध्यस्थीद्वारे सामाजिक भांडवल निर्मितीचे प्रभावी मार्ग आहे आणि लघु उद्योग सुरू करण्यासाठी ते आपल्या सदस्यांना संगठित करतात.

**स्थानिक संसाधन व्यवस्थापनासाठी बचत गटांची कार्यनीती:**

डिंडीगुल जिल्ह्यतील राडियारचटरम ब्लॉकमधील कनीवाडी गाव केळीच्या लागवडीसाठी प्रसिद्ध आहे. केळीच्या कापणीनंतर परिसरातील बचत गटांनी केळीच्या झाडाच्या कचऱ्याने सेवाग्राममध्ये हाताने कागद तयार करण्यास सुरवात केली. या गटाने हे काम शिकण्यासाठी एक महिन्याचे प्रशिक्षण घेतले होते. एम.एस. स्वामीनाथन अनुसंधान प्रतिष्ठानच्या देखरेखीखाली या गटाला स्क्रीन प्रिंटिंग देखील शिकवले गेले होते. आता हा गट हस्तनिर्मित कागद, ग्रीटिंग्ज कार्ड्स, लिफाफे, लेखन पॅड बनवित आहे आणि केळी आणि कापसाचा कचरा यासाठी वापरतो. असे करतांना हा गट कोणतीही हानिकारक रसायने वापरत नाही. संपूर्ण प्रक्रिया हाताने केली जाते आणि कागद उन्हात वाळवले जातात. यासाठी ७ लाख रुपयांच्या मशीनला एका बँक कडून कर्ज व एमएस स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन कडून अनुदान म्हणून खरेदी केली. या गटाचे सर्व सदस्य अनुसूचित जातीतील असून वर्श २००१ पासून हे यशस्वीरित्या कार्य करीत आहेत.

मातीची होणारी धूप आणि वाळवंटीकरण शेतीसाठी सतत ध ोका दर्शविते. परंतु संवेदनशीलतेने काम केल्याने, सेंद्रिय कचरा आणि कचरा पासून बनविलेले कंपोस्ट या समस्येवर मात करू शकतात. यापासून तयार होणारी कंपोस्ट खत वनस्पतींसाठी पौष्टिक असते आणि त्याचा वापर केल्यास जमिनीची उत्पादन क्षमता वाढते व त्यायोगे फायदेशीर रोपे तयार करता येतील.

डिंडीगुल जिल्ह्यतील अतहुर ब्लॉकमध्ये गांधीग्राम ट्रस्टने बचत

गटांना कंपोस्ट खत तयार करण्यासाठी प्रशिक्षण दिले. त्यांना कचरा, पाने आणि फुले, घरगुती कचरा आणि शेण यांपासून सेंद्रिय खत तयार करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. काही जंतु अशा कंपोस्ट तयार करण्याच्या प्रक्रियेत मदत करतात आणि ते कचऱ्याचे उच्च प्रतीचे खत बनवतात. या प्रकारच्या वर्मी कंपोस्ट खताला मोठी मागणी असून ते बाजारात ६ ते ७ रुपये प्रतिकिलो दराने विकले जाते.

औषधी वनस्पती डोंगरात व जंगलात आढळतात, जी आजीविकेच्या संरक्षणासाठी मौल्यवान स्थानिक संसाधने आहेत.

डोंगरात व वन क्षेत्रात उपलब्ध औषधी वनस्पती लोकांच्या आजीविका सुरक्षेचे महत्त्वपूर्ण माध्यम बनतात. डिंडीगुल जिल्ह्यातील कोडाई हिल्स आणि सिरुमलाई मधील परिसरात औषधी वनस्पतींच्या लागवडीसाठी अपार संभावना आहे. भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाने खादी व ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांच्यामार्फत लक्ष्मी सेवा संघमच्या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. स्कीम ऑफ फंड्स फॉर रिजनरेशन ऑफ ट्रेडीशनल इंडस्ट्रीज (स्फूर्ति) नावाच्या या प्रकल्पासाठी एक कोटी रुपये मंजूर झाले आहेत. याद्वारे क्लस्टर आध ारित सिद्ध आणि आयुर्वेदिक औषधी उद्योग विकसित करण्याचे उद्दीष्ट आहे. लक्ष्मी सेवा संघमने आवश्यक भांडवलासाठी ८.५ लाख रुपयांचे योगदान दिले आहे. हा प्रकल्प डिंडीगुल जिल्ह्यातील अतहुर, निलाकोट्टय , कोडईकनाल तथा तेनी जिल्ह्यातील अंडीपट्टी गटात राबविला जात आहे.

या प्रकल्पाचे मुख्य लाभार्थी ते आहेत जे तेनी व डिंडीगुल जिल्ह्यत राहतात आणि औषधी वनस्पती, झाडाची साल आणि मुळे गोळा करतात. यातील बहुतेक लोक अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत. या योजनेंतर्गत आदिवासींना मूलभूत संवर्धन कार्यात भाग घेण्यास व वनसंपत्तीला इजा न करता नैसर्गिक औषधी वनस्पती गोळा करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित केले जाते.

शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात औषधी वनस्पती वाढण्यासही प्रोत्साहन दिले जाते. असे केल्याने ते त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. सुकवण्यासाठी जागा, कोठार आणि प्रोसेसिंग युनिटसारख्या मूलभूत

सुविधा देऊन बचतगटांना आकर्षित करण्यात येते. या उद्देशाने विकास समन्वय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत आणि योजना राबविण्याच्या व प्रगतीचा मागोवा घेण्याची यंत्रणा विकसित केली गेली आहे. या योजनेंतर्गत ४१ बचत गट तयार करण्यात आले आहेत. औषधी वनस्पतींची लागवड किंवा प्रक्रिया करून किंवा विक्री करुन सुमारे ५०० कुटुंबे आपले जीवन निर्वाह करीत आहेत.

या संदर्भात अतहूर ब्लॉकमधील बचतगटांनी मिळवलेले यश उल्लेखनीय आहे. लक्ष्मी सेवा संघमसाठी कच्चा माल केवळ बचत गटांकडूनच खरेदी केला जातो. वर्श २००८ मध्ये सदस्यांकडून १ लाख रुपयांचे कच्चा माल खरेदी करण्यात आला जो एकूण खरेदी केलेल्या वस्तूंच्या २० टक्के इतका होता. लक्ष्मी सेवा संघमकडे बचत गट जलतन, शेण आणि दुधाचा पुरवठा देखील केला जातो. सिद्ध आणि आयुर्वेदिक औषधे तयार करण्यासाठी ते औषधी वनस्पती आणि जडीबूटी देतात. बचत गटातील सदस्यांना डायरेक्ट लिंकेज कार्यक्रमांतर्गत १० टक्के व्याजदराने कर्ज मिळते आणि त्यातून दुधाळ जनावरे खरेदी करतात आणि लक्ष्मी संघमला दुधाचा पुरवठा केला जातो. विपणन समर्थनाचा एक भाग म्हणून गांधीग्राम विक्री प्रतिनिधीची नेमणूक केली आहे. अशा प्रत्येक प्रतिनिधीने गांधीग्राममधील कॅनरा बँकेत आपले खाते उघडले आहे आणि प्रारंभिक भांडवल म्हणून वापरण्यासाठी १०,००० रुपयांच्या कर्ज देण्यात आला. येथून गांधीग्राम विक्री प्रतिनिधी विक्रीसाठी वस्तू खरेदी करतात. एका गटाने लक्ष्मी सेवा संघम येथे एक कॅन्टीन उघडली असून सर्व गटाचे सदस्य एकत्र काम करून नफा कमावतात. याचा फायदा घेऊन गटाच्या सदस्यांनी ४.५ एकर जागेचा भूखंड खरेदी केला आहे ज्यावर ते घरे बांधतील.

**केळीची शेती:**

या गटाच्या ९ सदस्यांनी आपले ज्ञान वापरून केळीची शेती करण्यास सुरवात केली. समूहाच्या बैठकीत असे आढळले की केळीच्या झाडाचा प्रत्येक भाग — पाने, काड्या, फुले, कच्चे फळ आणि फायबर सर्व उपयोगी आहेत. या गटाच्या सदस्यांनी तीन एकर जमीन ५० हजार रुपये किंमतीवर भाड्याने घेतली. शेतीसाठी मजुरी

देऊन कामगारांना कामावर ठेवले होते. या गटाने हिशोबाची, खात्यांची पुस्तके नियमितपणे ठेवली. चेन्नईच्या ठोक बाजारात तयार झालेले पाने व फळे विकली गेली. याचा परिणाम असा झाला की १,२१,६५३ रुपये नफा झाला जो सभासदांमध्ये समान आधारावर विभागला गेला. प्रत्येक सदस्याला २४,३३० रुपये मिळाले. हा नफा व्यवसाय सुरू करण्यासाठी वापरला गेला आणि त्याच्या मदतीने कपड्यांचा व्यवसाय सुरू केला, छोटी दुकाने उघडली, ऑटोचा रखरखाव केला आणि साड्या विकल्या. हे कर्ज १० हप्त्यांमध्ये परत केले गेले.

**संसाधनाच्या सतत व्यवस्थापनाचे कारक:**

हा उपक्रम स्थानिक संसाधनांवर आधारित आहे. वैगाई हा एकाच जातीचा गट आहे. त्याचे सर्व सदस्य रेड्डीयार समुदायाचे असून त्यांचात चांगला तालमेल आहे.

सर्व सदस्य कुनबी समुदायाचे असून सर्वांची अर्धा ते ३ एकर जमीन आहे. प्रत्येकाला शेती कशी करावी हे माहित आहे आणि ते यशस्वी शेतकरी आहेत. या उद्यमातील गुंतवणूकीसाठीचा निधी सूक्ष्म उद्यम कर्जाच्या रूपात प्राप्त झाला.

**सदस्यांमध्ये उत्साह:**

कांचीपुरम जिल्ह्यतील ओतुकाडू पंचायतीच्या ओतुकाडू गावात ८ गट कार्यरत आहेत. त्यांच्या अध्यक्षा एक महिला समाजसेविका आहेत ज्यांचे गटाच्या हिशोबखात्यावर आणि त्यांच्या संचालनावर पूर्ण नियंत्रण आहे.

या गटाने सदस्यांच्या घरामागील अंगणात किचन गार्डनचे काम सुरू केले आणि त्यांनी वांगी, भेंडी आणि पालक घेतले. त्यांना हिरव्या भाज्यांची लागवड खूप फायदेशीर वाटली आणि त्यावर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे त्यांना पौष्टिक तत्व आणि आर्थिक लाभ मिळाला. या कामात स्थानिक संसाधनाचा योगदान होता. तेथील माती हिरव्या भाज्या लागवडीसाठी अतिशय योग्य असून ओटुकुडी परिसरातील खारट पाण्याचा वापर सिंचनासाठी केला जातो. हिरव्या — भाजीपाल्याला बाजारात मोठी मागणी असून त्याची विक्रीही सोपी आहे. कांचीपुरम, चेन्नई — पल्लावरम आणि तम्बारम

सारखी शहरे आणि गावे जवळ आहेत जेणेकरून तयार वस्तूंची विक्री करण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही. बँकांपासून कर्ज सहायता मिळते आणि एसजीएसवायच्या आर्थिक मदतीने स्वत: गटाच्या सदस्यांनी यासाठी रिव्हॉल्व्हिंग फंड तयार केले आहेत.

या गटाने तीन एकर जमीन ६०,००० रुपयांवर भाड्याने घेतली आणि जमीन मालकाशी तीन वर्षांचा करार केला. संपूर्ण भूखंडात वाफे बांधण्यात आले. प्रत्येक वाफा एका सदस्यास देण्यात आला आणि सपाटीकरण, नांगरणी, पेरणी, खते, खुरपणी व सिंचन व तयार वस्तूंचे विपणन करण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले. खुरपणी व सिंचन हे स्वत: सदस्यांनी हाताळले आणि त्यासाठी मजुरांना दिवसाला १०० रुपये दिले जात. दिवसाला २५० रुपये मजूरी देवून पेरणी केली जात होती. नांगरणी, गुंडाळी व पेरणीसाठी मजुरांची मदत घेण्यात आली. सदस्यांनी चांगल्या लिफाफ्यात मालाची पैकिंग केली आणि त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे वाळूमधून सोन्याचे उत्पादन झाले. जरी हे एक समूह आधारित कार्य असले तरीही लोकांच्या वैयक्तिक उत्साहाने यात एक भूमिका बजावली.सभासदांनी शेतात जाऊन स्वत: पिकाची कापणी केली.उत्कृष्ट निकालासाठी या गटाला राज्य सरकारने मणिमेखला पुरस्कार जाहीर केला.

**सफलते चे कारण**

- हा क्रियाकलाप स्थानिक संसाधनांवर आधारित होता.
- चांगली मागणी आणि लोकांची गरज लक्षात घेऊन हा उपक्रम निवडला गेला.
- वैयक्तिक प्रयत्न हा गट क्रियांचा आधार होता.
- प्रभावी नेतृत्व.
- स्वयंसेवी संस्थांचे समर्थन
- गट गतिशीलता.
- बँकांकडून कर्जाची मदत घेण्यास सहजता ज्यामुळे गुंतवणूकीत दिक्कत आली नाही .
- चांगल्या स्थितीचा फायदा— जवळपासच्या गावे व शहरांमध्ये वस्तूंची विक्री.

या गटाने दुभत्या जनावरांची खरेदी करून एक लहान सहकारी दूध संस्था स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या कंपोस्ट खत तयार करण्याची समितीची योजना आहे.

**निष्कर्ष:**

वर दिलेल्या तपशीलांच्या विश्लेषणाचा एक सामान्य निष्कर्ष असा आहे की स्थानिक स्त्रोतांकडून आणि प्रशिक्षण घेतल्याखेरीज आजीविकेचे नवीन उद्यम सुरू करता येउ शकणार नाही. यासाठी आवश्यक तंत्रज्ञान आणि विपणन सहायता देखील खूप महत्वाचे आहे.

बचतगटाने समन्वित कार्यनीतिचा मदतीने स्थानिक संसाधनांचे प्रभावीपणे व्यवस्थापन केले. या प्रयोगांनी हे देखील सिद्ध केले आहे की जिथे जिथे गैर—सरकारी संस्थांनी उत्साहाने प्रयत्न केले आणि लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली तेथे एक समन्वित आणि गतिशील गट तयार करण्यात त्यांना यश आले. हे गट स्थानिक संसाधनांचा अधिक चांगला वापर करतात. या स्त्रोतांच्या वापरामध्ये दूरदृष्टी ठेवून काम केले गेले तर त्यांच्या मदतीने चांगले उत्पन्न मिळू शकते जे स्त्रियांसारख्या दुर्बल घटकांना सक्षम बनवते. स्वयंसेवी संस्था, बचत—गट, बँका आणि तांत्रिक संस्था अशा विविध भागधारक स्थानिक संसाधनांच्या प्रभावी आणि कार्यक्षम व्यवस्थापनासाठी प्रभावी भूमिका बजावू शकतात. सरकारचे धोरणात्मक समर्थनही त्यांच्यासाठी खूप उपयुक्त ठरेल.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. मासिक पत्रिका योजना जनवरी २००८
२. मासिक पत्रिका योजना जनवरी २०११
३. मासिक पत्रिका योजना जनवरी २०१७
४. hi.vikaspedia.in/social welfare

❑❑❑

03

# महिला सक्षमीकरणात स्वयं–सहाय्यता बचत गटाची भूमिका

**प्रा. डॉ. कांतेश्वर गजाननराव ढोबळे**
वाणिज्य विभाग,
श्रीमती केशरबाई लाहोटी महा. अमरावती

************

मानव समाजशील व विवेकशील प्राणी असल्यामुळे समाजात वास्तव्य करीत असतांना नेहमीच आपल्या प्रगतीकरिता प्रयत्नशील असतो. विकास हा सर्वांगिण होणे आवश्यक असल्याने विकासाच्या प्रगतीतील सर्व घटकांचा समावेश असणे महत्त्वाचे आहे. आर्थिक विकासासोबतच सामाजिक, राजकिय, वैचारिक, सांस्कृतिक, शैक्षणिक विकासाची प्रक्रिया आपोआप घडत असते. त्यामुळे आर्थिक विकास हा महत्त्वपूर्ण आहे. समाजाचा आर्थिक विकास होण्यासाठी व्यक्ति, समाज, कुटूंबे, सरकारे नेहमी कार्यरत असते. समाज हा स्त्रि–पुरूषांनी बनलेला असून विकास करतांना समाजातील सर्वच घटकांचा विकास अभिप्रेत आहे. दरडोई उत्पन्नात वाढ होण्यासाठी कुटूंबातील सर्वच व्यक्तीच्या हाताला काम असावे लागते. त्यामुळे समाजातील अर्धी लोकसंख्या असलेल्या महिलांना वगळून चालणार नाही.

भारतीय स्वातंत्र्याचा लढ्यात महिलाचा सहभाग होता. ज्या क्षेत्रात महिलाचा सहभाग आहे. त्या सर्वच क्षेत्रात उत्पादनाचा दर वाढला असून त्या विभागातील कुटूंबाचा आर्थिक विकास झालेला दिसून येतो. आर्थिक प्रश्न उद्भवल्यामुळे बऱ्याच लोकांना काम मिळत नाही. नविन व्यवसाय सुरू करण्यासाठी योग्य मार्गदर्शन

व पुरेशे भांडवल मिळत नसल्याने इच्छा असूनही महिलांना आपल्या ज्ञानाचा आणि क्षमतेचा वापर करता येत नाही. पर्यायाने प्रगती साधण्यास अडथळा येत असतो.

वर्तमान काळात समाज, सरकार आणि जळपास सर्वच क्षेत्रात महिलांना समानतेचे व सन्मानाचे स्थान आहे. राजकीय क्षेत्रात तर ५० टक्के आरक्षण असल्याने त्याचा फायदा महिलांना मिळत आहे. महिला मोठ्या प्रमाणात शिक्षीत व प्रशिक्षित होउन रोजगारासाठी बाहेर पडत आहे. परंतु ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले नाही, प्रशिक्षण घेण्यासाठी पुरेसा वेळ व पैसा नाही अशा महिलांनी समान उदिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी एकत्र येवून गट स्थापण करण्यात आले. त्यात थोडी थोडी बचत एकत्रीत करून सर्वाच्या ज्ञानाच्या फायदा घेउन एखादा व्यवसाय व्यापार उभारता येते. त्यामुळे आर्थिक फायदा गटातील सर्वच महिलांना होत असून सक्षमीकरणास मदत होते. याच पार्श्वभूमिवर महिलाचा आर्थिक स्तर उंचावणे त्यांना बचतीची सवय लावणे, त्यांच्या ज्ञानाचा फायदा करून घेणे यासाठी गटाची स्थापणा महत्वपूर्ण ठरते. या बचत गटाच्या माध्यमातून समाजातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या (महिलांची संख्या) कार्यप्रवण होउन आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका वटवित आहे.

भारतात १९५१ पासून आर्थिक सामाजिक विकास घडवून आणण्याचा नियोजनबध्द प्रयत्न चालू आहे. पंचवार्षिक योजना, वार्षिक योजना आखून रोजगार निर्मितीवर भर दिलेला आहे. एकात्मिक ग्रामीण विकास योजना ही सुक्ष्म वित्त पूरवठा करणारी योजना होती. गरीबी निर्मूलनासाठी व महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविल्या गेल्या. परंतु या योजनामुळे बेरोजगारी, दारिद्रय, आर्थिक विषमता, गरीबी पूर्णत: नष्ट करता आली नाही. त्यामुळे समाजाची उद्योजकता वाढीस लागावी, रोजगार निर्मिती करावी आणि त्यातुन आर्थिक विकास करता यावा यासाठी स्वयं सहाय्यता बचत गटाची योजना आकारास आली.

भारत सरकारने सर्व योजनाचे एकत्रीकरण करून १ एप्रिल

१९९९ पासून स्वर्ण जयंती ग्रामरोजगार योजनातंर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रोत्साहन देण्यास सुरूवात केली. त्या अंतर्गत गरजू व दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील सभासदांना कर्ज व अनुदान योजना राबविण्यात आल्या त्यामुळे रोजगारात वाढ झाली असून आर्थिक प्रगती साधण्यास मदत झालेली आहे.

जगामध्ये स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ लघुवित्त, बचतगट, शेजार गट, स्वयं सहाय्यता समूह गट महिला बचत गट अशा विविध संकल्पनेतून आकारास आलेल्या आहे. या संकल्पनेचा मूळ उद्देश महिला सक्षमीकरण आहे. खऱ्या अर्थाने स्वयंसहाय्यता बचत गटातून आर्थिक प्रगती साधता येते हे १९८३ साली बांग्ला देशातील प्रा. महमंद युनूस यांनी ग्रामीण विकास बॅंकेची स्थापणा करून दाखवून दिले.

स्वयंसहाय्यता बचत गटाची व्याख्या खालीलप्रमाणे करता येईल.

१. समान गरजा असलेल्या व्यक्तिनी एकत्र येवून समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एकाच प्रदेशातील व भागातील व्यक्तिनी एकत्र येवून समूह स्थापना व वृध्दिगंत करून स्वइच्छेने सहभागी होणे याला स्वयसहाय्यता बचत गट असे म्हणतात.

२. एकाच गावातील किंवा ठराविक भागातील समान आर्थिक सामाजिक स्तरामधील समविचारी समान गरजा असणाऱ्या १० ते २० महिलांच्या समूहास स्वयंसहाय्यता महिला बचत गट असे म्हणतात. म्हणजेच आर्थिक पातळी कमकुवत व्यक्तिंनी एकत्र येवून आपल्या व्यवसायाप्रमाणे लहान गट स्थापण करून दरमहा नियमित बचत करावी आणि जमा झालेल्या निधीतून सभासदांना कर्ज देण्यात यावे यामुळे सर्वांच्या आर्थिक गरजा पूर्ण केल्या जाते. तसेच आर्थिक प्रश्न सोडविल्याने रोजगारात पर्यायाने उत्पन्नात सुध्दा वाढ होण्यास मदत होते अशा समूहाला स्वयंसहाय्यता बचत गट असे म्हणतात.

**स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्ट्ये:**

१. स्वयंसहाय्यता बचत गटाचा कारभार सहकारी तत्वानुसार चालत असतो.

२. गटातील सर्व सदस्यांच्या आर्थिक प्रगती करण्यासाठी प्रयत्न करीत असतात.

३. कारभार लोकशाही तत्वानुसार चालत असल्याने सभासदत्व स्वयंप्रेरणेने मिळविता येते.

४. स्वयं सहाय्यता गट स्थापना झाल्यानंतर एक सामूहिक निधी स्थापणा करण्यात येतो. त्यात नियमित बचत करावी लागते.

५. आर्थिक दास्यातून सुटका होण्यासाठी सभासदाला अतिशय कमी दराने कर्ज उपलब्ध करून देतात.

६. सामूहिक निधी स्थापणा केल्यानंतर त्यावर बॅकेमार्फत उत्पादराने कर्ज मिळविले जाते.

७. स्वयं सहाय्यता गट स्थापण करून गटाचे संचालन करण्यासाठी अंतर्गत नियम तयार करावे लागते.

८. प्रत्येक महिण्यात सभा घेण्यात येते आणि सामूहिक घेण्यात येते.

९. बचत गटांना बॅकेमार्फत कर्ज मिळावे म्हणून १९९८ पासून केंद्रिय अर्थ संकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली.

१०.महिला बचत गटामार्फत सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जामुळे सभासदच्या सामाजिक व आर्थिक विकासावर परिणाम होवून महिला सक्षमीकरण बनविणे.

स्वयंसहाय्यता बचत गटाचा मुख्य उद्देश सभासदाचा आर्थिक विकास करून रोजगार व उत्पन्नात वाढ करणे असा असतो. स्वयं सहाय्यता गटामुळे विकासाच्या प्रणालीत स्थानिक व्यक्तिंना सामावून घेता येते. बचतीची सवय लावल्याने वारेमाप खर्च होत नसून अनावश्यक कामासाठी वापरण्यात आलेला निधी उत्पादक कार्यासाठी वापरण्यात येऊन महिलांचे सक्षमीकरण साध्‍ाता येत असल्याचे दिसून येते.

भारतात महिलानी मोठ्या प्रमाणावर बचत गटाची स्थापना करून आर्थिक सपन्नतेबरोबरच रोजगार वाढविला आहे. हाताला काम त्यातून आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याने आत्मसन्मान वाढीस

लागतो आणि खऱ्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण होत असल्याचे निदर्शनास येते. या बचत गटांना आर्थिक बळ देण्यासाठी बँका व विविध आर्थिक महामंडळे यांचे कडून आर्थिक मदत मिळत असून त्यातून महिलांमध्ये उद्योजकता वाढीस लागत आहे.

बचत गटाव्दारे निर्माण झालेली उद्योजकता:

संघटित शक्ती, पारदर्शक व्यवहार, लोकशाही तत्व आणि सहकारी तत्व प्रक्रिया एकत्र आल्यास विविध प्रकारची उद्योजकता निर्माण होते आणि समाजाच्या प्रगतीला मदत मिळते. या चळवळीतून अनेक प्रकारचे उद्योग जन्माला आले आहेत ते खालीलप्रमाणे आहे.

**१. सामूहिक दुग्ध व्यवसाय:—** कोल्हापूर जिल्ह्याच्या शाहुवाडी तालुक्यातील मानकर वाडीचा, ‘सरस्वती महिला बचत’ गटाने दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून ४०० लोकसंख्या असलेल्या गावाचा कायापालट घडविला.

**२. सॅनिटरी नॅपकिन उद्योग:—** सोलापूर जिल्ह्यातील ‘श्री जीवन ज्योती महिला विकास बचत’ गटानी सॅनिटरी नॅपकिन बनविणारा महाराष्ट्रात उद्योग काढला. सद्यस्थितीत २५ जिल्ह्यात सॅनिटरी नॅपकिन निर्मितीचे युनिट स्थापण झालेले आहे. तसेच कर्नाटकमध्ये अफजलपूरम, सिक्कीम मधील गंगटोक, हिमाचल प्रदेशातील बग्गी, बिहारमधील कर्नानेपूरम, छत्तीसगडमधील बिलासपूर या ठिकाणी महिला बचत गटाच्या माध्यमातून हा उद्योग साकारला गेला आहे.

**३. गृहप्रकल्प उद्योग :—** पूण्यातील ‘वैष्णवी बचत गटाच्या’ माध्यमातून गृहप्रकल्प उद्योग स्थापण करण्यात आला या महिला बचत गटाने पुरूषाची मक्तेदारी असलेल्या क्षेत्रात सुध्दा प्रगती घडवून आणली.

**४. वाहतूक क्षेत्रातील व्यवसाय:—** सातारा जिल्ह्यातील माजी सैनिक महिला बचत गटाने लक्झरी बसेसचा व्यवसाय सुरू केलेला आहे.

**५. कृषी विषयक कर्जे:—** सावकारी कर्जापेक्षा स्वत: बचत गटाची कर्ज देण्याचे कार्ये करीत असल्यामुळे स्वस्त दराने

कर्जे उपलब्ध होते त्यामुळे आवश्यक ती कृषीविषयक कार्ये योग्य वेळी पूर्ण होत असल्यामुळे उत्पादनात पर्यायाने उत्पन्नात वाढ झालेली आहे.

**६. ग्रामीण भागातील गिरणी उद्योग :—** बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्याचा भाग डोंगराळ आणि ग्रामीण भाग आहे. महिला बचत गटाच्या माध्यमातून गिरणी व्यवसाय सुरू केल्याने महिलांना मोठा दिलासा मिळाला.

**७. म्हैसपालन उद्योग:—** ठाणे जिल्ह्यातील मोखाड तालूक्यातील तुळ्याचा पाडा येथील आदिवासी महिलांनी एकत्र येवून 'ज्योती महिला स्वयंसहाय्यता बचत' गटाची स्थापणा केली. त्या माध्यमातून म्हैसपालन उद्योगाची उभारणी करून दुग्ध व्यवसाय केला जात आहे. या शिवाय निरगुडी तेल, रिटा साबन, नाचणी सत्व, पत्रावळ, गांडूळखत इ. सारखे उद्योग व्यवसाय त्या माध्यमातून होत आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून अनेक प्रकारचे उद्योग स्थापण करून महिलामध्ये असलेली उद्योजकतेला संधी उपलब्ध झाल्याने समाजातील अनेक महिला यशस्वीनी उद्योजक म्हणून मान्यता पावत आहे. सुक्ष्म आर्थिक बचत करून विविध महिलांचा फायदा करून सक्षमपणे आर्थिक संपन्नतेतून वाटचाल करताना दिसून येते. याचा सकारात्मक परिणाम झालेला असून समाजातील अनेक घटकांत (महिलांना) काम मिळाल्याने उत्पादन, उत्पन्न, रोजगारीत वाढ झालेली दिसून येते. त्याच बरोबर बेकारी, दारिद्रय, बेरोजगारी, आर्थिक विषमता कमी करण्यात मदत होत आहे.

याशिवाय मिरची उद्योग, हळदी, मसाला, सोयाबीनचे विविध पदार्थ, दाळ प्रक्रिया, दुग्धोत्पादन, पशुपालन, शेळीपालन, कुक्कुटपालन, आटाचक्की, खानावळ, विविध कांडप केंद्र, डेकोरेशन, पत्रावळी बनविणे, कृषीसेवा केंद्र, प्रवासी ऑटो व्यवसाय, बांबुपासुन शोभेच्या वस्तू बनविणे, किराणा दूकान, गांडूळ खत निर्मिती, विटा उद्योग, खाद्य उद्योग, दैनंदिन गरजेचा वस्तू निर्मिती उद्योग, अगरबत्ती, आकशकंदिल बनविणे, पाळणाघर, बालवाडी, अंगणवाडी चालविणे,

ब्युटीपार्लर चालविणे, कागदी डिशेस, कागदी पाकिटे, कांडी कोळसा तयार करणे इ. उद्योग महिला बचत गटाच्या माध्यमातून करता येत असल्याने उत्पन्नात वाढ झालेली दिसून येते.

महिला बचत गटामुळे खालील फायदे होतात

१. स्वयं सहाय्यता गटामुळे व्यक्ति एकत्रितपणे कार्ये करीत असल्यामूळे आपल्या बचत गट सभासदाच्या पर्यायाने समाजाची मागणी पूर्ण करता येतात.

२. महिला बचत गटामुळे सामाजिक आर्थिक प्रगतीबरोबरच सामाजिक समता निर्माण होतात.

३. समाजातील विविध धर्मातील महिलांनी एकत्र येवून बचत गटाच्या माध्यमातून उद्योग स्थापण केल्यास सलोख्याचे संबंध निर्माण होतात. त्यामुळे जातीय विषमता नष्ट होते. म्हणजेच आर्थिक विकासासोबतच सामाजिक विषमता साध ाली जाते.

४. महिला बचत गट स्थापण करतांना सरकारने विविध प्रकारच्या सवलती व अनुदान प्राप्त होत असल्याने आर्थिक विकासास फायदा होते.

५. स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून पारंपारिक परंपरा टिकून ठेवण्यास मदत होते.

६. महिला स्वयंसहाय्यता गटामुळे लोकशाही संघटन समूह विकास अर्थकारणातील स्वावलंबन सामाजिक व सांस्कृतिक मूल्य टिकवून ठेवण्यास मदत होते.

**निष्कर्ष :—**

स्वयंसहाय्यता बचत गटामूळे आर्थिक सक्षमीकरण व आर्थिक विकास साधला जात आहे ते खालील मुद्यावरून दिसून येते.

१. महिला बचत गटामुळे महिलाचा आर्थिक विकास साधला गेल्याचे दिसून येते.

२. महिलांना रोजगार प्राप्त झाल्याने उत्पन्नात वाढ झालेली असून महिला आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनल्या आहे.

३. बचत गटामुळे आर्थिक सुबत्ता आल्याने राजकीय शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात महिलाची संख्या वाढलेली आहे.
४. बचत गटामुळे उद्योजकता वाढल्याने रोजगार निर्मिती सहजच होत आहे.
५. महिला बचत गटामध्ये विविध जाती धर्मातील स्त्रिया एकत्र आल्याने जातीय सलोख्याचे वातावरण निर्माण झालेले आहे.
६. महिला बचत गटाच्या कार्यपध्दतीतून नेतृत्व विकास साध ाता आल्याने विविध क्षेत्रात महिला नेतृत्व करीत असल्याने दिसून येते.
७. महिला बचत गटामुळे ग्राम स्वराज्याची संकल्पना साकारत आहे.
८. महिला बचत गटामुळे रोजगार निर्मिती झाल्याने शहराकडे होत असलेले स्थलांतरण थांबलेले आहे.

या सर्व मुद्यावरून महिला स्वयसहाय्यता बचत गटामुळे सक्षमीकरणात मोलाची साथ लाभलेली आहे हे निर्विवाद सत्य आहे.

**संदर्भ:—**

१. महिला स्वयं सहाय्यता बचत गट— प्रा. एम.यू. मुलाली
२. महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या १०१ वाटा — एस. बी. पवार, पृथ्वीराज प्रकाशन, पूणे
३. बचत गटातून कृषी उद्योजक— कृषीभूषण वि.ग. राउत, सुविधा प्रकाशन सोलापूर
४. महिला बचत गट — चौधरी लॉ पब्लिशर्स
५. स्वयसहाय्यता गट — बॅक संलग्नता कार्यक्रम
६. योजना लोकराज्य अर्थसंवाद मासिक
७. योजना विकास समर्पित मासिके अंक ११ जून २०१० (प्रकाशक माहिती आणि प्रसारण मंत्रालय भा.स.)

❑❑❑

**04**

# महिला सक्षमीकरण आणि बचत गट

**डॉ. अनंत मदन आवटी,**
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
श्री.व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगावराजा, जि. बुलडाणा

************

शतकानुशतके पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विचारांच्या चौकटीत स्त्रियांना अजुनही दुय्यम स्थान आहे. प्रत्येक देशातील अर्धी मानवशक्ती ही स्त्री शक्ती आहे. पण पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्री शक्तीला बंदिस्त केल्यामुळे ही स्त्री शक्ती अडगळीतच पडली. त्याचे परिणाम गंभीर स्वरुपात पुढे आले. दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्री प्रश्नांना चालना मिळाली. इ.स. १९६० ते १९७० च्या दशकात स्त्री चळवळी जोमाने उभ्या राहील्या व त्यातून महिला सबलीकरणाचा विचार पुढे आला. इ.स. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून पाळल्या गेले. तर इ.स. १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून घोषित केल्या गेले. इ.स. १९७५, १९८०, १९८५ व इ.स. १९९४ या वर्षी महिला परिषदा संपन्न झाल्या. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने महिला हक्क सनदेला दि. १८ डिसेंबर १९७९ ला मंजुरी दिली. संयुक्त राष्ट्राच्या या पावलाच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑगस्ट १९९० ला भारतात राष्ट्रीय महिला आयोग कायदा संमत करण्यात आला. २००१ हे वर्ष भारत सरकारने महिला सबलीकरण वर्षङ घोषित करुन वेगवेगळया कार्यक्रमाचे आयोजन केले. कोणत्याही व्यक्तीला संधी मिळाली तर तो पुढे जाऊ शकतो. महिलांना संधी मिळाली तर त्याही कर्तृत्व गाजवू शकतात हे असंख्य महिलांनी जगाला सिध्द करुन दाखविले आहे.

पूर्वी 'चूल आणि मूल' एवढंच कार्यक्षेत्र असलेल्या महिला आज पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. सावित्रीबाई

फुलेंचा आदर्श पूढे ठेवून आणि त्यांची प्रेरणा घेऊन अनेक महिला आज यशाची शिखरे गाठत आहेत. ग्रामीण भागातील महिलासुद्धा याला अपवाद नाहीत. अनेक क्षेत्रात ग्रामीण महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. बचत गटाच्या लाखो महिलांनी माध्यमातून आर्थिक स्वातंत्र्याकडे, स्वावलंबनाकडे आणि प्रगतीकडे वाटचाल सुरु केली आहे. केवळ आर्थिकच नव्हे तर समाज भवितव्याला आकार देऊ पाहणाया या महिलांना समाजात आत्मसन्मान मिळाला आहे. या महिला समाजातील अन्य महिलांसाठी पथदर्शी ठरत आहेत. महिला बचत गट ही केवळ योजना नसून महिला सबलीकरण, सक्षमीकरण आणि सशक्तीकरणाची एक सुप्त क्रांतिकारी चळवळ आहे. बचत गटांमुळे महिलांमध्ये संघटनशक्ती, स्वविकास व सामाजिक विकासाची जाणीव निर्माण झाली आहे.

**बचतगट : एक चळवळ :—**

बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेते व बचत गटांच्या चळवळीचे जनक डॉ. महंमद युनूस यांनी राबविलेल्या बचत गटाच्या प्रयोगाला बांगलादेशात अभूतपूर्व यश मिळाले. महिलांमध्ये बचत गटाच्या माध यमातून कमालीचा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांनी जाबेरा या गावात गरीबांच्या बचतीतून ग्रामीण बँकेचा प्रकल्प सुरु केला. ग्रामीण बँकेकडे बांगला देशात आज ९६ टक्के महिला सदस्य आहेत व ९० टक्के शेअर्स महिलांच्या मालकीचे आहेत. बांगलादेशातील गरीबी दूर करण्यासाठी व कुटुंबे आत्मनिर्भर राहण्यासाठी डॉ.युनूस यांनी बचत गट हे माध्यम लोकांच्या हाती सोपविले आहे. याच धर्तीवर भारतामध्ये १९९० च्या दशकात नाबार्ड, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामविकासाच्या योजना राबविल्या जात आहेत. या यशातून प्रेरणा घेऊन भारतानेही बचत गटांच्या माध्यमातून लघुत्तम उद्योगांना चालना देण्यास सुरुवात केली. बचत गटांच्या स्थापनांमुळे बचतीच्या सवयीबरोबरच स्वयंरोजगार करण्याची प्रेरणा महिलांना मिळाली आहे. चूल आणि मूल इतकेच विश्व असणा.या महिला आज बचत गटाच्या माध्यमातून बाह्य जगाच्या संपर्कात आल्या आहेत.

बचत गटामुळे गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. महिला सक्षमीकरणात बचतगटाचा मोठा वाटा आहे. बचतगटाच्या

माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या वाटेवरुन जाण्यास साहाय्य झाले आहे, व त्यांना आत्मसन्मान मिळवून दिला आहे. आज महिलांनी अनेक उद्योग. व्यवसाय बचत गटाच्या माध्यमातून उभारले आहेत व त्यांनी तयार केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळावी म्हणून शासनही प्रयत्नशील आहे. महिलांमध्ये असणारे संवादकौशल्य, वेळेचे नियोजन, अर्थकारणाची सांगड, जबाबदारीची जाणीव, जोखीम स्वीकारण्याची वृत्ती, परिस्थिती हाताळण्याची कला, त्यामध्ये यशस्वी होण्याची क्षमता, नेतृत्व गुण, कामातील नीटसपणा, चोख व्यवहार या उपजत उद्योजकीय गुणांचा वापर करून बचत गटातील महिला उद्योग क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करू शकतात.

गावातील पाणीपुरवठयासंबंधी निर्णयही महिला बचतगटाच्या माध्यमातून घेत आहेत. तंटामुक्ती गाव मोहिमेअंतर्गत अनेक गावातून बचतगटांचा सकारात्मक दबाव गट दिसून येत आहे. दारु बंदी, दारुची दुकाने बंद करणे यामध्ये महिला सहभाग अधिक दिसून येत आहे. बचत गटामुळे महिलांमध्ये सहकाराची भावना वाढीस लागली असून काही बचतगट समुपदेशनाचे कार्यही करीत आहेत. बचत गटाच्या माध यमातून एकत्रित आलेल्या महिलांनी गांडूळ खत, शेती व शेतीपूरक उद्योग, कुटीर उद्योग, सामूहिक शेती, कुक्कुटपालन, शेळी व म्हैस पालन, मळणीयंत्र, हळद पॉलिस यंत्र, शेती साहित्य खरेदी करुन भाड्याने देणे, किराणा दुकान, जनरल स्टोअर्स, भाजीपाला विक्री केंद्र, नर्सरी, कॉम्प्युटर लॅब यासारखे उद्योग कार्यान्वित केलेले आहेत. दरवर्षी राज्य आणि केंद्र शासनातर्फे विविध विभागाच्या सरस प्रदर्शनामध्ये वस्तूंची विक्री केली जाते. अनेक ठिकाणी सरकारी कार्यालयाच्या आवारातील स्टॉल किंवा स्टेशनरी दुकान बचत गटातील महिला चालवतात. शालेय पोषण आहाराचे काम महिला बचत गटाकडे दिले गेले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळामधील गणवेषांची शिलाई बचतगटामधील महिलांकडून करुन घेतली जात आहे.

**बचतगटातून नेतृत्व विकास :—**

बचतगटांच्या चळवळीतूनही सक्षम महिला नेतृत्व उभं राहिलेलं आहे. स्त्रिया मोठया पमाणात राजकारणात आल्या तर राजकारणाचा

आजचा पोत बदलेल. स्त्रियांची आपल्या आसपासच्या परिस्थितीकडे, प्रश्नांकडे बघण्याची स्वत:ची अशी वेगळी दृष्टी असते. पर्सनल ते पोलिटिकल याची उत्तम समज स्त्रीला असते. उदाहरणच द्यायचे तर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणानंतर स्त्रिया पोहोचल्या तेव्हा त्यांच्या कामांच्या प्राधान्यक्रमामध्ये घरोघरी पाणी, वीज, गावात शाळा असणे, शिक्षक रोजच्या रोज येणे, एसटी रोज येणे, गावातले रस्ते चांगले असणे हे मुद्दे होते. त्याआधी हे प्राधान्यक्रमच नव्हते. कारण रोज पाच.सहा मैलांवरून पाणी पुरुषांना आणावं लागत नव्हतं. वीज नसल्यामुळे, शाळेची अवस्था चांगली नसल्यामुळे, शिक्षक रोज येत नसल्यामुळे आपल्या मुलांची होणारी लांबच्या गावची पायपीट बघून ती रोजच्या रोज हळहळत होती. गावात शाळा नसल्यामुळे सुरक्षेच्या अभावी आपली लेक दुसऱ्या गावात शिकायला पाठवता येत नाही म्हणून तिचा जीव तुटत होता. थोडक्यात सांगायचे तर आपले प्रश्न हे सगळयांचेच आहेत हे गृहीत धरून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांनी काम केलं. त्यामुळे त्यांनी मोठया संख्यने राजकारणात येणं गरजेचे आहे. महिला आज राजकारणात येत आहेत. तुलनेत त्यांची संख्या कमी जाणवते, पण राजकारणात महिला आपला ठसा उमटवू शकतात हे आता पंचायत व महापालिका पातळीवर सिद्धच झालं आहे. स्त्रीशक्ती एकत्र येऊन गावातले दारूचे गुत्ते बंद पाडू शकते. तर ती त्याच संख्येने राजकारणात आली तर राजकारणाचा स्तर नक्कीच उंचावेल. कारण स्त्रिया या वास्तव मान्य करून त्यावर तोडगा काढण्यात कुशल असतातच.

**स्थानिक स्वराज्य संस्था आणि बचतगट :—**

भारतामध्ये प्रथमच महाराष्ट्रात सन १९९० मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले. महिलांना राजकीय शिक्षण मिळण्यासाठी आणि महिला सबलीकरणासाठी सन १९९३ मध्ये ७३ व ७४ घटनादुरुस्ती करण्यात आली आणि त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. त्यामुळे कोणतीही सामाजिक व राजकीय कार्याची पार्श्वभूमी नसलेल्या महिला थेट निवडणुकीच्या रिंगणात आल्या, लोकप्रतिनिधी बनल्या. ते

आरक्षण आता ५० टक्के टक्के करण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांच्या राजकीय सहभागाचे प्रमाण पूर्वीपेक्षा वाढले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा वाढता सहभाग हे ही बचतगटाचे एक यश आहे.

**बचत गट चळवळी व स्त्रियांचा राजकारणातील वाढता सहभाग :**

१. महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या राजकारणात व सत्ताकारण व ग्रामीण बहुजन शेतकरी जाती वर्गातील व विशेषत: उपेक्षित आदिवासी. दलित व इतर मागासवर्गीय महिलांचा हा वाढता सहभाग सामाजिकदृष्टया मैलाचा दगड ठरणारी बाब आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा वाढता सहभाग हे ही बचतगटाचे एक यश आहे. ग्रामसभांमध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे. ग्रामीण भागातील सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा यापासून वंचित राहिलेल्या कुटुंबातून महिला नेतृत्व उभे राहते आहे व ग्रामीण भागातील हजारो महिला चुल व मुल या पारंपरिक भूमिकेबाहेर पडून सार्वजनिक जीवनाच्या निर्णय प्रक्रियेतील एक ठळक घटना बनलेल्या आहेत. याचे सकारात्मक असे दूरगामी परिणाम ग्रामीण भागातील सामाजिक. आर्थिक जीवनावर व स्त्रियांच्या वर्तन पध्दतीवर पडणार आहेत व पडत आहेत. यामध्ये शेकडो महिला लोकप्रतिनिधी अशा आहेत की, त्यांना प्रथमच सार्वजनिक जीवनात राजकीय प्रतिष्ठेचे पद मिळालेले आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे या महिला अशा आहेत की, ज्यांच्या घरात प्रथम अशी सार्वजनिक जीवनात कार्य करण्याची संधी या महिला लोकप्रतिनिधींमुळे मिळाली आहे. पंच वा सरपंच झालेल्या या महिलांना आपल्या कुटुंबात सत्तेच्या वर्तुळात आणले आहे. सत्तेच्या परिघाबाहेरची ही कुटुंब सत्ताकारणाचे वाटेकरी होत आहेत ही घटनाच सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने व लोकशाही प्रगल्भ होण्याचे फार मोठे पाऊल आहे (कुळकर्णी, २००४:४२).

२. बचत गटात नेतृत्व तयार झाल्याने स्त्रिया राजकारणात आल्याने समाजातल्या समस्यांचा, राजकारणाचा स्त्रियांच्या अंगाने विचार सुरू झाला आणि हे केवळ आरक्षणामुळे शक्य झालं. स्त्रियांच्या राजकीय सहभागामुळे पाणी समस्या, आरोग्य, शिक्षण या समस्या समाजासमोर आल्या आणि त्यांचं निवारण करण्यासाठी आवाज उठवला

जाऊ लागला, ही स्त्रियांच्या राजकारणातल्या सहभागाची सकारात्मक बाजू आहे.

३. बचत गटातील स्त्रियांनी गावातल्या राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घ्यायला सुरुवात केल्यानंतर दारूबंदी झाली. पाण्याची समस्या सुटायला मदत झाली. या स्त्रियांची ज्या वेळी ग्राम पंचायतीवर निवड झाली त्यावेळी त्यांना कोणताचा आत्मविश्वास नव्हता. पण त्यांना दिल्या गेलेल्या प्रशिक्षणानंतर त्यांच्यामध्ये हा आत्मविश्वास आला. गावासाठी कोणती कामे आवश्यक आहेत, ती कशी करवून घ्यायची, सभेमध्ये कसं बोलायचे, कायदे काय आहेत या गोष्टींचं त्यांना हळूहळू ज्ञान मिळत गेले आणि त्याचा परिणाम गावाचा विकास होण्यामध्ये झाला.

४. बचत गटातील महिलांचा आत्मविष्वास वाढल्याने त्या महिला आणि पुरुष दोघांशीही संवाद साधू शकतात. त्या घरातल्या स्त्रीला मतदानाचं महत्त्व पटवून देऊ शकतात. एखाद्या घरातली स्त्री जर मतदानासाठी बाहेर पडणार असेल तर त्या घरातले इतरही नक्कीच मतदान करतील. त्यामुळे स्त्रियांचा राजकारणातला वाढलेला सहभाग मतदारांचा सहभाग वाढवण्यावरही परिणाम करू शकतो (चवाथे, २०११).

५. बचतगटामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या नेतृत्व विकासाला चालना मिळाली आहे. बचतगटातून अनेक महिला आज जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी आहेत.

एकंदरीत बचतगट हे महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय वाढीस साहाय्यकच ठरत आहेत. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व एकत्रित होतील तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरु शकतील खऱ्या अर्थाने त्यांचे सबलीकरण होईल. सामाजिक स्वास्थ्यासाठी दबावगट निर्माण करण्यासाठी महिलांना या बचतगटाचा अस्त्रासारखा वापर नक्कीच करता येईल. बचत गट म्हणजे महिला सक्षमीकरणासाठी मिळालेले वरदान आहे. यातून महिलांना आर्थिक बचतीचे महत्व कळाले, महिलांत संघटनशक्ती निर्माण झाली, त्या स्वयंरोजगाराच्या दिशेने वाटचाल करु लागल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिला आपला आणि पर्यायाने समाजाचा विकास साधत आहेत. बचत गटाच्या माध् यमातून सुरु झालेली क्रांती निश्चितच राज्याच्या व देषाच्या प्रगतीत

उत्क्रांती घडविण्यास मदतगार ठरेल.

**संदर्भ सूची :**


- कुळकर्णी, लीना, २००४, महिला सबलीकरण: स्वरुप व समस्या, औरंगाबाद, वरद प्रकाशन.
- चवाथे, अनुजा, २०११, आरक्षणातलं बेटर हाफ, सा. लोकप्रभा, ६ मे २०११.
- चोरमारे, व्ही., २००४, स्त्री सत्तेची पहाट, कोल्हापूर, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस.
- मांडवेकर, अभय, २०११, ५० टक्के महिला आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय!, दै. ऐक्य, १७ एप्रिल २०११
- मुळे .जोशी, वरदा, २०१३, महिलांचे नेतृत्व घडवण्यासाठी... दै. महाराष्ट्र टाईम्स, २६ एप्रिल २०१३,
- सामंत, एम., २०००, स्त्री पर्व, पुणे, सुगावा प्रकाशन.


❑❑❑

**05**

# स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सबलीकरण

**प्रा. डॉ. जया सवाईथूल**
सहायक प्राध्यापक श्रीमती के. ला. महाविद्यालय, अमरावती

***********

**सारांश —**

महिला सबलीकरण आणि महिलांचा आर्थिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महिला सबलीकरण झाल्याशिवाय महिलांचा आर्थिक किंबहुना सामाजिक, शैक्षणिक, राजकिय, सांस्कृतिक विकास होवू शकत नाही. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे, आणि स्त्री पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात. दुर्बल महिलांना सबल करणे व त्यांना समान वागणूक व हक्क प्राप्त करून देणे हेच सबलीकरणामागील तत्त्व आहे. हे सबलीकरण स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातून व्हावे याकरिता केंद्र शासनाने १९९७ मध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना व १ एप्रिल १९९९ मध्ये सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना राबविण्यास सुरवात केली. या योजनेच्या माध्यमातून बचत गट स्थापन करण्यात येत आहेत. महिलांना बचत व काटकसरीची सवय लागावी, त्यांचे दारिद्रय दूर व्हावे याकरिता बांगलादेशात महंमद युनुस यांनी सूक्ष्म वित्त पुरवठयाचे प्रयोग करणे सुरू केले. इतर देशात बचत गट चळवळ मोठया प्रमाणात फोफावली आणि याचा परिणाम म्हणजे भारत देशात ही महिलांच्या आर्थिक

विकासासाठी बचत गट स्थापनेला सुरवात झाली. महाराष्ट्र सरकारने १९९४ मध्ये पहिले, २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहीर केले. या धोरणामध्ये स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, मुद्रा योजना यांचा विचार केला गेला. तसेच स्वयंसहायता बचतगटांच्या स्थापनेवर भर देण्यात आला.

**प्रस्तावना—**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्टया सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इत्यादी क्षेत्रात काम करत असतात परंतु त्या कामाची कधीच मोजमाप केली जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही. महिलांचे आर्थिक सबलीकरण घडवून आणण्याचे स्त्रोत म्हणजे बचत गट होय. महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वत:चा, कुटुंबाचा व पर्यायाने देशाच्या विकासाला हातभार लावल्या जातो. बचत गटाची सुरवात बांगला देशात झाली. भारतात १९७४ मध्ये गुजरातमध्ये सेल्फ इम्प्लॉयमेंट वुमेन्स असोसिएशन (सेवा), कर्नाटकात मायराडा, राजस्थानमध्ये प्रधान, तामिळनाडूमध्ये आसेफा इत्यादी स्वरुपात बचत गटाची संकल्पना आली. मात्र भारतात ख—या अर्थाने १९९७ च्या स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना आणि १९९९ च्या स्वर्ण जयंती ग्रामीण स्वरोजगार योजना यांच्या रुपाने भारतात बचत गट निर्मितीस सुरुवात झाली.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनाकरिता दुययम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यात प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे शोधनिबंधाच्या अभ्यासाची योग्य मांडणी केलेली आहे.

**संशोधनाचा उद्येश—**

१. स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचा अभ्यास करणे.

२. बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या व्यक्तिगत विकासाचे अध्ययन करणे.

३. महिलांच्या आर्थिक सबलीकरणाचे अध्ययन करणे.

**स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय?**

स्वयंसहाय्यता बचत गट हा स्त्रियांनी एकत्र येवून निर्माण केलेला गट आहे. समान प्रदेशातील, समान गरजा असणा—या, समान व्यवसाय करणा—या स्त्रिया ऐच्छिकपणे एकत्र येवून दर महिन्यास नियमितपणे बचत करतात, जमा केलेल्या एकत्रित रकमेतूनच त्या आपल्यातील गरजू व्यक्तिंना कर्ज देतात ज्या द्वारे त्यांची एखादी महत्त्वाची गरज पूर्ण होते व ज्या लोकशाही पध्दतीने संघटीत होवून कार्य करतात. अशा किमान दहा आणि अधिकतम वीस महिलांच्या संघटनास बचत गट म्हणता येतो. दारिद्र्य निर्मूलन हे बचत गटाचे उद्यिष्ट आहे. दारिद्र्य निर्मूलनाबरोबरच महिलांच्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक सबलीकरणावर भर दिला जातो.

**बचत गटाची वैशिष्ट्ये**

- बचत गटाचा लहान आकार
- समान हितसंबंध
- समान व्यवसाय
- एकजिनसीपणा
- लवचिकता
- लोकशाही पध्दती
- साधा दस्तऐवज
- सामूहिक नेतृत्व
- परस्पर सहमतीने निर्णय
- जागृती
- सामाजिक व आर्थिक सबलीकरण

बचत गटापासून सभासदांना अनेक फायदे होतात. भारतातील

महिलांची हलाखीची स्थिती पाहता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बचत गटाची जास्त आवश्यकता आहे.

**स्वयंसहाय्य बचत गटाची कार्यपध्दती—**

- बचत गट एक बैठक घेवून स्थापन करुन त्याला विशिष्ट नाव द्यावे लागते.

➢ त्याच गटाच्या नावाने बॅकेत संयुक्त खाते उघडून पदाधिकाऱ्यांनी जसे, अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष यांनी या खात्याचा कारभार पहावा लागतो.

➢ विशिष्ट दिवस नियमीत व निश्चीत बचत केल्यानंतर बचत गटांची प्रतवारी केली जाते व त्यावरुन कर्जाचे वाटप केले जाते. परतफेडीचे शिस्तबध्द वेळापत्रक तयार केले जाते.

- बचत गटाच्या संचलनासही नियमावली बनवली जाते व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते.
- सामाजिक प्रश्नांची हाताळणी केली जाते.
- दुसऱ्या बचत गटासोबत संबंध व जवळीकता निर्माण केली जाते.
- हिशोबाची नियीमत तपासणी केली जाते.

**स्वयंसहाय्यता बचत गटात महिला अध्यक्षाची भूमिका —**

- गटाची सभा दरमहा घेणे.
- सर्व कागदपत्रे जबाबदारीने सांभाळणे.
- सभासदांकडून घेतलेल्या बचतीची पोहच ठेवणे.
- गटाच्या विकासासाठी नेहमी प्रयत्नशील राहणे.
- बचत गटाच्या प्रगतीसाठी आवश्यक ते सर्व निर्णय सदस्यांच्या निर्णयाने घेणे.
- कर्जाची वसूली करुन नियीमत हप्ता भरणे.

**स्वयंसहाय्यता बचत गटात महिला सचिवाची भूमिका —**

- अध्यक्षाच्या गैरहजेरीत काम पाहणे.
- अध्यक्षास वेळोवेळी सहकार्य करणे.
- गटाचे संपूर्ण रेकॉर्ड व्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी सचिवाची आहे.

**बचत गटामुळे महिलांना झालेले व्यक्तिगत फायदे—**

- महिलांमध्ये जागृती निर्माण झाली. आपण स्वत:च्या पायावर उभे राहून भविष्यात काहितरी करावे ही जाणीव निर्माण झाली.
- महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला.
- महिलांच्या उपक्रमशिलतेत वाढ झाली. त्यांची गतीक्षमता वाढली. नवनवीन गोष्टी त्यांना बघायला व शिकायला मिळाल्या.
- बैठकित सहभाग घेण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे त्यांची निर्भयता व आत्मनिर्भरता वाढली
- स्वयंरोजगारात वाढ होवून त्यांचे वैयक्तिक उत्पन्न वाढले.
- त्यांचा परिणाम म्हणून महिलांचा कुटूंब व समाजातील मानसन्मान वाढला.
- निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला.
- महिला विविध कामासाठी घराबाहेर पडून विविध कार्य पार पाडू लागल्या. चाकोरीबध्द आयूष्यातून नवीन दिशा त्यांना मिळाली.
- महिलांच्या बचत गट सहभागामुळे त्यांचा आर्थिक, सामाजिक व राजकिय विकास होण्यासाठी मदत झाली.

**बचत गटामुळे महिलांना होणारे आर्थिक फायदे—**

- महिला सभासदांना नियमित बचतीची चांगली सवय लागते.
- गटाच्या माध्यमाने कागदपत्रांच्या त्रासाशिवाय, विनातारण केवळ सहसभासदाच्या हमीवर कर्ज मिळते.
- गटाला गट स्थापन झाल्यापासून एका वर्षानंतर प्रत्येक सदस्यामागे रु. २०००/— पर्यंत फिरता निधी सदस्य संख्येवर एकदाच देण्यात येतो.
- गटातील सभासदांना सामुहिक स्तरावर उपक्रम राबविण्याकरिता आर्थिक साहाय्य मिळते.

**स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम व त्यातून महिलांना झालेले लाभ –**

- गटाच्या बैठकीत प्रार्थना, भजन, पुस्तक/वृत्तपत्र वाचन करणे.
- अंगणवाडी सेविका, शिक्षक, डॉक्टर, बॅंक अधिकारी, स्वयंसेवी संस्था, प्रकल्प अधिकारी, समूह संघटक वगैरे जाणकारांना निमंत्रीत करुन मार्गदर्शन घेणे.
- निरक्षर सदस्यांना साक्षर करणे.
- वस्तीतील इतर गरीबांना बचत गट तयार करण्यास प्रवृत्त करणे व मार्गदर्शन करणे.
- गावातील पिण्याचे पाणी यावर चर्चा करणे.

➢ महिलांवरील अन्याय, कुटूंबातील आरोग्य आणि शिक्षण व उत्पन्न वाढीच्या प्रकल्पावर चर्चा करणे.

➢ बचत गटाचा व्याजदर, साधारण बॅंकापेक्षा जास्त व सावकारापेक्षा कमी असतो, बचत गटाची संलग्नित बॅंक कोणती, शिल्लक किती आहे, बचत किती आहे, अंतर्गत कर्जवाटप किती व कोणाला केले आहे, थकबाकी कोणाकडे आहे याबाबतची माहिती सर्वांना करुन देणे.

➢ अनुदानाचा लाभ दारिद्र्य रेषेखालील गटांना मिळालेला आहे. हे कर्ज गरजेपेक्षा कमी मिळाले असल्यामुळे मिळालेल्या कर्जातून तडजोड करुन व्यवसाय वृध्दीसाठी त्याचा वापर कसा केला आहे याची माहिती सर्व सदस्यांना करुन देणे.

- अनेक धर्माचे लोक एकत्रित येतात. त्यामुळे सर्वधर्मसमभाव ही भावना जोपासली जाते.

➢ बचतीची सवय वाढली, कर्ज, प्राप्ती, विविध सामाजिक व आर्थिक उपक्रमामध्ये सहभाग, गतीक्षमतेत वाढ, आर्थिक स्वातंत्र यात वाढ, कुटूंब व समाजातील मान सन्मानात वाढ, आहार व आरोग्य स्थितीत सुधारणा, शिक्षण–प्रशिक्षणात वाढ इत्यादी कौशल्यांचा विकास बचत गटामुळे झाला.

➢ सामाजिक व राजकीय सहभाग, समाज कार्यासाठी महिला घराबाहेर पडल्या व समाजकार्यात सहभाग घेवू लागल्या. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला.

➢ महिलांना अध्यक्ष आणि सचिवांची कोणती कामे असतात याचे ज्ञान प्राप्त होते, त्यांच्यात जबाबदारीची जाणिव निर्माण होते. व्यवस्थापन कौशल्यात वाढ होते. नियोजन करण्यास मदत होते.

➢ संवाद स्वातंत्र्य व संवाद कौशल्यात वाढ, अधिकाराने व निर्भयपणे विविध कार्यालयात आपले मत मांडू शकते. कुटूंबातील विविध निर्णय घेतांना तिला विचारले जाते. शिक्षणाच्या बाबतीत मुली व मुलांना समान वागणूक दिली जाते. छळाचे प्रमाण घटले, शासनाच्या योजनांची माहिती मिळते. रुढी, परंपरा, अंधश्रध्दा कमी झाल्या. ध्वजवंदन, ग्राम स्वच्छता, लसीकरण अशा कार्यक्रमात सहभाग वाढला, समाजातील असहाय व निराधारांना मदत करण्याचे प्रमाण वाढले.

➢ स्त्रीया मतदान स्वत:च्या मर्जीने करतात. बचत गटात मतदान सर्वानुमते होते पण राजकीय सहभागासाठी महिलांना बचत गटाकडून प्रोत्साहन मिळते.

**महिला स्वयंसहायता बचत गटासमोरील समस्या—**

- ➢ महिलांमध्ये प्रचंड निरक्षरता दिसून येते. त्यांना उद्योग व्यवसायासंबंधीचे ज्ञान नसते.
- ➢ त्यांचे दरडोई उत्पन्न कमी असते.
- ➢ रोजगार संधीची कमतरता दिसून येते.
- ➢ समाजात दुय्यम दर्जाची वागणूक मिळते.
- ➢ राजकीय सत्तेत कमी वाटा असतो.
- ➢ महिलांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराचे प्रमाण मोठे असते.
- ➢ महिला स्वयंसहायता गटातील महिलांना उद्योग व्यवसायाबद्दलचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नाही.

➢ महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंना योग्य बाजारपेठ मिळत नाही.

**निष्कर्ष—**

महिलांचे आर्थिक दारिद्रय दूर करण्यासाठी महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची मदत होत आहे.समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळत आहे. महिलांमध्ये उद्योजकता वृत्ती वाढून त्या आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनत आहेत. महिलांचा आत्मविश्वास वाढत आहे. महिलांमध्ये स्वअस्तित्वाची जाणीव निर्माण होवून समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळत आहे. महिलांच्या आर्थिक विकासाबरोबर त्यांच्या कुटूंबाचा व पर्यायाने देशाचा व समाजाच्या विकासास हातभार लागत आहे. स्वयंसहायता गटाची चळवळ महिलांच्या भवितव्याला आकार देण्याचे कार्य सक्षमपणे करीत असून आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही स्फुर्तीदायक बाब आहे. महिलांच्या विकासात महिला स्वयंसहाय्यता बचत गट एक मैलाचा दगड ठरत असून नजीकच्या भविष्यात भारताला महासत्ताक बनविण्यासाठी स्वयंसहाय्यता गटाची मोलाची कामगिरी आहे.

**शिफारशी—**

- बचत गटाच्या कार्यात तळागाळातील महिलांचा समावेश होणे आवश्यक आहे.
- सरकारने महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून अर्थसंकल्पाची मांडणी करावी.
- महिला स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांना विविध उद्योग व व्यवसायासंबंधी प्रशिक्षण व माहिती देण्यात यावी.
- महिला स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तुंना योग्य बाजारपेठ मिळवून देण्यात यावी.
- महिला स्वयंसहाय्यता गटांना बॅकामार्फत करण्यात येणारा कर्जपुरवठा विनाविलंब करण्यात यावा.
- बचत गटाचे कार्य सक्रिय उद्योगाच्या स्वरुपात सुरू राहणे आवश्यक आहे.

**संदर्भ—**

१. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अमरावती महानगर पालिक अमरावती सभासद नोंदवही
२. महिला बचत गट पुस्तीका— श्री. मोहन वैद्य, प्रकाशन विश्व पुणे—२००५
३. महिला स्वयंसहायता बचतगट—प्रा. एम.यु. मुलाणी, डायमंड पब्लिकेशन पुणे २००६
४. महिला स्वयंसहाय्य समुह हस्त पुस्तिका
५. लोकराज्य मासिक मार्च २००८, महाराष्ट्र शासन, मुंबई

❑❑❑

06

# स्वयं सहायता गट व महिलांचे सक्षमीकरण

**डॉ. एम. आर. दातीर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
जगदंब महाविद्यालय अचलपूर शहर, जि. अमरावती

***********

**प्रस्तावना :** भारत हा विकसनशील देश आहे. स्वातंत्र्याच्या सहा दशकानंतरही

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] बचत गटांना आपले उत्पन्न वाढविण्यास त्याचे राहणीमान व सामाजिक स्थिती सुधारण्यास सक्षम मदत करतात. समाजातील हा विभाग मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ते उत्प्रेरक म्हणून काम करतात.

भारत सरकार व विविध राज्य सरकार ग्रामीण उन्नतीसाठी विविध कार्यक्रम राबवित आहेत. अजूनही ग्रामीण दारिद्र्य व बेरोजगारी कायम आहे. ही समस्या तीव्र होत आहे. भारतीय अर्थव्यवस्थे संदर्भात उपलब्ध असलेली आकडेवारी दर्शविते की देशातील एकूण लोकसंख्येपैकी २६ टक्के लोकसंख्या गोरगरिबांची आहे. राष्ट्रीय घरगुती पातळीवर महिला ही भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्त्वपूर्ण भाग आहे. पुरुषाच्या तुलनेत भारतीय स्त्रिया त्यांच्या उत्पन्नाचा मोठा वाटा मूलभूत कौटुंबिक देखरेखीसाठी देतात.

**बचत गटाची संकल्पना :**

बचत गटाच्या संकल्पनेचा मूळ सहकारी संस्थेत आहे. राष्ट्रीय फेडरेशन सह, तत्वज्ञान आणि सह-ऑपरेटर क्रेडीट सेक्टर, प्राथमिक सहकारी पतसंस्थेपेक्षा कोणत्याही चांगल्या बचत गटाचा विचार करू शकत नाही. स्वयंसहायता गट हे ग्रामीण आणि गरीब लोकांसाठी एकसारखे आत्मीय गट आहे. या गटा मधील लोक पुढील गोष्टी साध्य करण्यासाठी स्वेच्छेने एकत्र येतात.

१. नियमितपणे कमी पैशाची बचत करण्यासाठी.
२. सामान्य फंडाचे योगदान देण्यास परस्पर संमती देणे.
३. त्यांच्या आपात्कालीन गरजा पूर्ण करण्यासाठी.
४. सामूहिक निर्णय घेणे.
५. सामूहिक नेतृत्व परस्पर चर्चेद्वारे संघर्ष सोडविणे .

आज बचत गट चळवळीला अधिकाधिक म्हणून स्वीकारले जात आहे. भारता सह अनेक विकसनशील देशांमध्ये ग्रामीण पतपुरवठा क्षेत्रात नवकल्पना ग्रामीण भागातील गरिबांना वंचित व उपेक्षित लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी मदत होत आहे. बचत गट म्हणजे तयार केलेल्या गरिबांची छोटी अनौपचारिक संस्था आहे. बचत गटाची व्याख्या स्वराज्य पियर नियंत्रीतत म्हणून केली जाते.

**बचत गटाची गरज व महत्त्व :**

शोषणावर विजय मिळविण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी बचत गटांची आवश्यकता आहे. ग्रामीण लोकांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विशेषता बहुतेक

स्त्रियांमध्ये सामाजिक रचनेत अदृश्य हे गट त्यांना एकत्र येण्यास सक्षम करतात. ग्रामीण भागातील गरीब विविध कारणामुळे अपाहीत झाले आहेत. त्यांच्या पैकी भरपूर सामाजिक दृष्ट्या मागासलेले आहेत. गरीब हा सामाजिक-आर्थिक दृष्टीने कमकुवत नसतो, परंतु त्याचा प्रवेश देखील कुठे नसतो. हा कमकुवतपणा नाहीसा करण्यास बचत गटांची आवश्यकता आहे त्याकरिता काही अटी पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. वैयक्तिक सभासदाच्या सामूहिक अर्थकारणासाठी त्याची संसाधने एकत्रित करणे व विकास करण्यासाठी.
२. गरिबाच्या राहणीमानाची उन्नती करणे.
३. बचतीची सवय निर्माण करणे व स्थानिक स्त्रोतांचा उपयोग करणे.
४. योग्यतेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी.
५. सदस्यांना गरजेच्या वेळी आर्थिक मदत करणे.
६. गटांमध्ये समस्या ओळखने त्याचे विश्लेषण करणे आणि तोडगा काढणे.
७. गावाच्या सामाजिक -आर्थिक विकासासाठी माध्यम म्हणून काम करणे.
८. स्वयंसेवी संस्थाच्या सेवेशी जोडणी व कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण आयोजित करणे.
९. कर्जाची वसुली करण्यास मदत करणे.
१०. नेतृत्व गुण विकसित करणे.

**बचत गटाची वैशिष्ट्ये :**

बचत गटाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. लहान बचतीस हातभार लावून ते सामान्य निधी तयार करतात.
२. हे गट बऱ्याच वेळेस गैर मदतीने मदतीसह लवचिक ऑपरेशन्सची प्रणाली विकसित करतात.
३. गट स्पर्धात्मक दाव्यासह, नियतकालीक बैठकीत कर्जाच्या विनंत्याचा विचार करतात.
४. कर्ज ही मुख्यतः परस्पर गरज व कमीत कमी विश्वासाच्या आधारावर असते.
५. कर्जाची रक्कम लहान, वारंवार व अल्प कालावधीसाठी असते.
६. कर्जाच्या उद्देशानुसार व्याजदर गटानुसार वेगवेगळे असतात.

**बचत गटाची कार्य :**

बचत गटाची कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

१. सदस्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनण्यास सक्षम करणे.
२. सदस्यांची सामाजिक स्थिती वाढवणे.

३. सदस्यांना त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यां बद्दल चर्चा करण्यासाठी एक मंच प्रदान करणे.

४. सदस्यांची निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे आणि प्रोत्साहन देणे.

५. सभासदांना संघटनात्मक शक्ती पुरविणे.

६. साक्षरता प्रधान करणे आणि सदस्यांमध्ये सामान्य जनजागृती करणे.

**महिलांचे सक्षमीकरण :**

महिला सबलीकरणासाठी आणि महिलांना समान हक्क मिळावेत म्हणून सरकार व संयुक्त राष्ट्रे कार्यक्रम आखत आहे धोरणे योजत आहे १९९० च्या दशकापासून महिला समानता आणि सबलीकरण हे मुद्दे शासनाच्या कार्यात अग्रभागी आहेत. शाश्वत विकास साधने आणि त्याच बरोबरीने शहरी आणि ग्रामीण महिलांना अनुभवावा लागणारा मागासपणा दारिद्र्य व सामाजिक बहिष्कार यांचे निर्मूलन करणे याबाबत शासन अग्रक्रमाने पुढाकार घेत आहे. या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी झालेल्या स्त्री हक्कवादी लोकांनी लैंगिक समानता व न्याय विकास यांचा पुरस्कार करण्यासाठी सबलीकरणाची संकल्पना जागतिक पातळीवर नेण्यास महत्त्वाची भूमिका बजावली आहे. असे शर्मा (२००८) यांचे म्हणणे आहे. त्यांच्या कार्याने प्रभावित होऊन जागतिक बँकेने असे सुचविले आहे की, महिला सबलीकरण हा सर्व प्रकारच्या सामाजिक विकासाचा मुख्य घटक असला पाहिजे. भारतातील महिला सबलीकरणासाठी असलेल्या शासकीय कार्यक्रमांना अपेक्षित उद्दिष्ट गाठता आलेले नाही. देशाच्या लोकसंख्येपैकी महिलांची संख्या ४८ टक्के आहे (जनगणना २०११) तरीही महिला सबलीकरण धोरणातील असंतुलनामुळे महिलांचा सामाजिक व आर्थिक मागासपणा तसाच राहिला आहे. त्यामुळे महिलांच्या गरजा व त्यांचे हीत बाजूलाच पडत गेले आहे. अनेक महिलांच्या व त्यांच्या संस्थांच्या बहुतेक फसव्या असलेल्या तथाकथित प्रकल्पांसाठी निधी पदरात पाडून घेता यावा म्हणून महिला सबलीकरण हे एक चलनी नाणे आले आहे. महिला सबलीकरण ही एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत महिलांच्या आयुष्यावर प्रभाव पाडणाऱ्या संस्थांचे उत्तरदायित्व निश्चित करणे व त्या मध्ये सहभागी होणे या सारख्या कामात महिला आपली निवड विस्तृत करत आहेत व अधिक स्वतंत्र होत आहे. तरीही महिला सबलीकरणाचे ध्येय सार्थ आहे. त्या साठी झटले पाहिजे असा दृष्टिकोण महिला स्वतः जेव्हा ठेवतील तेव्हाच महिला सबलीकरण साध्य होईल यासाठी महिला शक्ती वापरणे गरजेचे आहे. त्यांची क्षमता उपयोगात आणली गेली पाहिजे व त्यांनी स्वतः निश्चित केलेले ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ही उद्दिष्टे साध्य होण्याची शक्यता निर्माण करायची असेल तर महिला सबलीकरणाची धोरणे व कार्यक्रम यामध्ये महिलांच्या मताला आणि कर्तुत्वाला

स्थान दिले गेले पाहिजे.

सिद्धांत आणि प्रत्यक्ष अनुभव यांचा मेळ घालण्यासाठी स्वयं सहायता गटाची भूमिका तपासून पाहता येते. सामाजिक आणि सांस्कृतिक दबावाखाली महिलांना मूलभूत हक्क देखील मिळू शकत नाहीत. मुख्य प्रवाहातून दूर ढकलल्या गेलेल्या ग्रामीण महिलांना त्यांचे अनुभव मांडण्यासाठी स्वयं सहायता गटाचा लाभ होतो. महिला जेव्हा विविध स्वयंसहायता गटाशी जोडल्या जातात तेव्हा त्या प्रक्रियेत या महिला सामुदायिक जाणीव प्राप्त करून घेतात. यालाच सबलीकरण म्हणतात. महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वयंसहायता गटाची खूप मदत झाली. या बरोबरीनेच लोकशाही पद्धतीने गट बांधणी करणे, स्वयं सहायता करणे, जागृती करणे यासारखे कामेही स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून होऊ लागली आहेत. एकत्र येणे, एकमेकींना आधार देणे कर्जास रक्कम देणे हे सर्व कामे महिलांना हळूहळू जमू लागले आहेत. अशा तऱ्हेने सामुदायिक रीतीने पैसे साठवण्याच्या उपायाने त्यांना त्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी मार्ग मिळाला आहे. (पार्थसारथी २०१२)

**नीती आयोगाने सुरू केलेला महिला उद्योजगता मंच:**

भारतातील महिलांच्या उद्योजक आकांक्षा जागृत करत यांच्यातील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देत आहे. उद्योगांना शाश्वत दीर्घकालीन आधार देण्यासाठी मार्ग तयार करण्याच्या दृष्टीने नीती आयोगाने हा उपक्रम सुरू केला आहे. गतिमान नवभारत तयार व सशक्त करण्यात हातभार लावणाऱ्या महिला स्वयं उद्योजकांची संख्या लक्षणीयरित्या वाढावी या हेतूने नीती आयोगाने त्यांना एक व्यासपीठ प्रदान केले आहे. महिला स्वयं उद्योजकता मंच महिलांच्या आकांक्षाच्या तीन खांबावर उभा राहिला आहे. १. इच्छाशक्ती २. ज्ञानशक्ती ३. कर्म शक्ती या तीन शक्तीचा वापर केल्यास महिला सबल होतील यात शंका नाही.

**अमरावती जिल्ह्यातील बचत गट :**

अमरावती जिल्ह्यातील महिलांनी एकत्र येऊन त्यांच्या आर्थिक विकासासाठी बचत गटाची स्थापना केली आहे. अमरावती जिल्ह्यात २००३३ बचत गट स्थापन इ ााले आहेत. मार्च २०११ पर्यंत या बचत गटांना तज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त झाले नाही. म्हणून त्यांच्या उत्पादनाच्या विक्रीसाठी बाजारपेठ नव्हती. परंतु आता महाराष्ट्र शासन स्वतः मार्गदर्शन करत आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील गरीब लोकांचे गट त्यापैकी ९२५० बचत गट आर्थिक उपक्रमांतर्गत आहेत. सरकारने चिखलदऱ्याच्या १२ बचत गटांना रेशन दुकाने दिली आहेत. धारणी व चिखलदरा तालुक्यातील ३७ बचत गटांना केरोसीन विक्रेता बनविले आहे. केंद्र सरकार थेट एलपीजी डीलरशिप या स्वयंसहायता गटांना देण्याच्या विचारात आहे. त्यांच्या आर्थिक

लाभासाठी आर्थिक दृष्ट्या कार्यक्षम बचत गट एलपीजी वितरण आणि नवीन कनेक्शन जेणेकरून त्यांना शाश्वत उत्पन्न मिळू शकेल या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. महिला सक्षमीकरणासाठी बचत गट स्थापन करणे व निरीक्षण करणे आवश्यक झाले आहे.

**सारांश :**

भारत हा विकसनशील देश आहे. स्वातंत्र्याच्या सहा दशकानंतरही भारताचा जीडीपी गोंधळात टाकत आहे. निःसंशयपणे भारतातील जवळपास पंचवीस टक्के लोकांचा प्रश्न दारिद्र्य व बेरोजगारीचा आहे. ग्रामीण भागातील विकास व विकासात्मक कामांमध्ये त्यांच्या सहभागावर सरकार लक्ष केंद्रित करत आहे. भारताच्या नियोजित विकासाच्या मागील सहा दशकांत महिलांना यश मिळाले नाही. परंतु स्वयंसहायता बचत गटांचे जनक डॉ. मोहम्मद युनूस यांनी मोठा आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. देशातील लाखो महिलांच्या आर्थिक सक्षमतेसाठी आणि त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बचत गटाच्या रूपाने सुरू आहे. या बचत गटाची सुरुवात मागास समजल्या जाणाऱ्या बांगलादेशात झाली आहे. बचत गटाच्या साह्याने महिलांचे सबलीकरण होऊ शकते हे त्यांनी सिद्ध केले आहे. स्त्रीने स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेऊन क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याच्या प्रयत्नाला महिलांचे सबलीकरण म्हणता येतो.

**संदर्भ :**

1. V.J.R. Emerlson Moses, u Women empowerment through SHGs :- A micro studyu, International Referred Research Journal Vol II January 2011.

2. S. Subramanium, uA Study on self help groups in Tirunelveli Districtu Manonmanium Sundav anar University, Tiruneveli January 2011

3. K.G. Kurmukar , u Rural credit and self help groups Microfinance need and concepts in Indiau, New Delhi (2003)

4. Mitcon, Self employment centre, Amravati Region Amravati

5. Self employment training centre Amravati

6. www.nabard.org

7. Mahila Arthik Vikas Mahamandal, Regional office Amravati

8. www.megselfhelp.gov.in/.../SHGs

**07**

# महिला उद्योजक व स्वयंसहाय्यता बचत गट

**Dr. Sanjay B. Kadu**
Associate Professor,
Department of Commerce,
Vidya Bharti Mahavidyalaya, Amravati

**************

**प्रस्तावना :-**

भारतात पुर्वीपासूनच पुरुषप्रधान संस्कृती आहे. उद्योजकता हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा महामंत्र आहे, उद्योजकताच कोणत्याही राष्ट्राला विकासाच्या मार्गावर नेऊ शकते हे आता नवीन राहिलेले नाही. आजपर्यंत या क्षेत्रात पुरुष वर्गाचीच मक्तेदारी होती परंतु आता या क्षेत्रात महिलांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. अलिकडच्या काळात महिला उद्योजकाची भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द झाल्या आहेत. आज महिला उद्योजक ही एक वास्तविकता आहे. महिलांची उद्योजकता म्हणजेच महिलांनी स्थापन केलेले उद्योग होय भारताच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास महिलांची उद्योजकता हे महिलांच्या कर्तृत्वासाठी नव्याने उपलब्ध झालेले क्षेत्र आहे. महिलांची उद्योजकता व पुरुषांची उद्योजकता यामध्ये फार मूलभूत अंतर नसले तरी महिलांच्या उद्योजकतेची वैशिष्टये वेगळी आहेत महिलांच्या काही अंगभुत गुणांमुळे या क्षेत्रात त्यांचा दबदबा निर्माण होऊ शकतो हे आज अनेक उदाहरणाव्दारे सिध्द होत आहे, त्यामुळे महिला उद्योजकांचा वेगळा अभ्यास होणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून शासन स्वत: महिलांच्या विकासासाठी विविध योजना अमलात आणत आहे.

आजच्या २१ व्या शतकात महिलांनी चुल आणि मुल इथपर्यंत मर्यादीत राहण्याची विचारसरणी पूर्णपणे बदलून टाकली आहे आज त्या उद्योजकीय क्षेत्रात आपले पाय घट्ट रोवण्याच्या प्रयत्नात आहेत. देशाच्या सर्वांगिण विकासासाठी महिला उद्योजकीय शक्तीचा पुरेपूर वापर होणे गरजेचे आहे महिलांमध्ये पुर्वीपासूनच उद्योजकीय

गुण आहेत, उद्योग चालवण्याची क्षमता आहे. कारण पापड तयार करणे, लोंणचे तयार करणे, फडे बनविणे, लग्नाचा रुखवत करणे, मेहंदी, पाकशाळा, शिवणकाम यांचे क्लासेस चालवणे असे अनेक उद्योग महिला करतात पण यशस्वी व मोठी उद्योजीका होण्यासाठी महिलांना ज्या गोष्टीची आवश्यकता आहे त्या म्हणजे आर्थिक पाठबळ व कौटुंबिक पाठबळाची या गोष्टी त्यांना मिळाल्यास त्यांचे उद्योजकीय क्षेत्रातील स्थान कोणीच रोखु शकणार नाही.

**महिला उद्योजकता :**

प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास हा राष्ट्रातील उद्योजकतेवर अवलंबून असतो उद्योजकता हा पुरुषांचा प्रांत आहे अशी धारणा आता काळानुसार बदलत चालली आहे. अलीकडे विकसित आणि विकसनशील दोन्ही समाजामध्ये महिला स्वत: पुढाकार घेऊन उद्योजकाची भूमिका पार पाडण्यासाठी सिध्द झाल्या आहेत आज महिला उद्योजकता ही एक वास्तवता आहे.

"महिला उद्योजकता म्हणजे महिलांनी स्थापना केलेले किंवा महिलांकडून जो कारभार संचालित होतो असे उद्योग होय" उद्योजकता ही एक प्रवृत्ती आहे यशस्वी उद्योजक होण्यासाठी संशोधक प्रवृत्ती, जोखीम स्वीकारण्याची तयारी दूरदृष्टी प्रभावशाली व्यक्तिमत्व निर्णय क्षमता, कालबध्दता, शिकाऊ प्रवृत्ती, जिद्द, चिकाटी, अशा विविध गुणांची आवश्यकता असते सुदैवाने ही गुणकौशल्ये महिंलामध्ये उपजतच असते. महिलांमध्ये कठोर परिश्रमाची तयारी, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, संवाद साधण्याची कौशल्ये, बचतीची प्रवृत्ती या गुणांना प्रेरणेची व प्रशिक्षणाची जोड दिल्यास त्या उत्तम उद्योजक होऊ शकतात.

स्त्री ही नदी सारखी असते नदी जशी आपला जीवन प्रवाह काढताना येणाऱ्या झाडांना दगडांना दूर करत समुद्रांना जाऊन मिळते त्याचप्रमाणे स्त्री उद्योजीका व्यवसाय करताना येणाऱ्या घरातील अडचणी ताणतणाव दूर करत यशस्वीपणे उद्योगाचा पसारा सांभाळत आपले उद्दिष्ट गाठते.

भारतातील महिला उद्योजकतेची काही यशस्वी उदाहरणे पुढील प्रमाणे देता येईल.

**१. प्रतिमा किर्लोस्कर -** किलोस्कर ग्रुप ऑफ कंपनी यांच्याशी निगडीत प्रतिमा किर्लोस्कर आहे. द इंडस एंटर प्रिमीअर पुणे विभागासाठी त्या कार्यरत आहे. माहिती तंत्रज्ञान समिती पुणे येथे चेअरमन म्हणून कार्य करीत आहेत.

**२. अनु आगा -** ही महिला उद्योग क्षेत्रातील अग्रगण्य समजल्या जाणारी

महिला उद्योजक आहे. इंजिनीअरींग विभागात तीने अंत्यत महत्वपूर्ण प्रशंसनीय कामगिरी केलेली आहे. सामाजिक जबाबदारी लक्षात घेऊन इंजिनिअरींग उत्पादन क्षेत्रात भांडवल गुंतवूण मोठ्या प्रमाणात उत्पादन केले आहे. या महिलेने स्वत:चे घर सांभाळून एक मोठ्या उद्योगात प्रभाविपणे कार्य केलेले आहे.

**महिला बचत गटांची भूमिका व कार्ये :**

महिला बचत गटाची चळवळ महाराष्ट्रात जोमाने सुरु आहे. गावोगावी नवनवीन बचत गट सुरु होत आहे. त्याव्दारे आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही अत्यंत स्फूर्तीदायक बाब आहे. "एकाच वाडी वस्तीवरील, एकाच सामाजिक, आर्थिक स्तरामधील, समविचारी, समान गरजा असणाऱ्या १० ते २० महिलांच्या संघटनास बचत गट म्हणतात" वर्तमान युग हे लोकशाहीचे युग आहे लोकशाहीत राजा हा राणीच्या पोटातून न येता मतपेटीतून येतो. स्त्री पुरुष समानता हे लोकशाहीचे ब्रीद आहे लोकशाही बळकट करणाऱ्या भूमिकेतून महिला बचत गट ग्रामीण भागात दारिद्र्य, अज्ञान व जाचक परंपरा मोडण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

आपणास माहितच आहे की आपल्या देशात पुरुष प्रधान संस्कृती आहे वैदिक काळ सोडून उत्तर वैदिक काळ ते आजताग्रायत महिलांना नेहमी दुय्यम स्थान देण्यात आले आहे तसेच त्यांना शिक्षण नाकारल्याने व विविध सामाजिक बंधनामुळे स्त्री आपले स्वत्व हरवून बसली आहे आजच्या २१व्या युगात देशाची अर्धी लोकसंख्या आर्थिक परावलंबी असणे योग्य नाही म्हणून महिलांच्या विकासासाठी व त्यांच्या सक्षमीकरणासाठी महिला बचत गटाव्दारे उपाय योजण्यात आले आहे महिला बचत गटांची भूमिका पुढील मुद्याव्दारे अधिक स्पष्ट होईल.

१. महिलांना स्वत्वाची जाणीव करुण देणे.
२. महिलामध्ये बचतीची सवय जोपासणे.
३. विविध शासकीय योजना योग्य लाभार्थ्यापर्यंत पोहचवणे.
४. महिलांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करणे.
५. महिलांना उद्योगशील बनविणे.
६. महिलांकरीता स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करुण देणे.
७. महिलांना आर्थिक गुलामगीरीतून मुक्त करणे.
८. महिलांमध्ये आरोग्य, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक क्षेत्राबाबत जागृती करणे.
९. कूटूंबे सावकरीपाशातून मुक्त करणे.

**बचत गट साधारणपणे महिला उद्योजकता क्षेत्रात पुढील कार्ये करत असतात:-**

१. ग्रामीण दुर्बल महिला उद्योजकांना बचतीस प्रवृत्त करणे.

२. महिला उद्योजकांचे आर्थिक / सामाजिक / मानसिक सबलीकरण करणे.
३. महिला बचतगटाच्या सहाय्याने महिलांचा कौटुंबीक दर्जा वाढवणे व दबाव गट तयार करणे.
४. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला उद्योजकांना सावकारी पाशातून मुक्त करणे.
५. महिला उद्योजकांनमध्ये आत्मसन्मान व आदर निर्माण करणे.
६. महिलांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करुन स्थानिक राजकारणात प्रवेश मिळवून देणे.
७. बचतगटाच्या माध्यमाने स्थानिक पातळीवरील विविध समस्या सोडवण्यासाठी पूढाकार घेणे.
८. महिलांना बँकिग व्यवहाराबद्दल माहिती देऊन व्यवहार करण्यासाठी तयार करणे.
९. बचतगटाव्दारे वित्तीय संस्थाकडून रितसर संलग्णीकरण करुन पतशक्ती वाढवणे.
१०. महिलांना स्वंयरोजगार निर्मितीसाठी प्रशिक्षण देऊन उद्योजकता वृध्दिंगत करणे.
११. बचतगटाव्दारे सभासद महिला उद्योजकांच्या कौटुबींक अडचणी दूर करणे.

**संदर्भ सूची :-**

१. जाधव.पी .जी., "बचत गटाच्या माध्यमातुन महिलांचे आर्थिक सक्षमीकरण," अभिसरण वार्षिकांक, बलभीम महाविद्यालय, बीड
२. पाटील,लीला, "स्वंयसिध्दा," लोकमत सखी पुरवणी, १९ जून २००८, पू.क्र.३/११.
३. पाटील,लीला, "कहानी उद्योग नगरी माईची," लोकमत सखी पुरवणी, १९ जून २००८
४. काटोले, रविंद्र. म, "महिला बचत गट", गोडवा कृषी प्रकाशन, पूणे,
५. मुलाणी, एम. यु,, "महिला स्वंयसहाय्यता बचत गट", डायमंड पब्लीकेशन, पुणे,
६. अहिरराव जितेंद्र, "उद्योजकतेची मूलतत्व", कैलास पब्लिकेशन, औरगांबाद, २००९
७. वैद्य, मोहन वसंत, "महिला बचत गट हस्तपुस्तिका", प्रकाशन विश्व, पुणे
८. कऱ्हाळे, गंगाधर., "ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोन", श्री मंगेश प्रकाशन, नागपुर,
९. सुधा, जी. एस., "व्यावसायिक उद्यमिता" रमेश बुक डेपो, जयपूर, २००२

**08**

# महिला बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

**प्रा. नीता पांडे**
जी. एन. ए. कॉलेज,
बार्शिटाकळी जि. अकोला

************

भारतीय परंपरागत समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते एकुणच स्त्रियांची स्थिती दयनीय झाली होती. तिच्यावर अनेक रूढी परंपरांचा पगडा होता. म. कर्वे, महात्मा फुले, रानडे, राजर्षि शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्याकरीता अनेकविध प्रयत्न केलेत. स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात महिलांच्या प्रगतीसाठी व कल्याणासाठी अनेक योजना आखण्यात आल्या. आज स्वय:सहाय्यता गटाची चळवळ लघुवित्त, बचतगट, स्वयंसहाय्यता समुह या निरनिराळ्य संज्ञेतून आकाराला येत आहे. महिला सक्षमीकरणाच्या प्रयत्नाला स्वयंसहाय्यता गटामुळे प्रचंड वेग प्राप्त झाला आहे. स्वयंसहाय्यता समुह म्हणजे या समुहाने स्वत:च स्वत:ला सहाय्य करणे होय. सर्वांसाठी सर्वाची मदत हे या चळवळीचे घोषवाक्य आहे. डॉ. महंमद युनूस यांच्यामुळे ही संकल्पना उदयास आली. त्यांच्या प्रेरणेतून विकसनशील देशात ही चळवळ फोफावत आहे.

**महिला सक्षमीकरणाची व्याख्या:—**

स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रिच्या अंगी निर्णय होण्याची, नियंत्रण करण्याची, संघटित करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, संस्था संपर्क, आर्थिक व्यवहार इ. करण्याची क्षमता व आवड निर्माण होणे याला महिला सक्षमीकरण

म्हणतात. स्त्रीने स्वत:च्या क्षमतांची ओळख करून घेऊन क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सबलीकरण होय. थोडक्यात सबलीकरण म्हणजे स्त्रियांमध्ये आत्मनिर्भरता, स्वावलंबन व स्वतंत्र व्यक्तीमत्व विकसीत करण्याची प्रक्रिया होय. आज बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. आज महाराष्ट्रामध्ये ५०,००० च्या वर स्वयंसहाय्यता गट कार्यरत आहेत.

**महिला स्वयंसहाय्यता बचत गट संकल्पनेचा अर्थ:—**

महिला स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे, ''आर्थिक पारतंत्र्यातून आर्थिक स्वातंत्र्याकडे, परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे व स्वावलंबनातून प्रगतीकडे जाण्याकरिता स्वयंस्फुर्तीने सहमतीने व एक विचाराने एकत्र येऊन स्थापन केलेला गरजू महिलांचा गट एकाच गावातील अनेक गरजू महिला एकत्र येऊन बचत गटाची स्थापना करतात एका गटात १० ते २० समविचारी महिला असतात. गटाच्या नावाने बॅकेत खाते उघडून व्यवहार केला जातो. या स्त्रिया मुलांचे शिक्षण, घर दूरूस्ती, शेतीची कामे अशा घरगुती कामासाठी देखील बचत गटातून कर्ज घेतात परतफेडही वेळीच करतात. त्यामुळे स्वत:चा व घराचा विकास स्वाभाविकच होतो.

जागतिकीकरणाचा प्रभाव वित्तीय क्षेत्रावर होऊ लागला अशा काळातच बचत गटांची संख्या वाढत होती. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागु झाले. त्याचप्रमाणे राजकीय पक्ष, शासन बॅका, स्वयंसेवी संस्था आपापल्या परीने कार्यरत होत्या. २००१ हे महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहिर केले. या वर्षात स्वयंसहाय्यता गटांना महिला विकासाचे माध्यम म्हणून सर्वत्र मान्यता मिळाली. आज राजकीय पुढारी, स्वयंसेवी संस्था इत्यादिंचे बचत गट सुरू आहेत.

**शासनाचे धोरणात्मक निर्णय :—**

इ.स. १९७५ च्या दरम्यान बांगलादेशातील चित्तगाव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्राध्यापक व जगप्रसिध्द ग्रामीण बॅकेचे प्रणेते डॉ. प्रा. महंमद युनूस यांनी बचतगटाची मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर लॅटीन अमेरिका, आफ्रिका, इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपाईन्स,

आखाती देश, आशियायी देशात चळवळ कार्यरत झाली आहे. स्वयंसहाय्यता गट, बचत गट सक्षम व्हावे म्हणून शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही केली जात आहे. स्वस्त धान्य दुकाने बचतगटांना चालविण्यास दिली आहेत. अंगणवाडी केंद्राना खिचडी वाटप व खिचडी शिजवण्याचे कार्य स्वयंसहाय्यता गटांना देण्यात आले आहे. बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना विक्रीसाठी जागा, सुविधा निर्माण करून देण्यात येत आहेत. शाळा महाविद्यालयात कॅंटीन, खानावळ चालविण्यास जागा, वनौषधी, विक्री परवाना, कचरा गोळा करण्याचे काम देण्यात येते आहे. शासनामार्फत विविध व्यवसायाचे प्रशिक्षण, आणि विमा संरक्षण देण्यात येत आहे. अशाप्रकारे शासकीय व निमशासकीय पातळीवर निर्णय घेऊन बचत गटाच्या चळवळीला पोषक वातावरण निर्माण केले जात आहे.

**बचत गटाव्दारे महिलांचे सबलीकरण :—**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे.

**सामाजिक सबलीकरण :—**

बचतगटाच्या माध्यमातून सामाजिक सक्षमीकरण घडून येत आहे. समाजातील रूढी, प्रथा, परंपरा या बंधनामुळे स्त्रीचे सामाजिक खच्चीकरण पुरातन काळापासूनच मोठ्य प्रमाणावर झाले आहे. महिला बचत गटामुळे गावातील स्त्रिया चावडीवर एकत्र येऊन गावातील समस्यांवर चर्चा करू लागल्या आहेत. गावातील मंदीरात सभा घेऊ लागल्या आहेत. गटामुळे स्त्री—पुरूष समानता प्रस्तापित होऊ लागली आहे. दारूबंदी सारखे कार्यक्रम यशस्वी होत आहे. आता खऱ्या अर्थाने स्त्री मुक्त होत आहे.

**आर्थिक सक्षमीकरण :—**

महिलांना बचतगटाव्दारे उद्योग, प्रशिक्षण, भांडवल उभारणी, विक्रीव्यवस्था, कच्चामाल, कर्जफेड इ. गोष्टींचा सल्ला मार्गदर्शन मिळते. त्यामुळे महिलांची निर्णयक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, कार्यक्षमता, रोजगार निर्मितीत वाढ, इ. गोष्टी गटाकडून मिळतात. गटाव्दारे आरोग्य, शिक्षण, घरखर्च व बचतीसाठी पैसा प्राप्त होतो सामुहिक शक्ती वाढवून रोजगार निर्मिती होते. अशाप्रकारे

जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत रोजगार संधीत बचत गट वाढ करीत आहे.

**राजकीय सबलीकरण :—**

बचतगटात काम करीत असल्यामुळे महिलांची हिंमत वाढत आहे. गटाच्या माध्यमातून महिला पंचायत राज संस्थामध्ये सहभागी झाल्या आहेत. कारभार सुरळीतपणे पार पाडीत आहेत. नेतृत्व व कर्तव्य पार पाडण्याची संधी त्यांना प्राप्त होत आहे. राजकीय व्यासपीठावर त्यांना सन्मान प्राप्त होत आहे.

महिला सक्षमीकरणात महिला बचत गटाची भुमिका महत्वपूर्ण ठरते. कारण बचतगटामुळे महिलांच्या स्थितीत मोठ्या प्रमाणात चांगले बदल झालेले आहेत. बचतगटामुळे महिला संघटित होऊन सर्व समस्यांना सामोरे जाण्यासाठी तयार होत आहेत. महिलांचे सार्वजनिक व सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे प्रमाण बचतगटामुळे निश्चीतपणे वाढले आहे. तसेच महिलांच्या उद्योजकतेत वाढ होत आहे. त्यांच्यात सामाजिक, आर्थिक, राजकीय जागरूकता निर्माण होत आहे.

**संदर्भ :—**


१. महिला सबलीकरण : स्वरूप व समस्या — डॉ. शुभांगी गोटे

२. उद्योजकता : डॉ. अहिरराव जितेंद्र

३. आम्ही स्त्रीया : दिवाळी अंक १९९९

४. स्वर्णजयंती ग्राम रोजगार मार्गदर्शक पुस्तिका : केंद्रशासन

५. महिला स्वयंसहाय्यता बचत गट : मुलाणी एम.यु., डायमंड प्रकाशन पुणे, २००६


❑❑❑

**09**

# स्वयंसहायता बचत गट आणि महिला सक्षमीकरण

**Mrs. Harshada S. Wadhone**
Asst. Prof., Dept. Of Commerce,
Smt. R.D.G. College for Women, Akola

***********

**प्रस्तावना :—**

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणुन ओळखली जाते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाकरिता, ग्रामिण भागाचा विकास होणे आवश्यक आहे. भारत सरकारने ग्रामीण भागातील जनतेच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीकरिता अनेक कल्याणकारी योजना सुरु केलेल्या आहेत दुर्बल घटकातील व्यक्तींची अस्मिता जागृत करुन चर्चा, बैठका, सभेचे आयोजन ग्रामीण भागात करुन विकास योजनेचे महत्त्व पटवुन देणे व त्यांचा सदर योजनेत प्रत्यक्ष सहभाग असणे जरुरीचे आहे. समाजातील दुर्बल घटकांना एक आशेचा किरण म्हणून स्वयंसहाय्यता बचत गटाकडे पाहिले जाते. बचत गटाचे मुख्य उदिष्टे दारिद्रय निमुर्लन हेच आहे. बचत गटाचा दारिद्रय निमुर्लनाशी जेवढा घनिष्ट संबंध आहे. तेवढाच महिलां सक्षमीकरणाचे आहे, कष्टकरी वर्गातील महिलांकडे कोणत्याही प्रकारची संपत्ती, भांडवल व व्यवसायासाठी लागणारा खेळता पैसा नसतो. त्यामुळे त्या नेहमीच गरीब राहतात. अशा महिलांपर्यत विकास पोहचवायचा असेल तर सुलभ पध्दतीने त्यांना खेळते भांडवल मिळायला पाहिजे. कुठल्याही भांडवल संपत्तीवर अधिकार नसल्याने महिलांना कोणतीही वित्त संस्था भांडवल कशी पुरवणार? म्हणून अशा महिलांनी एकत्र यावे,

गट करुन बचत साठवावी व वित्तसंस्थांनी या गटाची एकी पाहुन, बचत करण्याची क्षमता अजमावून त्यांना भांडवलासाठी कर्ज दयावे महिलांचे सबलीकरण म्हणजे स्त्रियांमध्ये सर्व दृष्टीने आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना आत्मनिर्भर करणे होय. स्वत:मध्ये असलेल्या वेगवेगळ्या कला कौशल्याचा, क्षमतांचा विकास करतो येणे, त्यातुन तिचे कुटुंबात व समाजात पुरुषांच्या बरोबरीने स्थानं प्राप्त होणे, या क्षमतांचा विकास व उपयोग स्वत:साठी, कुटुंबासाठी आणि समाजासाठी करता येणे हे तिला जमले पाहिजे. हे स्त्रीला शक्य झाले तर ती खऱ्या अर्थाने समर्थ होईल. यालाच आपण स्त्रीचे सक्षमीकरण असे म्हणू.

**बचत गटाची व्याख्या :—**

''एकाच प्रादेशिक समानता असलेल्या समविचारी, समान गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते २० महिलांनी बचत करुन त्याचा उपयोग, विनियोग, व्यवसाय करणाऱ्या व लोकशाही मार्गाने संघटन करणाऱ्या समुहास बचत गट असे म्हणतात.''

''उत्तम जीवनाकडे वाटचाल करण्याच्या ध्येयाने समान गरजा व समान आर्थिक सामजिक परिस्थिती असणाऱ्यांनी परस्पर सहकार्यातून निर्माण केलेला समूह म्हणजे स्वयंसहायता बचत गट होय.''

**स्वयं सहायता बचत गटाचे उद्देश :—**

१. लोकांना सावकारी पाशातून सोडवून त्यांना बचतीच्या सवयी लावणे.
२. स्वयंसहाय्यतेच्या संकल्पनेतून संघशक्ती निर्माण करणे.
३. स्वयंसहाय्यता बचत गटाचे माध्यमातून दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचावणे.
४. गटातील सदस्यांना नैतिक आधार देवून ऐक्याला उत्तेजन देणे.
५. ग्रामीण भागातील आर्थिक/ सामाजिक व कौटुंबीक समस्यांची सोडवणूक करणे.
६. बचत गटांच्या माध्यमातून विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून त्यातून वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक व पर्यायान देशाचां विकास करणे.
७. गटातील सदस्यांना कर्ज रुपाने एकत्र आर्थिक सहाय्य देणे.

८. वेगवेगळ्या जाती धर्माच्या स्त्रियांना एकत्र आणून एकात्मतेची भावना वाढविणे.

९. स्वयंरोजगार निर्मितीसाठी गटाद्वारे प्रशिक्षण देवून उदयोजकता वृध्दींगत करणे.

१०.आर्थिक स्त्रोताची निर्मिती करणे.

**महिला बचत गट स्थापन करणाऱ्या महत्त्वाच्या संस्था :—**

• **नाबार्ड :—** ''राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बॅक'' हे ग्रामीण भागात स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक व प्रशिक्षण विषयक मदत करते. तसेच महिला बचत गटाकडून उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी जिल्हापातळीवर मालाची प्रदर्शना आयोजित करते.त्यामुळे महिला बचत गटाच्या मालाचा प्रचार व प्रसार होऊन, बचत गटांना मोठा आर्थिक फायदा होतो.

• **माविन :—** ''महिला आर्थिक विकास महामंउळ मर्यादित'' ही संस्था ग्रामीण तसेच शहरी भागा तमहिलांचे स्वयंसहाय्यता बचत गट स्थापन करते या कामामध्ये माविमाला त्यांनी नेमलेल्या स्वयंसेवी संस्थासुध्दा मदत करतात. विशेष म्हणजे तालुका कार्यक्षेत्रात सहयोगिनींच्या मार्फत बचत गटांची स्थापना व गटांना प्रशिक्षण देण्यात येते. बचत गटातील महिलांना स्वयंरोजगार योजना सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना कामधेनु योजना तसेच केंद्रशासन पुरस्कृत स्वयंसिध्दा योजना या मध्ये माविम कडून मदत होते, या मध्ये महिला बचत गटाकरिता प्रदर्शन व मेळावे आयोजित करणे तसेच महिला जाणीव जागृती कार्यक्रम राबवितात.

• **नगरपरिषद प्रशासन संचालनालय :—** महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रातील दारिद्रिय रेषेखालील तसेच मागासवर्गीय महिलांसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनातर्फे महिला बचत गट महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात स्थापन केलेल जातात.

• **राष्ट्रीयकृत व सहकारी बँका :—** शासनाप्रमाणेच शहरी व ग्रामीण भागात बचत गट स्थापन करण्याचे काम राष्ट्रीयीकृत, शेडयुल्ड व सहकारी बँकां करतात.

**सबलीकरणाचे घटक :—**

महिलांचे सबलीकरण अनेक बाजुंनी अपेक्षित असले तरी सबलीकरणाचे मुख्य घटक पुढील प्रमाणे सांगता येतील.




**स्वयं —सहाय्य गटाचे फायदे**

स्वयं —साहाय्य गटाचे विविध प्रकार आहेत, त्यामध्ये मिश्र स्वयं—साहाय्य गट व महिला स्वयं—साहाय्य गट मुख्य आहेत. त्यापैकी महिला स्वयं—साहाय्य गटाचे प्रमाण अधिक आहेत. स्वयं—साहाय्य गटामुळे महिला सभासदांना खालील प्रकारचे फायदे प्राप्त झालेले आहेत.

अ. व्यक्तीगत फायदे

ब. सामाजिक फायदे

क. अर्थिक फायदे

**अ. व्यक्तीगत फायदे :—**

स्वयं—साहाय्य गट ही सामूहिक भावना असलेली संकल्पना असली तरी गटातील प्रत्येक सभासदाची वैयक्तिक विकासाच्या दृष्टीने केली जाणारी धडपड महत्तवपूर्ण असते.

**१. जन्मजात गुणांचा विकास :—** जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही उपजत गुण असतात. या गुणांना

योग्य वेळी संधी मिळाली नाही तर विकास खुंटण्याची शक्यता असते. स्वयं—साहाय्य गटात आल्याने महिलांना त्यांच्या उपजत, जन्मजात गुणांचा विकास करण्याची संधी मिळते. सदगुणांचा विकास झाला तर त्या व्यक्तीच्या जीवनात अनुकूल बदल होतो.

२. **कर्तृत्वाला दिशा** :— बरेचदा कौटूंबिक, सामाजिक व धार्मिक बंधनामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळत नाही, म्हणून प्रत्येकीला तिच्या अंगातील गुणांची वाढ व जोपासना कशी करावी, हे करण्यासाठी स्वयं—साहाय्य गटात शिकण्याची संधी मिळते आणि गट सदस्यांची कर्तबगारी विकसित होते.

३. **व्यक्तीमत्वाचा विकास** :— स्वयं —साहाय्य गटाच्या कार्यामुळे महिलांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो. चारचौघामध्ये स्वयं—साहाय्य गटातील महिलांचे व्यक्तीमत्व ठळकपणे दिसून येते. तिच्या अंगी धैर्य, धाडस, आत्मविश्वासाची वाढ होवून व्यक्तीमत्वाचा विकास होतो.

४. **कुटूंबातील स्थान उंचावणे** :— स्वयं सहाय्य गटामुळे महिलेचे तिच्या कुटूंबातील स्थान उंचावले आहे. स्वय—साहाय्य गटातील कार्यामुळे पैशाचा वापर कुठे आणि कसा करायचा? बचत कशी करायची? हे प्रशिक्षण मिळाले आहे. महिलांच्या निर्णयाला कुटूंबात स्थान मिळू लागले आहे. घरात तिच्या शब्दाला किंमत मिळाली आहे.

**ब. सामाजिक फायदे :—**

स्वयं—साहाय्य गटामुळे महिलांना समाजिक स्वरुपाचे फायदे सुध्दा प्राप्त झालेले आहेत.

१. **विविध शासकीय योजनांची माहिती** :— स्वय—साहाय्य गटात आल्यामुळे महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती प्राप्त झाली आहे. माहेर योजना, हुंडाग्रस्त स्त्रियांचे पुनर्वसन, परितक्त्या स्त्रियांना आश्रय, कायदेशीर मोफत सल्ला देणे, व्यावसायिक प्रशिक्षण देणे, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना इत्यादी योजनांची माहिती महिलांना प्राप्त झाली आहे.

२. **मानसिक आधार** :— समाजामध्ये, ग्रामीण भागमध्ये पाण्याची समस्या, प्राथमिक आरोग्यच्या समस्या, गलिच्छ वस्ती,

प्रदुषणाया समस्या, विद्युत पुरवठ्याच्या समस्या, शिक्षणाच्या समस्य इत्यादी समस्या दिसून येतात. या समस्या सोडविण्यात स्वयं—साहाय्य गटाने पुढाकार घेवून, चर्चा करुन समस्यांचे निराकरण करु शकतात. या प्रसंगी गटाचा त्यांना मानसिक आधार असतो. रस्ता बांधणी, शाळा उभारणी, दारु बंदी सारखे कार्य महिलांनी गटाच्या मानसिक आध ारामुळे केलेल आहे.

**३. व्यवस्थापन कौशल्यामध्ये वाढ :—** गटाच्या सर्व सभासदांनी एकत्रित येवून निर्णय घेणे, समस्यासोडविणे, प्रसंगी जोखीम स्वीकारणे ही कार्य करावीलागत असल्याने गटाच्या कामकाजाचे व्यवस्थापन कौशल्य वाढू शकते. त्यामुळे गावातील व झोपडपट्टीतील इतर समित्यांवर गटाच्या सभासदाची नेमणूक होवू शकते. ग्रामसभेला गटाच्या सदस आवर्जुन हजर राहुन गावाचे प्रश्न कसे सोडवावेत, त्यासाठी गट कशा तऱ्हेने काम करु इच्छितो हे सांगू शकतात.

**४. नेतृत्व गुणांच विकास :—** गटाची कामे करतांना, गटासाठी लागणारे व्यवस्थापन कौशल्य, हिशोब ठेवावयाचे ज्ञान, विविध समस्येतून मार्ग काढण्याचे व्यवहार ज्ञान, संघटन कौशल्य, संभाषण कौशल्य ही सारी गुणवैशिष्टये नेतृत्व गुणांच्या वाढीसाठी पोषक आहेत. गटामुळे ग्रामीण भागातील महिलांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास झाला आहे. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महत्त्वाची पदे या महिलांनी प्राप्त केली आहेत.

**क. आर्थिक फायदे**

स्वयं—साहाय्य गटामुळे होणारे आर्थिक फायदे हे सभासदाचे वैयक्तिक फायदे सुध्दा आहेतच किंबहूना त्यावरच सामाजिक फायदेही अवलंबून असतात.

**१. बचतीला सुरक्षितता :—** गटाच्या अगदी सुरुवातीपासून होणारा फायदा म्हणजे सभासदांना नियमित बचतीची चांगली सवय लागते. गटात केलेल्या बचतींना सुरक्षितता मिळते. सभासदांना आर्थिक साहाय्य देण्या इतकी बचतीची रक्कम गटात जमा झाली की, त्यातून सभासदांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

**२. कर्ज पुरवठ्याची सोय :—** आजारपण, बाळंतपण,

लग्नकार्य, कापड खरेदी, मुलांच्या शिक्षणाची फी, धान्य खरेदी इत्यादी कारणांसाठी कोणतीही वित संस्था कर्ज देत नाही. ग्रामीण भागात अशा अत्यावश्यक कारणांसाठी पैसा नसल्याने जीवनमान खालावते. स्वयं—साहाय्य गटाच्या कर्ज पुरवठ्यामुळे महिलांना गरजेच्या वेळी आर्थिक साहाय्य प्राप्त झाल्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारले आहे.

**स्वयं—साहाय्यता गटांच्या विकासातील समस्याः—**

१. बचत गटामध्ये प्रामुख्याने महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असतो. परंतु या महिलामध्ये निरक्षरतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना आर्थिक व्यवहार करणे, बँकांचे इंग्रजी माध्यमातील व्यवहार आणि हिशोब ठेवणे इ. व्यवहार करतांना अनेक अडचणी येतात.

२. बचत गटांना बँकांकडून कर्जे प्राप्त करतांना अनेक कागदपत्राची पुर्तता करावी लागते. परंतु काही वेळेस असे कागदपत्रे प्राप्त होत नाहीत. त्याचप्रमाणे बाचतगटांना अशा प्रकारची कागदपत्रे प्राप्त करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

३. महिला बचत गटांपी निर्माण केलेल्या वस्तुंना चांगल्या प्रकारची बाजारपेठ उपलब्ध होत नाही.

४. स्वयंसहायता गट सदस्य दारिद्रय रेषेखालील असतांना विशिष्ट कालावधीनंतर सभासदांकडून गटासाठी उभारली जाणारी सामूहिक निधीची रक्कम वैयक्तिक घरगुती समस्यांमुळे प्राप्त होत नसल्यामुळे गटांना अंतर्गत कर्ज देण्यावर मर्यादा येत.

५. बचत गटांना विविध व्यावसायासाठी शिक्षण व प्रशिक्षणाचा अभाव असल्याने त्यांना आपल्या उत्पादनात व गुणवत्तेत वाढ करता येत नाही.

६. बचत गटांना व्यवसायासाठी लागणाऱ्या कच्चा मालाची कमतरता,उत्पादीत माल साठवण्याच्या अपुऱ्या सोयी, विपणनाच्या सोयीचा अभाव यासारख्या समस्यामुळे बचत गटांचा विकास होऊ शकत नाही.

७. बँकांकडून स्वयंसहायता गटांची गट स्थापना करुन ६ महिने झाल्यानंतरही प्रथम प्रतवारी व गटांना खेळते भांडवल मिळून ६ महिने झाल्यानंतरही द्वितीय प्रतवारी करुन देण्यास विलंब होतो.

८. बचत गटांच्या स्थापनेबाबत आणि व्यवस्थापनाबाबत राज्यस्तरीय कायदा अस्तीत्वात नाही.

९. बचत गटांनी बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परत फेड वेळेवर न केल्याने अनेक बँकांचे कर्ज बुडतात. त्याचप्रमाणे एकाच बचत गटातील सदस्य अनेक बँकांकडून कर्जे घेतात त्यामुळे बँकांचा अशा बचतगटावरील विश्वास उडतो. त्यामुळे बँक बचत गटांना कर्ज देण्यास तयार होत नाहीत.

१०. याशिवाय बचतगटातील सदस्यामध्ये अंतर्गत विश्वास, समन्वय नसणे, बँकांचे कर्ज वेळेवर प्राप्त न होणे, पदभार सांभाळणास असमर्थता संभाषण कौशल्याचा अभाव, एकमेकांमध्ये गैरसमज, कुटूंबातून महिलांना विरोध, राजकीय हस्तक्षेप यासारख्या कारणांमुळे बचत गट चळवळीचा पाहिजे तेवढा विकास झालेला नाही.

**शिफारशी व उपाय योजना :—**

१. महिलांनी अर्थिक स्वावलंबनाचे महत्व लक्षात घेऊन स्वत:च्या मानसिकतेमध्ये जाणीवपूर्वक बदल घडवून आणावा.

२. महिलांनी बचत गटा संबंधी निर्णय घेतांना आळीपाळीने गटातील सर्व महिलांकडे नेतृत्व द्यावे ज्यामुळे महिला खऱ्या अर्थाने निर्णय घेण्यास सक्षम ठरतील.

३. महिला बचत गटामध्ये राजकीय हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता महिलांनी स्वत: घ्यावी.

४. शासकीय योजनांचा लाभ सर्वच महिला बचत गटांना सम प्रमाणात व्हावा. यासाठी शासनाने प्रयत्न करावेत.

५. बचत गटातील सर्व महिला सभासदाी आळीपाळीने बँकांचे व्यवहार केले पाहिजेत तरच सर्व महिला सभासदांना बँकांचे व्यवहार समजतील.

६. बँकांची बचत गटांना कर्ज देतांना त्यामागील हेतू विचरात घेणे गरजेचे आहे. कारण कर्जाचा उपयोग अनेक महिला बचतगट अनुत्पादक कार्यासाठी करतात. परिणामी स्त्रिया कर्ज परतफेड करु शकत नाहीत व खऱ्या अर्थाने स्वावलंबी व सक्षम होऊ शकत नाही.

७. शासनाने बचत गटातील महिलांमध्ये नेतृत्व, कौशल्य व

व्यवस्थापन कुशलत यावी यासाठी प्रशिक्षण वर्ग सुरु करावेत.

**निष्कर्ष :—**

ह्या सर्व अभ्यासातून असे लक्षात येते की स्वयं—सहायता गट हे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सामाजिक आरोग्य, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात सबलीकरणासाठी महत्वाची भुमिका बजावित आहेत. सरकारने अनेक वर्षापासून भारताला सक्षम करण्याचे स्वप्न स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमाने पूर्णत्वात येत असल्यचे दिसून येत आहे. महिला बचत गट ही चळवळ महिलांना सक्षम करणारी प्रमुख यंत्रणा बनली आहे. स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे ग्रामीण भागातील महिला अधिक संघटीत झालेल्या दिसून येतात.

महिला सबलीकरणातून त्यांच्यात विविध कला, कौशल्य आणि ज्ञान आत्मसात करण्याची जिद्द निर्माण झाली आहे. सबलीकरणातून महिला आत्मनिर्भर होवून आपल्या कुटुंबाला हातभार लावत आहे. तर कुटुंबाचा, समाजाचा जिल्ह्याचा, राज्याचा, देशाचा विकास साध्य करायचा असेल तर महिलांना प्राधान्य देवून सक्षम करण्याकरीता शासनातर्फे, कुटुंबातर्फे, प्रोत्साहित केल्यास महिला वर्ग स्वयं निर्भर होऊन सबल होण्यास मदत होईल. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण झालेले दिसते. कारण या माध्यमाने महिला आत्मनिर्भर झाल्या त्याच प्रमाणे त्यांनी आपल्या उदयोगांद्वारे इतरांना रोजगार निर्माण करुन दिले. त्यामुळे आर्थिक विकासात बचत गटाचे योगदान महत्वाचे ठरते.

**संदर्भ :—**

१. अर्थसंवाद
२. योजना
३. बँक ऑफ इंडिया— स्वयंसहाय्यता महिला बचत गट— मार्गदर्शक पुस्तिका.
४. महिला स्वयंसहाय्यता ए.एम.यु. मुलाणी, डायमंड पब्लिकेशन.

❑❑❑

**10**

# भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता गटांची भूमिका

**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एस.पी.एम.तात्यासाहेब महाजन कला वाणिज्य
महाविद्यालय, चिखली जि.बुलडाणा

***********

**प्रस्तावना :—** भारतीय समाजात पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव असून महीलांना दुय्यम स्थान दिले आहे. सामाजिक दृष्टीने स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून महीलांचे स्थान उंचावण्याच्या कार्याला दिशा दिली आहे. भारतीय महीलांना आपले कर्तृत्व सिध्द करण्याची संधी मिळू लागली आहे. भारतीय आर्थिक नियोजनात आजतागायत गरिबी निर्मुलन व रोजगांरावर भर आहे. जागतिकीकरणाच्या काळात सहकाराला घरघर लागली असून स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून एक आशेचा किरण महीला सक्षमीकरणासाठी दिसून येत आहे.महीला संयमी व ध ाडसी असतात. मानवी जीवनाचा मुलाधार म्हणून सहकाराकडे पाहीले जाते. प्राचीन काळापासून मानवाने जी प्रगती साध्य केली त्यामागे सहकारच आहे. सहकार हे विश्वव्यापी विकासाचे साधन आहे. भारतानेही सहकाराची कास धरूनच ग्रामीण विकासाबरोबरच आर्थिक विकासाचे ध्येय साध्य करण्याचे अंगीकारले आहे. हयाच सहकारी तत्वावर आध ारित बाग्लादेशात स्वयंसहाय्याता बचत गट उदयाला आला. या प्रस्तुत शोध निबंधात “भारतातील महीला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटांची भूमिका” स्पष्ट करण्याचा थोडक्यात प्रयत्न शोधनिबंधकाराने केला आहे.

**संकल्पना "स्वयंसहाय्यता गट" :—** ज्यात प्रामुख्याने समानप्रश्न,सारखे आचार—विचार,समानमते व परस्पर जवळीक असणारे स्त्री—पुरूष एकत्र येतात व नियमित बचतीच्या माध्यमातून छोटया मोठया आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगिण विकास साधतात त्यांस "स्वयं सहाय्यता गट" म्हणतात.

एकाच वाडी किंवा वस्तीवरील एकाच सामाजिक, आर्थिक स्तरांमधील समविचारी,समान गरजा असणाऱ्या १० ते २० महीलांच्या संघटनास "स्वयंसहाय्यता गट" असे म्हणतात.

परिस्थीतीजन्य परावलंबनाकडून परिश्रमपूर्वक स्वावलंबनाकडे जाण्यासाठी स्वत:च्या क्षमतांच्या सुयोग्य उपयोग करून, समुहातील सकारात्मक सहमतीने बचतीच्या हेतूने महीलांनी केलेली वाटचाल म्हणजे स्वयंसहाय्यता गट होय.

"जिवनातील नव्या नव्या आव्हानांना व जबाबदाऱ्यांना पेलण्यासाठी क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे" स्वयंसहाय्यता गट होय.

**संशोधनाची उद्दीष्टे :—**

१. महीला आर्थिक विकासाची संकल्पना समजून घेणे.
२. महीला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता गटाच्या भुमिकेचा अभ्यास करणे.
३. भारतातील महीला स्वयंसहाय्यता गटाचे कार्य अभ्यासणे.
४. स्वयंसहाय्यता गटांच्या आर्थिक दृष्टीकोनाचा शोध घेणे.
५. महीलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यात प्रकाशित अप्रकाशित पुस्तके, ग्रंथ, लेख, मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, वार्षिकांक, प्रगती अहवाल, वेब साईट इत्यादींचा आधार घेऊन विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करून विश्लेषण करण्यात आले आहे व त्या आधारे निष्कर्ष काढून शिफारशी करण्यात आलेल्या आहेत व माहिती गोळा केलीत आहे.

**स्वयंसहाय्यता गटाची गृहीतके :—**

महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता महीला गटाचे महत्वपूर्ण

योगदान आहे. या गटांमुळे महीलांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक व राजकीय विकासातील सहभाग वाढला आहे. स्वयं सहाय्यता महीला गटांमुळे महीलांचे नेतृत्व विकासाला हातभार लागला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :—**

१. प्रस्तूत संशोधन ग्रामीण भागातील बचत गटांशी संबंधीत आहे.

२. संशोधनासाठी ग्रामीण भागातील बचत गटांची निवड करण्यात आली आहे.

**मर्यादा :—** प्रस्तूत संशोधन ग्रामीण भागातील मिळालेल्या माहितीच्या बचत गटांपुरतेच मर्यादित आहे.

**स्वयंसहाय्यता गटांचा इतिहास :—**

सुक्ष्मवित्ताचे बिज डॉ.मुहंम्मद युनुस यांनी बांग्लादेशातील “जोबरा” (जाबेस) या गावात रोवले. गरीबांच्या बचतीतून १९८३ मध्ये अधिकृत ग्रामीण बॅंक अस्तित्वात आली. त्याच्या यशाची प्रचिती पाहुन सर्वच देशांनी त्यांचा अंगिकार केला . त्यामूळेच डॉ.मुहंम्मद युनूस यांना “सुक्ष्म वित्ताचे जनक” म्हटल्यास वावगे ठरणार नाही. असे असले तरी भारतात ही पध्दती त्याही पूर्वीपासून भिसी, चिटफंड रूपात अस्तित्वात होती याच सुक्ष्मवित्ताचे इ.स.१९९५ पासून भारतात बचत गटाच्या योजनेच्या रूपाने विस्तार व विकास झाला.

**महीला सक्षमीकरणात स्वयं सहाय्यता गटांची भूमिका :—**

भारतात ३४ लाख ७८ हजार बचत गट असून ४.५ कोटी महीला यात सहभागी आहेत. त्यातील उलाढाल १८ हजार कोटी रू आहे. आंध्रप्रदेश बचत गटाच्या बाबतीत अग्रेसर असुन त्या खालोखाल तामिळनाडू, महाराष्ट्र राज्यात आजपर्यंत जवळपास १४.५ लाख बचत गट सक्षमपणे कार्य करीत आहेत. स्वयं सहाय्यता गटांच्या उद्दीष्टांमध्ये महीला सबलीकरण करणे हे एक महत्वपूर्ण उद्दीष्ट आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या माध्यमातून अर्थपूरवठा करून महीलांना आर्थिक पाठबळ दिले जात आहे. भारतात महीला सक्षमीकरणासाठी १ एप्रील १९९९ पासून ‘सूवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना’ सुरू करण्यात आली आहे. महीला आर्थिक विकास महामंडळ व स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमाने ही योजना राबविण्यात आली आहे.

स्वयं सहाय्यता गटामधील महीला गटाची चळवळ ही महत्वाची

आहे कारण महीला गट ही महीलांची सक्षम करणारी प्रमुख यंत्रणा बनली आहे. ग्रामीण महीलांना अडीअडचणी, आचार– विचारांची देवाण घेवाण करण्याचे स्वयं सहाय्यता गट एक व्यासपीठ बनले आहे. महीलांच्या विकासात स्वयं सहाय्यता गटाची भूमिका महत्वपूर्ण आहे. महीला स्वयं सहाय्यता गटाच्याव्दारे अधिक संघटीत झाल्या असून विविध कला कौशल्य व ज्ञान आत्मसात करण्याची जिद्द निर्माण झाली आहे. परिणामी कुटूंबात व समाजात महीलांचा दर्जा वाढला स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून अनेक आर्थिक, सामाजिक, उपक्रम सुरू करण्यात आले बचत करतांना महीला एक दुसरीच्या व्यथा समजून घेतानाच गावाच्या समस्यांविषयीही चर्चा करू लागली आहेत. एकजूटीने समस्या सोडवू लागल्या आहे. व त्या सोडविण्यात त्यांनी यश प्राप्त केले आहे.

महीलांच्या सक्षमीकरणासाठी 'महीला आर्थिक विकास महामंडळाची 'स्थापना' आंतरराष्ट्रीय महीला वर्षाच्या निमित्ताने २४ फेब्रुवारी १९७५ ला केली. पायाभूत विकास प्रक्रीयेतून महीलांसाठी सामाजिक, आर्थिक, न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्थापलेल्या महामंडळाला शासनाने महीला विकासाची राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणून २० जानेवारी २००३ घोषीत केले.

महीलासक्षमीकरणासाठी महीला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हाकार्यालया मार्फत स्वयं सहाय्यता गटावर आधारित महाराष्ट्र ग्रामीण पतपूरवठा कार्यक्रम, रमाई सक्षमीकरण योजना, राष्ट्रीय समविकास योजना यासारख्या योजनांची अंमल बजावणी केली जाते

महाराष्ट्रातील ३३ जिल्हयातील १३०३६ गावांत ३ लाख २६ हजार बचत गट असून १,१५,१९७ महीला गट आहेत स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महीला आर्थिक विकास महामंडळाचे कार्य महत्वाचे मानले जाते. तेजस्विनी महीला सक्षमीकरण कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या वतीने २००७ पासून मंजुर केला आहे महिलाच्या सक्षमीकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून चाललेले प्रयत्न महत्वपुर्ण ठरतात. ७७७८८बचत गटांनी व्यसवसाय सुरू केले असून यात ३७ लाख महीला काम करीत आहेत यात ७.५०० कोटी रू गुंतवण्यात आले

आहे. विदर्भातील चंद्रपूर जिल्हयात सर्वाधिक १८ हजार बचत गट असून अमरावती जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. प्रत्येक बचत गटात १० ते २० या सरासरीने ४ कोटी महीला बचतगट चळवळीत सक्रीय आहेत एस.बी.आय ने ६५० शाखांमधून ९१४ कोटी रू.चे बचत गटांना कर्ज वाटप केल्याचे आढळते.

**सुवर्ण जयंती ग्राम स्वंय रोजगार योजनेच्या माध्यमातून विदर्भातील स्वयंसहाय्यता बचत गटांची कामगिरी**

| अ. क्र | जिल्हा | बचत गट संख्या | महीला बचत गट संख्या | व्यवसाय सुरू केलेले गट | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण गट | महीला गट |
| १ | बुलडाणा | ६,६८३ | ३,०५१ | ४,८१२ | ५४४ |
| २ | अकोला | ५,४७६ | ४,३११ | १,१०७ | ७९५ |
| ३ | वाशिम | २,९३३ | २,१४७ | २,१८८ | ६४९ |
| ४ | अमरावती | ८,५१२ | ६,९९७ | ६,२९० | १,४३१ |
| ५ | यवतमाळ | ६,४६८ | २,८६० | ३,२३२ | १,५५५ |
| ६ | वर्धा | ३,४७२ | २,७६९ | ९५७ | ६०० |
| ७ | नागपूर | ४,२२५ | २,६३८ | ८६५ | ६६९ |
| ८ | भंडारा | ४,३८५ | ३,८५६ | २,२७२ | ७९५ |
| ९ | गोदींया | ५,७५५ | ४,५२१ | ४,४७० | ९०७ |
| १० | चंद्रपूर | ३,७६७ | ३,२५६ | १,२२९ | १,१७१ |
| ११ | गडचिरोली | ३,३५९ | ३,०४९ | २,८३१ | ८०८ |

**स्वयं सहाय्यता बचत गटाच्या कार्याचा आढावा**

१. ग्रामीण महीला रोजगार निर्मीतीसाठी प्रयत्नशिल असून आळस झटकून त्यांनी प्रगतीचा मार्ग स्विकारला आहे एम्ब्रा यडरीचा वापर करून सुबक, आकर्षक काम, गोधडी शिवण्याचे तंत्रशुध्द प्रशिक्षण रजई, दुलई, पेटींग काम घेऊन रोजगार व उत्पन्न मिळवून त्या स्वयंनिभर होत आहेत.

२. बचत गटांमुळे आर्थिक मदत झाली, आजार, शिक्षण, लग्न कार्यांसाठी आर्थिक मदत केली जाते. राजगिरा लाडु, तिळीचे लाडू, कुरडया, लाहया, तांदुळ पापड, मिरची पावडर, खारे शेंगदाणे, हळद पावडर इत्यादी तयार करून त्याच्या विक्रीतून चांगले उत्पन्न मिळवत आहे.

३. स्वयं सहाय्यता गटांमुळे जीवनाला स्थिरता आली आहे.

स्वयं सहाय्यता गटामुंळे सततचे करावे लागणारे स्थलांतर टळले आहे. गावरान मुळाची विक्री, प्रदर्शन यामुळे नफा सर्व सदस्यांना वाटुन दिला जातो. महीलांना शिक्षण व बचतीचे महत्व समजू लागले आहे.

४. महीला उत्कृष्ट व्यावसायिक बनल्याने त्यांनी स्वयं सहाय्यता गटांमार्फत उत्कृष्ट पॅकींगमधील व स्वकष्टातुन उत्पादीत तांदूळ प्रदर्शनातून, विक्रीतून व्यवहारात तरबेज होऊन, संवाद साधून चांगला रोजगार व उत्पन्न मिळवित आहे व कुटूंबाच्या आर्थिक उन्नतीला हातभार लावत आहेत.

५. ग्राहक आकर्षित करणारे गट निर्माण झाले आहेत. रंगीत कपडे, आभुषणे या वस्तुंच्या विक्रीतून उत्पन्नाच्या आर्थिक प्रगतीसह उत्पन्न वाढीला हातभर लावण्यासाठी स्वयंसहाय्यता गट उत्तम पर्याय आहे.

६. कला – कौशल्य विकसित करून ग्राहकांना आपला माल विकण्याचे तंत्र महीलांनी आत्मसात केल्याने बाजार, प्रदर्शनात, यात्रेत, सहभागी होऊन आर्थिक प्राप्ती करून स्वाभिमानी बनत आहेत.

७. स्वयंसहाय्यता गटांच्या साहय्याने तयार केली मॅजिक पर्स महीलांना भुरळ घालणारी ठरल्याने व्यावसायिकांनी पर्सची मागणी नोंदवली आहे. रेडीमेड स्वादिष्ट लिंबु शरबत, सुगंधी उटणे तयार केले यातून चांगले उत्पन्न मिळत आहे.

८. बचत गटाला दुग्ध व्यवसाय, अंगणवाडी पूरकपोषण आहार, कुरडया, चकल्या, गव्हाचा चिवडा, आभुषणे इत्यादी साहित्य विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नातून बचत करण्याची सवय लागली व आत्मविश्वास वाढून कुटूंबांची प्रगती होत आहे.

९. सेंद्रीय शेतीच्या प्रयोगासाठी काही महीला उत्पादकांनी कापसाची उत्पादकता वाढीसाठी उत्पादन खर्च कमी करून जमीनीचा पोत सुधारण्यासाठी प्रयत्न केले. यामुळे रोजगार व उत्पन्न मिळण्यासही मदत झाली.

१०. साक्षरतेचा मंत्र घेतला व तो पुर्णत्वास नेल्याने हिशेब व कागद पत्रांवर सहया करू लागल्याने इतर ही निरक्षर सभासदांना साक्षर करण्याचा मंत्र उचलला तोही स्वयं सहाय्यता गटाव्दारा केला गेला .

११. स्वयं सहाय्यता बचत गटांव्दारा ७ हजार कोटी रूपयांची

बचत केली गेली. याव्दारा ३.५ कोटी महीला एकत्रित येऊन या गटांव्दारे ३०० कोटी रूपयांची बचत केली व महीला स्वत:च्या पायावर उभे राहील्यात. गटांना नाबार्ड मार्फत कर्ज पूरवठा २२२७८ कोटी रूपये केला गेला. यातून महीलांनी स्वयं रोजगार, लघुउद्योग, गृहउद्योग, कुटीर उद्योग सुरू केले व महीलांचा आदरभाव वाढला.

१२. स्वयं सहाय्यता गटाव्दारे विविध उद्योगाव्दारे महीलांना आर्थिक उन्नतीचा मार्ग सापडला असून त्याव्दारे दुग्ध व्यवसाय, शेतीवर आधारित उद्योग, पशुपालन, पिठगिरणी, भातगिरणी, किराणा दुकान, विट भटटा, कांदा कटटा, कृषी सेवा केंद्र, सामुहीक शेती गटांव्दारे केली जात आहे.

१३. स्वयं सहाय्यता गटांव्दारा महीलांचा आत्मसन्मान वाढला गटांनी महीलांना जिद्द व परिश्रमाची जोड दिल्याने महीला आत्मनिर्भर व स्वावलंबी बनल्या आर्थिक फायदया बरोबरच सामाजिक सुरक्षितता व कुटूंब,समाजात मान सन्मान प्राप्त होत आहे.

१४. स्वयं सहाय्यता बचत गटांनी श्रमदानातून एक मातीचा बांधपुर्ण केला. दगडाची पिचिंगचे कामही पूर्ण केले. काही गटांनी जलसंधारणाच्या कार्यातही सहभागी होण्याचा संकल्प केला. पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमालाही हातभार लावला व पाणी अडविण्यासाठी श्रमदानातून बांध बांधला.

१५. महीला गटांव्दारा धान्यकोष स्थापला गेला. ज्वारी वाळवून, स्वच्छ करून, कणगीत साठविले, धान्याला किड लागू नये म्हणून कडु लिंबाचा पाला ठेवला कणगीचे तोंड शेणाने बंद करून जमा धान्याची नोंद लेख वहीत घेतली व नंतर गरजू सभासदांना वाटले यामूळे कूपोषण कमी होऊन सावकारी पाशातून कुटूंबांची सुटका झाली .

१६. स्वयं सहाय्यता गटाव्दारे मका, कापूस व जंगली झाडांपासून अनोखे ड्रायक्लावर तयार करण्यात येऊन त्याला मागणी वाढली.

१७. धान्यापासून मदय निर्मितीला महीला स्वयं सहाय्यता गटाचा विरोध होता. त्यामुळे महीलांमध्ये जाणीव जागृती वाढली होती असे जाणवले.

१८. स्वयं सहाय्यता गटातील महीलांनी घरच्या स्थितीवर चिंता करण्यापेक्षा कष्ट व चिकाटीतून प्रगती साधण्यासाठी संघटीतपणे काम करण्याचे ठरविल्याने गटाची प्रगतीकडे वाटचाल आहे.

१९. स्वयं सहाय्यता गटातील महीलांनी मोटार सायकलच्या बॅटरीवर चालणारे पवन अग्नी शेगडी चे नव उत्पादन इंधन व गॅस बचतीला पर्याय ठरून पत्र्याला चुलीचा आकार देऊन बॅटरीला जोडून शेगडी तयार केल्यास बॅटरी सुरक्षीत राहील. अन्न शिजविण्यासाठी ज्वाला नियंत्रणासाठी पंख्याचे रेग्युलेटर लावून शेगडीच्या एका भागाला कोळसा टाकून गृहीणी अन्न शिजवू शकते बॅटरीला चाजिंग सुविधा असल्याने शेगडीचा वापर कीतीही वेळा करता येतो त्यामुळे गटाला नविन्यपूर्ण उत्पादनाने चांगले उत्पन्न लाभत आहे.

२०. स्वयं सहाय्यता गट सदस्यांनी स्वत:चे घरकुल साकारंण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. गटांच्या सहाय्याने कष्टाला आकार देवून, कष्ट चिकाटीतून हिमतींने समर्थपणे मुकाबला करण्याचा निर्धार करित आहेत.

२१. स्वयं सहाय्यता गटाच्या माध्यमातून स्वत:चा चरितार्थ चालविण्यास मदत होत आहे. त्याव्दारे दाळया, फुटाणे, शेंगदाणे, गव्हाचा चिवडा ही उत्पादने पॅकींग करून विक्री करत आहेत.

२२. स्वयं सहाय्यता गटाव्दारा चाणाक्षपणे व्यवहार, व्यवस्थापन, आत्मविश्वासाने किराणा दुकान, कटलरी, सौंदर्य प्रसाधने विक्रीतून दोन पैसे हाताशी राहु लागल्याने पैसे उसनवार मागण्याची गरज कमी झाली आहे.

२३. स्वयं सहाय्यता गटाव्दारे लहान उद्योग व्यवसाय सुरू करून त्यांच्या विक्री व्यवस्थापनातून महीलांनी भरारी घेतली आहे.

२४. स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून महीलांना सक्षमीकरणाच्या वाटा खुल्या होऊन सुरक्षितता व आरोग्याला महत्व देण्यात येत आहे. गट सदस्य महीलांचा आरोग्य विम्याच्या माध्यमातून आरोग्याशी मैत्री करून विम्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहण्याच्या दृष्टी कोण विकसीत झाला आहे.

२५. स्वयं सहाय्यता बचत गटांनी बि—बियांणे, किटकनांशके,

खते विक्रीचे दुकान सुरू केल्याने प्रगतीस वाढ झाली आहे.

२६. स्वयंसहाय्यता बचत गटांव्दारे महीलांनी विकसित केलेले तंत्रज्ञान अंडी उबविण्याचे यंत्र उपलब्ध करून देण्यात आले. त्याबाबत प्रशिक्षणही देण्यात आले त्यामूळे गटांच्या महीलांना रोजगार मिळून त्यांचे उत्पन्न वाढीला मदत झाली.

महीलांच्या विकासासाठी स्वयं सहाय्यता गटांव्दारे आत्मविश्वास, आर्थिक स्वावलंबन निर्माण होत असले तरी गटांसमोर काही समस्याही येतात.

१. महीलांमध्ये संभाषण कौशल्याचा अभाव जाणवला.
२. महीला सभासदांमध्ये मत भेद जाणवले.
३. महीला महीलां सहकाऱ्यांमध्ये सहाकाऱ्यांचा अभाव दिसून आला.
४. महीला गटांमध्ये पुरूषांचा हस्तक्षेप अधिक दिसून आला.
५. काही प्रमाणात गटांमध्ये राजकीय हस्तक्षेप जाणवला.
६. स्वयं सहाय्यता गटांची केवळ संख्यात्मक वाढ झाली मात्र गुणात्मक वाढीला चालना मिळतांना दिसून आली नाही.
७. स्वयं सहाय्यता गटांच्या हिशेबात पारदर्शकता आढळून आली नाही.
८. स्वयं सहाय्यता चालविणाऱ्या महीला अशिक्षित आढळल्या
९. महीलांच्या विचारांत ऐक्याची भावना दिसली नाही.
१०. महीला सभासदांमध्ये स्वयं शिस्तीचा अभाव होता.
११. महीलांना कुटूंबातील विरोधामुळे आत्मविश्वासाचा आभार जाणवला.
१२. दारिद्रय रेषेवरील गटांना अनुदान नाही.
१३. गटांना सावकारी पाशाचा विरोध दिसला.
१४. केवळ सरकारी योजना म्हणून गटांची स्थापना झाल्यात.
१५. माल विक्रीची कायम स्वरूपी सोय नाही.

**उपाय :—**

१. स्वयं सहाय्यता बचत गटांमध्ये गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे.

२. उत्पादित माल विक्रीची कायमस्वरूपी बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.
३. गटांतील सभासदांना योग्य प्रशिक्षण मार्गदर्शन देण्यात यावे.
४. गटागंटामधील गैरसमज दुर करावेत.
५. गटांतील ही कामात पारदर्शकता ठेवावी.
६. सभासदांमध्ये ऐक्याची भावना रूजवावी.
७. संयम व चिकाटी राखून राजकीय हस्तक्षेप टाळावा.
८. स्वयं सहाय्यता गटाचा आर्थिक विकासाचे साधन म्हणून विचार व्हावा.
९. अनुदान देण्याचे मापदंड बदलावे.
१०.सभासदांनी परस्परांमध्ये आत्मियता व सहकार्याची भावना जोपासली पाहीजे.

**निष्कर्ष :—**

१. महीला गटांचा शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राशी संबंधीत जडणघडणीत सर्वाधिक वाटा आहे.
२. स्वावलंबित्व, आत्मविश्वास, यात वाढ झाल्याचे दिसुन आले.
३. पारंपारिक ज्ञानावर विश्वास नसणे, अपूऱ्या बाजाराच्या सोई, जाहीरातीचे कमी प्रमाणामुळे बाजारात समस्या उदभवल्या .
४. गुणवत्ता नियंत्रण व विकासाची जबाबदारीची जाणीव गटांच्या व्दारा दिसुन येते.
५. दुर्गम व ग्रामीण भागातील गटांबाबत अनास्था शासन दरबारी दिसते.

**शिफारशी :—**

१. महीला गट विषम समायोजन होऊ नये त्यात समतोल राखावा.
२. सदस्यांना आत्मनिरीक्षणाने गुणदोष निराकरणाची सवय विकसित करावी.
३. गटांना भुषणावह शक्ती केंद्र होऊन गट व शासनाच्या समन्वयातून सशक्त बाजारपेठ उभारावी.
४. आशावाद न सोडता कार्यमग्न राहुन महीला समुपदेशकांची

गटांनी सेवा घ्यावी.

५. महीलांच्या पाल्यांना शिक्षणासाठी शासन व गटांच्या सहकार्याने विशेष शाळा असावी.

६. बचत गटांना साक्षरता व संगणक साक्षरता याची शासनामार्फत प्राधान्याने सोय उपलब्ध करून द्यावी.

**समारोप :—**

स्वयं सहाय्यता महीला बचत गट योजना समाजातील तळागाळातील जनता विशेषत: महीला आणि देशांसाठी फायदेशिर आहे कारण गरीबी व बेरोजगारी सारख्या समस्यांची तिव्रता कमी करण्यासाठी मदत होऊ शकते.

**संदर्भ सुची :—**


१. मानवी हक्क — प्रा.व्ही.बी.पाटील.

२. प्रबोधन प्रकाशन ज्योती.

३. महाराष्ट्र वार्षिकी.

४. अर्थसंवाद.

५. दै.लोकसत्ता, सकाळ, देशोन्नती, लोकमत, दिव्य मराठी, तरूण भारत.

६. लोकराज्य मासिक.

७. kshitij. क्षितीज —संशोधन पत्रिका

८. 'प्रतिबिंब'— महीला समस्यांचा आत्मशोध — अथर्व पब्लीकेशन, जळगांव.

९. NIIRJ – Research Journal प्रथमेश प्रकाशन, औरंगाबाद .


❑❑❑

11

# महिला सबलीकरणात स्वयंसहायता बचतगटांची भूमिका

**डॉ. ढास डी. के.**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय, नेकनुर जि. बीड

**प्रस्तावना :**

बांगला देशात डॉ. मोहम्मद युनूस यांनी स्वयंसहायता बचतगटाचे बीज रोवले. त्यांनी जाबेरा या गावात गरीबांच्या बचतीतून ग्रामीण बँकेचा प्रकल्प सुरु केला. ग्रामीण बँकाकडे बांगला देशात आज ९६ टक्के महिला सदस्य आहेत व ९० टक्के भाग महिलांच्या मालकीचे आहेत. देशातील गरीबी दूर करण्यासाठी व कुटुंबे आत्मनिर्भर राहण्यासाठी डॉ. युनूस यांनी बचतगट हे माध्यम लोकांच्या हाती सोपविले आहे. या स्वरुपात १९९० च्या दशकात भारतामध्ये राज्य आणि केंद्रसरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामविकासाच्या योजना राबविल्या जात आहेत.

भारतात स्वयंसहायता गटाची पहिली चळवळ म्हैसूर पुनर्निर्धारण आणि विकास एजन्सी (मायराडा) या संस्थेने सन १९८७ मध्ये सुरु केली. सन १९९० मध्ये भारताच्या नियंत्रणावरुन डॉ. मोहम्मद युनूस यांनी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, दिल्ली येथे स्वयंसहायता बचतगटांना मार्गदर्शन केले. सन १९९२ मध्ये Asia Pacific Rural and Agricultaral Credit Association च्या सहाय्याने भारतामध्ये स्वयंसहायता गट कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. सन १९९३ मध्ये रिझर्व्ह बॅंकेने कायदेशीर मान्यता दिली. या चळवळीमध्ये महिलांचा लक्षणीय असा सहभाग वाढत गेल्यामुळे

प्रादेशिकदृष्ट्या स्वयंसहायता गटांची जोमाने वृध्दी होत गेली. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, आंध्रप्रदेश कर्नाटक व केरळ राज्यात स्वयंसहायता गटांची वाढ आघाडीवर आहे.

सन १९९२ मध्ये नाबार्डने ५०० स्वयंसहायता गटांना बॅंकेशी जोडण्यास सुरुवात केली. रिझर्व्ह बॅंकेने स्वयंसहायता बचतगटांच्या वित्तासाठी बॅंकांना मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली. १९९६ मध्ये स्वयंसहायता गटांचा बॅंकींग क्षेत्राच्या प्राधान्यक्रम कर्जाच्या क्षेत्रात समावेश केला. म्हणून स्वयंसहायता गटांच्या बॅंक संलग्नता संख्येत वाढ होत गेली. भारतात वित्तीय संस्थाप्रमाणेच स्वयंसेवी संस्थाचेही स्वयंसहायता गटांच्या महिला सक्षमीकरणात फार मोठे योगदान आहे. सन १९९८—९९ पासून प्रत्येक वर्षी केंद्रीय अंदाजपत्रकात स्वयंसहायता गटांबाबत तरतुदी केलेल्या आहेत. अशा प्रकारे भारतात लोक सहभागातून मिनी सहकार म्हणून ही चळवळ वाढत गेली.

घाम गाळून पैसा कमवायचा आणि त्याची कसल्याच स्वरुपात साठवणूक न करणे, याचा भविष्यकालिन जीवनावर विपरीत परिणाम होतो. 'ठेवा गाठीला उपयोग पडेल साठीला' या उक्तीप्रमाणे भविष्याचा वेध घेत स्वयंसहाय बचतगट ही जन्मभर पुरणारी व मृत्यूनंतर पुरुन उरणारी संपदा आहे. तसेच बचतगटाच्या वाटा काढतील सावकारशाहीचा काटा म्हणून सहकार तत्वाआधारे परस्पर सहकार्यातून सामुहिक हितसाध्य करणे या उद्देशाने 'थेंबे थेंबे तळे साचे' या प्रवृत्तीतून बचतगट अस्तित्वात आले.

**स्वयंसहाय बचतगट व्याख्या :**

साधारणपणे स्वयंसहाय बचतगट म्हणजे सर्वसाधारण १५—२० महिलांचा समुह होय की जो समान रक्कम ठराविक कालावधीत बचत म्हणून एकत्र करतो व त्याचा विनियोग/उपयोग सर्वांसाठी लोकशाही मार्गाने करतो. याचा अर्थ बचतगट हे सहकार तत्वास अनुसरुन स्थापन होतात.

"परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे, स्वावलंबनाकडून परस्परावलंबनाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, सहमतीने सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेला प्रवास म्हणजे स्वयंसहाय बचतगट होय. ही व्याख्या दर्शविते की, स्वयंसहाय बचतगट ही कोणतीही योजना अथवा प्रकल्प नसून एकत्र येणाऱ्या महिला सदस्यांना संघटीत करुन

त्यांना विकासात्मक स्वरुपाचे शिक्षण देण्याचे माध्यम आहे. बचतगटांचे स्वरुप आर्थिक विकासाबरोबरच समाविष्ठ महिलांचा मानसिक, वैचारिक परिवर्तन घडवून आणून त्यांना स्वबळावर उभे राहण्यास मदत करणे या हेतूने प्रेरित असावा. साधारणत: महिला पारतंत्र्यातच जीवन जगतात. त्यांना मानसिक, आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्याचे कार्य स्वयंसहाय बचतगट करतात. स्वयंसहायता गट ही चळवळ महिलांच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी असली तरीही महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक प्रश्नांची सोडवणुक देखील या गटांच्या माध्यमातून होत आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. द्वितीय स्त्रोतामध्ये प्रकाशित ग्रंथ पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट :**

१. स्वयंसहाय बचतगटातील सहभागी महिलांचा आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
२. स्वयंसहाय बचतगटात सहभागी सदस्यांच्या बचतीच्या व उद्योजक वृत्तीचा अभ्यास करणे.
३. स्वयंसहाय बचतगटातील महिला स्वावलंबन व सहकार्य वृत्तीचा अभ्यास करणे.

**संशोधन अभ्यासाची गृहितके :**

१. स्वयंसहाय महिला बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा विकास होत आहे.
२. या गटांच्या माध्यमातून सहभागी महिला स्वावलंबी होत असून त्यांच्यामध्ये उद्योजक वृत्ती वाढीस लागत आहे.
३. महिलांमध्ये स्वयंसहाय गटांच्या माध्यमातून बचतीची सवय व सहकार्यवृत्ती वाढीस लागत आहे.

**महिला स्वयंसहायता बचतगटाची संकल्पना :**

महिला स्वयंसहायता बचतगट संकल्पना लघुवित्त गट, स्वावलंबन गट, सहकार गट, काटकसर गट बचतगट, कर्ज गट शेजार,

स्वयंसहायता गट, महिला बचत गट या संकल्पनेतून पुढे आली आहे. जगप्रसिध्द बांगला देश ग्रामीण बँकेचे प्रणेते नोबेल अॅवार्डचे मानकरी डॉ. महंमद युनूस यांनी स्वयंसहायता गटाची प्रथम सुरुवात केली. गटांतर्गत सदस्यांनी गोळा केलेल्या पैशाची आपआपसातील प्रश्न सोडविण्यासाठी देवाणघेवाण करु लागले. युनूस यांनी या या गटातील व्यवहाराचा अभ्यास करुन इ.स. १९७९—८० मध्ये ग्रामीण बँकांची स्थापना केली. अमेरिकेत तत्कालिन राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी सदरील बचतगटांचे कार्य पाहून अमेरिकेतही बचतगटांची स्थापना केली. हळूहळू ही चळवळ आफ्रिका, इंडोनेशिया,मलेशिया, फिलीवाईनस आखाती देश व आशीबाई देशात पोहचली असून जागतिक पातळीवर ही चळवळ जोमाने सुरु आहे.

भारतात उघुउद्योग बॅंकेने सिडबी स्मॉल इंडस्ट्रीज बॅक ऑफ इंडियो सूक्ष्मवित्त संस्था ही संकल्पना विकसित करुन नवी दिशा दाखविली. गरीबी निर्मूलन, रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरणासाठी नाबार्ड, सुवर्णजयंती ग्रामयोजना, अल्पसंख्यांक महिला सक्षमीकरण योजना राष्ट्रीय समविकास योजना व तेजस्विनी ग्रामीण महिला सक्षमीकरण योजना अंतर्गत स्वयंसहायता गकटांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रात चैतन्य, अन्नपुर्णा जेभबीव्हीम पुणे या संस्थाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**तक्ता**

**महाराष्ट्र राज्यातील स्वयंसहायता गटांची संख्या**

| अ. क्र. | संस्था/यंत्रणेचे नाव | योजना | स्थापन गटांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | ग्रामविकास विभाग | सुवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना | १६४९२६ |
| २. | महिला आर्थिक विकास महामंडळ | रमाई महिला सक्षमीकरण, आदीवासी विकास, स्वयंसिध्दा, तेजस्विनी आदी | ५४४०१ |
| ३. | नागरी विकास विभाग | स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना | ३८२३६ |
| ४. | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | जलस्वराज्य प्रकल्प, महिला सक्षमीकरण प्रकल्प ३ | १३६३८ |
| ५. | नाबार्ड | नाबार्ड अॅड ऑन | १३१४७० |
| | **एकूण बचतगटाची संख्या** | | **४०२६७१** |

स्त्रोत : लोकराज्य, मार्च २००८.

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ग्रामविकास महिला आर्थिक विकास महामंडळ, नागरी विकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि नाबार्ड अंतर्गत विविध योजनांच्या माध्यतमातून महिला सक्षमीकरणाच्या हेतूने महाराष्ट्रात ४०२६७१ महिला स्वयंसहायता बचतगट कार्य करत होते. भारतात १९९९ मध्ये स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत एस.जी.वाय. अंतर्गत दारिद्र्य निर्मूलन करण्याकरिता अनुदान तत्वावर स्वयंसहायता गटाच्या चळवळीस पोषक वातावरण तयार झाले असून स्वयंसहायता गटाचे जाळे देशभर विणल्या जात आहे. महिलांचा स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्याचा सर्वच स्तरावर प्रयत्न केला जातो. महाराष्ट्रातील इ. स. २००८—२००९ या कालावधीत विविध योजनेमार्फत बचतगटांची संख्या जातीनिहाय सदस्य संख्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या बचतगटांमध्ये एस.सी. महिला सदस्यांची टक्केवारी एस.जी.एस. वाय. या बचतगटांमध्ये गटांमध्ये १७.३१ टक्के, एस.टी. महिलांची १९.०० टक्के ओबीसी महिलांची २८.९२ टक्के सर्वाधिक दिसून येते. तर अल्पसंख्यांक जातीच्या सहभागी महिलांची टक्केवारी २.६९ टक्के सर्वात कमी प्रमाणात दिसून येते. कृषी बचतगटांच्या सहभागी महिलांच्या टक्केवारीतही ओबीसी महिलांची सर्वाधिक ३२.८० टक्के दिसून येते. एवढीच दिसून येते. एकंदरीत शासन योजनेमार्फत निर्मित बचतगटांमध्ये एस.सी, एस.टी., ओबीसी, अल्पसंख्यांक, एन.टी. व इतर अशा सर्वच समाजातील महिलांचा समावेश असल्याचे दिसून येते.

**बचतगटांचे महत्त्व आणि लाभ :**

ग्रामीण विकास व महिला बचतगट आणि इतर सहकारी संस्था या संदर्भात संशोधकाने उत्तरदात्यांचा शिवणी या गावातील ३ (तीन) बचतगटांच्या २० अभ्यासाचे प्रत्यक्ष नमुना पाहणी २०१२ नुसार बचतगटांचे महत्त्व आणि लाभा संदर्भात पुढील विवेचन मांडले आहे.

१. स्वयंसहायता बचतगटांमधून परस्पर विश्वास व काटकसर करण्याची प्रवृत्ती वाढते यास २० पैकी १७ म्हणजेच ८५ टक्के

उत्तरदात्यांनी होकार दिला.

२. सदरील गटांच्या माध्यमातून समुहशक्तीची जाणीव होण्याबरोबरच सहकार्य भावना वाढीस लागण्यास मदत होते असे ८५ टक्के उत्तरदात्यांनी मान्य केले आहे.

३. बचतगट कुटुंब कर्जमुक्तीसाठी व शेतीसाठी उपयोगी ठरल्याचे ८० टक्के उत्तरदात्यांनी मान्य केले.

४. स्वयंसहायता गटांद्वारे १०० टक्के उत्तरदात्यांना आर्थिक व्यवहार करण्याचे ज्ञान प्राप्त झाले.

५. नवीन लोकांच्या ओळखी, समाजाचे ज्ञान आणि लोकांचे वर्तन समजल्याचे स्वयंसहायता गटाच्या १०० टक्के उत्तरदात्यांनी मान्य केले आहे.

६. ९५ टक्के उत्तरदात्या महिलांनी स्वयंसहायता गट मुला—मुलींच्या शिक्षणासाठी फायदेशीर ठरल्याचे मान्य केले.

७. १०० टक्के उत्तरदात्या महिलांना सन्मानाने जगण्याची संधी प्राप्त झाली.

८. १०० टक्के उत्तरदात्या महिला स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झालेल्या आहेत.

९. १०० टक्के सदस्य महिलांना ग्रामीण विकासाच्या विविध कार्यात सहभागी होता आले.

१०. ६५ टक्के उत्तरदात्या महिलांचे जीवन आर्थिकदृष्ट्या सुरक्षित झाले.

११. ७५ टक्के उत्तरदात्या महिलांना कमी बचतीत स्वयंसहायता गटांच्या माध्यमातून एखादे मोठे काम करणे शक्य झाले.

१२. विविध शासकीय योजनांची अमंलबजावणी स्वयंसहायता गटाकडून केला जात असल्याने त्याचा फायदा या गटांना मिळतो. उदा. अंगणवाडी, शाळेची खिचडी बनवणे, स्वस्त धान्य दुकान वाटप, सेतू केंद्राचे काम इत्यादी वरील बाबींबरोबरच स्वयंसहायता बचतगटाच्या माध्यमातून उद्योजकता वृत्तीत वाढ झाली, संघटन व सहकार्य वृत्तीत वाढ झाली. आत्मविश्वास वाढला, बॅंक व्यवहारात वाढ झाली. अशा

विविध फायदे स्वयंसहायता बचतगटांचे प्राप्त होऊन महिलांच्या स्वावलंबनामधून सक्षमीकरणास मदत झालेली आहे.

महिला स्वयंसहायता बचतगटासमोरील अडचणी :

१. उद्योग व्यवसायासंबंधीचे ज्ञान स्वयंसहायता गटातील महिलांना नसते.
२. महिला स्वयंसहायता गटातील महिलांना उद्योग व्यवसायाबद्दलचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळत नाही.
३. नॉन बीपीएल बचतगटांना राज्यशासनाकडून अनुदान मिळत नाही.
४. महिला स्वयंसहायता बचतगटांनी निर्माण केलेल्या वस्तुंना योग्य बाजारपेठ मिळत नाही.
५. आवश्यकतेनुसार बॅकांचे सहकार्य मिळत नाही.
६. शासकीय कार्यालयात अडवणुक केली जाते.
७. भांडवलाची कमतरता असते.
८. शासकीयाद्वारे अडवणुक केली जाते. अनावश्यक माहिती वारंवार मागविली जाते. फाईल तयार करुन सतत जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. शासकीय कार्यालयाकडून वेळेत काम केले जात नाही. त्यामुळे वेळ, पैसा यांचा अपव्यय होतो.

**शिफारशी :**

१. बचतगटाच्या कार्यात तळागाळातील महिलांचा समावेश होणे आवश्यक आहे.
२. महिला सक्षमीकरणाचे उद्‌दिष्टास अनुसरुन अर्थसंकल्पाची मांडणी करावी.
३. महिला स्वयंसहायता गटातील महिलांना विविध उद्योग, व्यवसाय आणि बॅक व्यवहाराचे योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात यावे.
४. स्वयंसहायता गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना योग्य बाजारपेठ उपलब्ध करुन घ्यावी.
५. महिला स्वयंसहाय गटांना बॅकामार्फत करण्यात येणारा कर्जपुरवठा विनाविलंब करण्यात यावा.

६. महिला स्वयंसहायता गटांशी संबंधित शासकीय कार्यालयाकडून होणारी अडवणूक यावर निर्बंध घालण्यात यावा.

**निष्कर्ष :**

महिला स्वयंसहायता गटांमुळे महिला सक्षमीकरणास मदत होत आहे. समाजातील आर्थिक दुर्बल घटकांना सावकाराच्या पाशातून मुक्ती मिळत आहे. महिलांमध्ये उद्योजकता वृत्ती वाढीस लागून त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनत आहेत. महिलांमध्ये स्वयंसहायता गटाच्या माध्यमातून सद्भावना, सहकार्याची भावना, काटकसर व बचतीची प्रवृत्ती व उद्योगवृत्ती वाढीस लागत असून महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत आहे. महिलांमध्ये स्वअस्तित्वाची जाणीव निर्माण होऊन समाजात त्यांना प्रतिष्ठा मिळत आहे. महिलांच्या आर्थिक विकासाबरोबरच त्यांच्या कुटुंबाचा पर्यायाने देशाचा व समाजाच्या विकासास हातभार लागत आहे. स्वयंसहायता गटांची चळवळ महिलांच्या भवितव्याला आकार देण्याचे कार्य सक्षमपणे करीत असून आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही स्फुर्तीदायक बाब आहे. देशात स्वयंसहायता गट महिला सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**संदर्भ :**

१. मुलाणी एम.यु., महिला स्वयंसहायता बचतगट.
२. मुलाणी एम.यु., अल्पबचत नियोजन (बचतगट)
३. कुसूम बाळ सराफ, सहयोगिनी, स्वयंसहायक बचतगट चळवळीचा कणा.
४. शिवाजी गायकवाड, पीएच.डी. प्रबंध, सामाजिक कार्य, उद्योजकता व महिला सबलीकरण.
५. लोकराज्य, डिसेंबर २००७.
६. Shodhyanga.infilbnet.ac.in
७. रमेश बालावाड, बचतगटातून समृध्दीकडे.
८. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क मंत्रालय २०१०.
९. मार्गदर्शिका पुस्तिका बचतगट माविम प्रकाशन, मुंबई.

**12**

# हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची—स्पर्धात्मक नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादरीकरण उपक्रमात महिला स्वयंसहायता बचत गटांचा सहभाग—एक अभ्यास

**(विशेष संदर्भ : बुलडाणा जिल्हा)**

**प्रा. हरिष तुकाराम साखरे**
सहयोगी प्राध्यापक — संशोधन विद्यार्थी,
महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य
महाविद्यालय, बुलडाणा

**********

**१.१ प्रस्तावना :**

भारतातील एकुण लोकसंख्येच्या संख्येने निम्म्या असलेल्या महिला शक्तीला विविध संधी उपलब्ध करून देऊन त्यांचा राष्ट्राच्या विकासात महत्त्वपूर्ण सहभाग वाढविण्यासाठी व महिलांच्या सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्र तसेच राज्य शासन विविध धोरणे, योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर भर देत आहे. गेल्या दोन दशकात देशात नावारूपास आलेल्या महिलांच्या स्वयंसहायता बचत गट चळवळीने महिलांच्या सामाजिक—आर्थिक तसेच राजकीय सक्षमीकरणात मोलाचे योगदान दिले आहे. आज महिलांच्या स्वयंसहायता बचत गट चळवळीचे रूपांतर एका वटवृक्षात झाले असून, या चळवळीला पुन्हा जोमाने उभारी देण्यासाठी शासनाने महिला स्वयंसहायता बचत गटांच्या विकास योजनांचे पुनर्गठन करून राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियान (NRLM) च्या धर्तीवर महाराष्ट्र शासनाने

राज्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) अर्थात 'उमेद' तसेच नागरी भागात राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान (NULM) या योजना सन २०११ पासून सुरू केल्या आहे. राज्य शासनाने सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजनेतून 'उमेद' अंतर्गत स्थापीत बचत गटांना बिनव्याजी बँक कर्ज उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन राज्यातील २०१४ नंतर उमेद अभियानातून स्थापन करण्यात आलेल्या बचत गटांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. तसेच महिलांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी नवतेजस्विनी योजनेअंतर्गत १० लाख कुटुंबांना दारिद्र्य रेषेबाहेर आणण्याचा मानस समोर ठेवत ५ लाख महिला स्वयंसहायता बचत गटांची चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी ५२८ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. तसेच स्वयंसहायता बचत समूहातील महिलांमध्ये कायदेविषयक, सामाजिक, आर्थिक ज्ञानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोगामार्फत 'प्रज्वला योजना' सुरू करण्यात आली आहे. तसेच महिलांमधील उद्योजकतेस प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र महिला उद्योजकता धोरण—२०१७ घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

स्वयंसहायता बचत गटांमधील महिलांमध्ये असलेल्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना मॉडेल्सना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व जिल्ह्यात 'हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची' ही अभिनव स्पर्धारूपी योजना जुलै—ऑगस्ट २०१९ या कालावधीत राबविण्यात आली. या नाविन्यपूर्ण उपक्रमात सहभाग घेतलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील महिला बचत गटाचे अध्ययन प्रस्तुत संशोधनात करण्यात आले आहे.

**१.२ संशोधन विषयाचे शीर्षक :**

''हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची स्पर्धात्मक नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादरीकरण उपक्रमात महिला स्वयंसहायता बचत गटांचा सहभाग—एक अभ्यास'' (विशेष संदर्भ : बुलडाणा जिल्हा)

**१.३ संशोधनाची उद्दिष्टे :**

१. हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची या योजनेची पार्श्वभूमी

अभ्यासणे.

२. महिलांच्या स्वयं–सहायता बचत गटांच्या नाविन्यपूर्ण उद्योग–प्रकल्प सादरीकरणात महिला बचत समूहांचा सहभाग अभ्यासणे.

३. गटांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहनपर आर्थिक व पायाभूत सुविधांचा शोध घेणे.

४. महिला स्वयंसहायता बचत गटांच्या नवउद्योजक विकसनात प्रस्तुत उपक्रमाचे यशापयश अभ्यासणे.

**१.४ संशोधनाची गृहितके :**

१. महिलांच्या स्वयंसहायता बचत गटांना नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादरीकरणातून नवउद्योजक निर्मितीस चालना व प्रोत्साहन देण्यात प्रभावकारी साधन म्हणून उपयुक्त आहे.

२. नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना प्रकल्प मॉडेल्स सादरीकरणात स्वयंसहायत बचत गटांना सादरीकरणाचे सुयोग्य मार्गदर्शन, कौशल्य, मांडणी व स्टेज डेअरींग इ.च्या अभावी स्पर्धात्मक उपक्रमात यशस्वी होण्यात अडसर ठरलेत.

**१.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन हिरकणी–नवउद्योजक महाराष्ट्राची–बुलडाणा जिल्ह्यत राबविण्यात आलेल्या व या उपक्रमात सहभाग घेऊन ज्या महिला स्वयंसहायता समूहांनी आपल्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादर केल्यात अशा जिल्ह्यतील गटांपुरतेच मर्यादित आहे.

**१.६ संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन कार्यात अध्ययनाशी निगडीत व अत्यावश्यक तथ्यांचे संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला. प्राथमिक स्त्रोतामधील मुलाखत, गटचर्चा आणि सहभागी निरीक्षण या साधनांच्या आधारे निवडक १०० प्रतिसादक गट प्रमुखांच्या मुलाखतीद्वारे तसेच गटचर्चेतून सहभागी निरीक्षणाच्या माध्यमातून विविध अध्ययन पैलूंवर कार्यकारण संबंध जाणून घेऊन तथ्यांचे संकलन करण्यात आले. तसेच द्वितीयक स्त्रोतांतर्गत अभ्यास विषयाशी संबंधीत लिखित साहित्य जसे ग्रंथ, मासिके, शासकीय निर्णय, वर्तमानपत्रे इत्यादीद्वारे संदर्भीय माहिती उपलब्ध करून तथ्यांचे

प्रस्तुतीकरण करण्यात आले आहे.

**१.७ सारणीकरण, तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन:**

महिला स्वयंसहायता बचत गटांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देणे व सर्वोत्कृष्ठ ठरणाऱ्या नाविन्यपूर्ण उद्योग मॉडेल्सना पायाभूत सुविधा व प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य करून, महिला बचत गटांच्या उद्योजकतेस वाव देऊन नवउद्योजकांना चालना देण्याच्या हेतूने 'हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची' ही योजना अभिनव पद्धतीने बुलडाणा जिल्ह्यात राबविण्यात आली. त्याचा तपशील याप्रमाणे—

**तक्ता क्र. १**

**बुलडाणा जिल्ह्यतील महिला स्वयंसहायता बचत गटांचा हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची योजनेत तालुका व जिल्हास्तर नाविन्यपूर्ण सहभाग व प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य राषी दर्षक तक्ता**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | एकुण महिला बचत गटांचा सहभाग | तालुका निहाय नाविन्यपूर्ण पात्र लक्ष्य गट | पुरस्कृत राशी (प्रत्येकी ५००००रू.) | जिल्हास्तरीय उत्कृष्ट नाविन्यता प्राप्त गट संख्या (लक्ष्य मर्यादा १०) | प्रोत्साहनपर राशी (प्रत्येकी २ लाख रू) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुलडाणा | ६८ | १० | ५,००,००० | जिल्ह्यतून १० | २०,००,००० रू. |
| २ | चिखली | १४० | १० | ५,००,००० | | |
| ३ | मेहकर | ८० | १० | ५,००,००० | | |
| ४ | लोणार | ३४ | १० | ५,००,००० | | |
| ५ | सिंदखेडराजा | १२६ | १० | ५,००,००० | | |
| ६ | देऊळगांवराजा | ७२ | १० | ५,००,००० | | |
| ७ | खामगांव | १३६ | १० | ५,००,००० | | |
| ८ | षेगांव | ७८ | १० | ५,००,००० | | |
| ९ | नांदूरा | ५५ | १० | ५,००,००० | | |
| १० | मलकापूर | २९ | १० | ५,००,००० | | |
| ११ | मोताळा | ८७ | १० | ५,००,००० | | |
| १२ | जळगांव जा. | ७२ | १० | ५,००,००० | | |
| १३ | संग्रामपूर | ९६ | १० | ५,००,००० | | |
| | एकूण | १०७३ | १३० | ६५,००,००० | १० | २०,००,००० |

स्त्रोत : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बुलडाणा (म.रा.ग्रा.जी. अभियान) सप्टेंबर २०१९.

प्रस्तुत तक्त्याचे निरीक्षण केले असता दोन टप्प्यात या स्पर्धात्मक उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात आली असल्याचे

स्पष्ट होते. पहिल्या टप्प्यात तालुका स्तरीय समितीच्या पुढे हिरकणी नवउद्योजक महाराष्ट्राची उपक्रमांतर्गत महिलांच्या स्वयंसहायता बचत गटांनी आपल्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्पना सादर केल्या. त्यात बुलडाणा जिल्ह्यातील १३ तालुक्यात सादरीकरण प्रस्तुत करण्यात आले. त्यात जिल्ह्यातून १०७३ महिला स्वयंसहायता बचत गटांनी सहभाग घेतला. त्यापैकी तालुकानिहाय १० च्या मर्यादेत (योजनेत सांगितल्याप्रमाणे) १३ तालुक्यातून प्रत्येकी १० याप्रमाणे १३० बचत गटांना तालुका निवड समितीने परीक्षणाअंती नाविन्यपूर्ण उत्कृष्ठ संकल्पना म्हणून घोषित करून प्रत्येकी ५०००० रू. याप्रमाणे १३० बचत गटांना एकूण ६५,००,००० रूपयांचे आर्थिक सहाय्य केल्याचे स्पष्ट होते.

दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातील सर्व तालुका स्तरावर निवडीस पात्र ठरलेल्या १३० महिला स्वयंसहायता समूहांना जिल्हास्तरावर आपल्या नाविन्यपूर्ण उद्योग–प्रकल्प मॉडेल्सचे सादरीकरणाची संधी देण्यात आली. जिल्हास्तरावर स्थापित जिल्हा नाविन्यता परिषदेकडून आमंत्रित ५ पॅनल तज्ञ परिक्षकांच्या मंचासमोर १३० बचतगटांना सादरीकरण करण्यास आमंत्रित करण्यात येऊन, त्यापैकी परीक्षकांच्या परिक्षणाअंती निवडयोग्य ठरलेल्या १० महिला स्वयंसहायता बचत गटांच्या नाविन्यपूर्ण उद्योग संकल्प मॉडेल्सना सर्वोत्कृष्ठ म्हणून पात्र ठरवले. जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ठ १० गटांना प्रत्येकी २ लाख याप्रमाणे एकूण २० लाख रूपयांचे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठीचे अर्थसहाय्य प्रदान करण्यात येऊन पुरस्कृत करण्यात आले.

**१.८ निष्कर्ष :**

महिलांचे सक्षमीकरण आणि उद्योजकता विकासातून रोजगार निर्मिती हे ध्येय समोर ठेऊन राज्य शासन महिलांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना अधिक सक्षम करण्यासाठी विविध धोरणे, योजना व कार्यक्रमांच्या अंमलबजावणीवर भर देत आहे. महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात नाविन्यपूर्ण संकल्पनांचा खजिना असून महिलांच्या बचत गटांच्या माध्यमातून लाखो उद्योग व रोजगार निर्माण होऊ शकतात हे गमक ओळखून राज्य शासनाने बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी

हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची या स्पर्धात्मक उपक्रमाच्या माध्यमातून नवउद्योग संकल्पनांना उभारी देण्याच्या हेतूने गटांना नाविन्यपूर्ण उद्योग प्रकल्प मॉडेल्स सादर करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यात या योजनेच्या रूपाने एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

हिरकणी—नवउद्योजक महाराष्ट्राची या स्पर्धात्मक उपक्रमात महिला स्वयंसहायता बचत गटांनी आपल्या नाविन्यपूर्ण उद्योग—व्यवसाय प्रकल्पांचे नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर करून आपल्या कल्पनाशक्तीच्या कौशल्यपूर्ण साहस, जिद्द व पुढाकार वृत्तीचा प्रत्यय दाखवून दिला. असंख्य बचत समूहांचा या स्पर्धात्मक उपक्रमातील सहभाग अद्वितीय असाच म्हणवा लागेल. त्याबरोबरच त्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योग प्रकल्प, त्याची सामाजिक व शाश्वत उपयुक्तता आणि टिमवर्क या महत्त्वपूर्ण पैलूंवर परिक्षिकांद्वारे गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या नाविन्यपूर्ण संकल्प—प्रकल्पांना प्रथम प्रत्येक तालुका (१० च्या मर्या.) सर्वोत्कृष्ठ ठरलेल्या बचत समूहांना जिल्हास्तरावर तज्ञ समितीपुढे उद्योग संकल्पना सादर करण्याची संधी देऊन मूल्यांकनाद्वारे सर्वश्रेष्ठ अशा नाविन्यपूर्ण प्रकल्प मॉडेल्सची निवड करण्यात येऊन उत्कृष्ठ ठरलेल्या बचत गटांच्या नाविन्यतेला व प्रत्यक्ष उद्योग प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणारी ही योजना महिलांच्या स्वयंसहायता बचत गट चळवळीस नवी उमेद निर्माण करणारी, नव्या संकल्पनेतील नवउद्योजक निर्माण करून उत्तुंग भरारी घेण्यास चालना देणारी व एकंदरच महिलांच्या सक्षमीकरणात प्रेरणावाट ठरेल यात शंका नाही. मात्र स्पर्धेत पात्रता प्राप्त ठरलेल्या स्वयंसहायता बचत गटांनाच या योजनेचे लाभ व आर्थिक सहाय्य दिले जात असल्याने उर्वरित असंख्य बचत समूह या योजनेच्या लाभापासून वंचित राहात आहेत. तसेच सदर योजना जिल्हास्तरावर तसेच तालुका पातळीवर कुठलाच नियोजित कृती आराखडा न आखता, त्याची प्रसिद्धी न करता अत्यंत कमी अवधीत घाईगडबडीत राबविण्यात आल्याने असंख्य बचत गटांना योग्य मार्गदर्शनच्या अभावामुळे प्रकल्प तयारी व मांडणी करणे शक्य झाले नाही. त्यामुळे उपक्रमात पाहिजे तसा सहभाग देता आला

नाही. नव्हे तर योजना पूर्णतः न समजल्याने सहभागी होता आले नाही, असे मत व्यक्त करणाऱ्या प्रतिसादकांचे प्रमाण सर्वाधिक आढळले.

**१.९ सुचना व शिफारशी :**

१. योजनेअंतर्गत महिला स्वयंसहायता बचत गटांद्वारे सादर करण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उद्योग–संकल्पना/प्रकल्प मॉडेल्सचे परिक्षण करण्यासाठी तालुकास्तरीय समितीत उद्योजक, उद्योजकता प्रशिक्षक, स्वयंसहायता चळवळीशी विशेषत: समाजकार्य शिक्षणाशी संबंधीत तज्ञ प्राध्यापक, संशोधक यांचा बाह्य परीक्षक म्हणून समावेश करण्यात यावा.

२. सुनियोजित कृती आराखडा तयार करून समयसारणीनुसार व्यापक प्रसिद्धी व जाणीव जागृती करून योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

३. या योजनेचा पहिला स्तर क्लस्टर पातळी करण्यात यावा. जेणेकरून अधिकाधिक बचत समुहांना सहभागी होता येईल व या पातळीवर क्लस्टर क्षेत्रातील एकूण स्थापित गटांच्या ७५ टक्के गटांना सहभागी प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य देण्यात यावे. त्यानंतर तालुका व जिल्हा स्तरांवरील गटांची नाविन्यपूर्ण उत्कृष्ठ मॉडेल्सची निवड करण्याच्या गट लक्ष्य मर्यादेत (Group Target Limit) वाढ करण्यात यावी. जेणेकरून बहुसंख्य बचत गटांना योजनेअंतर्गत आर्थिक व पायाभूत सुविधांचा लाभ मिळेल.

४. हिरकणी–नवउद्योजक महाराष्ट्राची योजनेअंतर्गत सर्वश्रेष्ठ व आर्थिक सहाय्यास पात्र ठरलेल्या स्वयंसहायता बचत गटांना नवउद्योग संकल्पनांना मूर्त स्वरूपात प्रत्यक्ष साकारण्यात विशेष तज्ञ मार्गदर्शक कृती गटाची निर्मिती करून त्याद्वारे मार्गदर्शन, समुपदेशन प्रकल्प उभारणी, उत्पादन व बाजारपेठ इत्यादीबाबत तांत्रिक मार्गदर्शन करण्यात यावे.

**१.१० संदर्भसूची :**

१. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र.कौविऊ–२०१९/प्र.क्र.–१०/अभियान–१ मंत्रालय, मुंबई.

दि. २१ फेब्रुवारी २०१९.

२. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासन, निर्णय क्र.कौविऊ –२०१९/प्र.क्र.–१०/अभियान–१ मंत्रालय, मुंबई. दि. १६ जुलै २०१९.

३. संवादिनी–महिलांचा महिलांसाठी जनजागर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

❑❑❑

13

# Eco-feminism: A Brief Survey of Anita Desai's selected novels

**Dr. Vinita Bhadauria**
Lecturer in English,
Shri Dharam Chand Gandhi Government College Behror

***********

**ABSTRACT:**

Eco-feminism or ecological feminist criticism deals with the ecological and feminine impact on literature. The relation between woman and environment is crucial in 'Cry the Peacock' and 'Fire on the Mountain.' The eco-feminist principle is helpful in the significance of nature in Anita Desai's novels. As an eco-feminist diasporic writer, the psychology of woman is explored through the symbolic interpretation of nature in her novels. The various elements of nature such as birds, animals, colors are found in her novels which associate with the psychological status of her characters. Anita Desai has effectively managed to describe the mental pain and agonies of Maya through the mourning of a peacock for its mate. Similarly the novel 'Fire on the Mountain' depicts the darker shades of the nature and highlights its alliance to the darker aspects of the women concerned.

**Key words:** Eco-feminism, peacock, cry, nature, anguish.

Eco-feminism and eco-criticism both are interlinked in terms of aims and objectives. Eco-criticism is a literary movement that investi gates relationship between nature and literature. Eco-critics show how the relationship between

nature and literature textualized by poets and writers in their literary works. The term eco-feminism deals with the ecological and feminine impact on literature. The term eco-criticism was coined by French feminist Francoise d'Eaubonne in 1974. This philosophy emphasis the way both nature and women are created by male dominated society. The present paper intends to study Anita Desai's selected novels in the light of eco-feminist perspective.

Eco-feminism and feminism more or less are equal in their objectives. The primary aim of eco-feminism is not the same as those typically associated with liberal feminism. Eco-feminists do not seek equality with men as such. The central to this liberation is recognition of the value of the activities traditionally associated with women; child birth, nurturing and the old domestic arena. In Anita Desai's novel 'Cry the Peacock', the patriarchal mentality of Gautam towards his wife Maya, is dominant, cultured, rational and practical and too much engrossed in his own affairs. He can't admire his wife for her great qualities but make a disparaging remark about her that she has a third rate poetess mind. Maya desires for love and affection but her husband Gutam is incapable of understanding her genuine feelings and emotions. On the other hand Maya has eco-friendly nature who wants to enjoy life to the utmost. She is interested in the all good things of the nature, birds, animals, poetry and dance. She loses herself in enjoyment of beautiful sight and sounds. The cries of birds evoke a sympathetic chord in her. As above cited principles of eco-feminist theory, eco-feminists do not seek equality in patriarchal society but deserve respect towards activities traditionally associated with women. Gautam in the novel is not serious about their relationships. He treats Maya as child and unable to satisfy Maya physically or mentally.

In western society women are treated as inferior to men, nature is treated as inferior to culture, and human are understood as being separate from and often superior to the natural environment**.** This binary oppositions find in every

culture where one define in relation to another that gives sense of superior and inferior. In the 'Cry the peacock' Gautam represents patriarchal mentality such as cultured, rational and practical. He did not have sense to enjoy the natural beauty because of his patriarchal mentality where culture held superior to nature. On the contrary Maya calls the nature and enjoys the company of nature in order to get relief from established condition. Anita Desai, a dominant eco- feminist diasporic writer, uses natural images which act an important part of her theme. The images used in her novel of nature include animals, plants and birds have symbolic meaning, Desai uses external landscapes to portray interior states of mind in her novel such as Cry the Peacock in which the complexities of Maya's inner life is effectively brought out through the landscape as is her resentment against her husband for his inability to communicate with her. Maya compares herself with peacock in jungle.

The natural images such as birds and animals used in the novel are attached with the emotions of Maya. Each image reflects its own nature with its psychological aspects to Maya. One of the incidents in Maya's life that is the death of her dog called Toto which describes the psychological imbalance of Maya:

"All day the body lay rooting in the sun. It could not be moved on
to the varhanda for, in that April heat, the reck of dead flesh was
over powering and would soon have penetrated the rooms. Crows
sat in a circle around the corpes and the crows will eat anything-
entrails, eyes, anything."

Maya becomes helpless and is not ready to accept the bitter truth that death is inevitable. She asserts, "Childless woman do develop fanatic attachments to their pets."

Anita Desai's second eco-feminist novel 'Fire on the Mountain'

also enriched with natural images that are highly suggestive and symbolic. Novelist depicts the darker shades of the nature and highlights its alliance to the darker aspects of the women concerned. Throughout our history nature is portrayed as feminine and women are often thought of as closer to nature than men. Women's psychological connection with birth and child care has partly led to this close association with nature. Menstrual cycle, which is linked to lunar cycles, is also seen as evidence of women's closeness to the body and natural rhythm. Eco- feminists focus on these connection and analyses how they devalue and oppress both women and nature. In the 'Fire on the Mountain' novelist reveals feminine concern in relation with ecological issues. Novelist makes it clear that ecological issues are closely connected to women than men. She also pointed out typical nature of men in patriarchal in which man is symbolized brutality, domination, fear, hate arrogance and power, while women and nature in every aspects of life are victims. Novelist also attempts to explore patriarchal strategies where nature and women are treated to fulfill its own purpose. 'Fire on the Mountain' exposes dominant patriarchal society that exploits both nature and women. The three female characters are either physical or mentally victims of the patriarchal society. Nanda Kaul, a widowed great grand-mother, is victim of her role as a dutiful wife to an unfaithful husband and as a mother to many children. Raka is the victim of an abusive father. Ila Das, Nanda's childhood friend and the victim of her selfish brother and her own reformist idealism. Nanda Kaul, in 'Fire on the Mountain', who after her husband's death retires in a cottage up the mountain at Carignano Kasauli where she creates space for her own and leaves peaceful in company of nature. Nanda lives out her old age in isolation in a Himalayan town Kasauli away from the world she knew as a wife and mother.

The representation or symbolism of nature in relation to women characters in Anita Desai's novel entitled 'Fire on the Mountain' allows the reader to discern unfathomed

spheres of the female ideology. The title indicates not only an actual occurrence happening now and then on the top of the mountain, burning into ashes trees and houses but also the ranging passion within restless soul. 'Fire on the Mountain' revolves around three women characters Nanda Kaul, Raka and Ila Das, their interconnectedness with nature, their victimization and the equal operation of nature. The novel depicts the darker shade of nature and highlights its alliance to the darker aspects of the women concerned. Thus, this novel makes it clear that ecological issues are connected to woman and non-human species.

Eco-feminist approach to investigate relationship between nature and women provide new insight to study environmental issues in light of feminist perspective. Both are more or less victims of patriarchal society and keep at secondary position. This approach shifts critical focus from social relations toward natural relationships and views the oppression of female and environment as interviewed. Though traditionally understood women as more close to environment by their nature and victimized by patriarchal society but should get equal treatment because both are equally important for sustain civilization and could not treat as secondary.

**Bibliography:**

1) Desai, Anita. 'Cry, the Peacock.' New Delhi: Orient, 1980. Print.

2) Desai, Anita, Fire on the Mountain. Noida: Random House, 2008.Print.

3) "Eco-feminism." The Oxford Learner Dictionary. 8th Edition. 2010.Print.

4) Gloyfelty, Cheryll, and Harold Fromm.The Eco-criticism Reader:Landmarks in Literary Ecology. Georgia: University of Georgia Press.

❑❑❑